# एकेश्वरवादाची संकल्पना

लेखक

**मुहम्मद फारुक़ खान**

भाषांतर

**सय्यद जाकिर अली**

## अनुक्रमणिका

*"अल्लाह, असीम कृपावंत व दयावंतच्या नावाने"*

जीवनाची सर्वांत मोठी वास्तविकता काय आहे? की जीवनाची काही वास्तविकताच नाही? हे कसे बरे शक्य आहे? आपल्या भावना आणि अनुभवांवरून हे लक्षात येते की या जीवनात कधी सुखाचे शीतल पवन झुळझुळतात, कधी यातना, दु:ख व पीड़ांचे चटके बसतात. मुळात याच बाबींवरून असे वाटल्याशिवाय राहत नाही की जीवनाची काहीतरी वास्तविकता आणि सार्थकता आहे. जीवनाचे अस्तित्व मानल्यावर आणि ज्याअर्थी आपल्याकडे चांगली विवेकशक्ती आणि विचारबुद्धी आहे, तर निश्चितच या जीवनामागे एक विलक्षण सत्य दडलेले आहे.

उत्तरही खूप सरळ आणि सोपे आहे. आपल्या या जीवनाचे सर्वांत महत्त्वाचे सत्य हे 'ईश्वर' होय. अन्यथा ईश्वराचा इन्कार जर केला तर जीवनाची सार्थकता नष्ट होऊन बसते, जीवन व्यर्थ, निरर्थक व वास्तविकतेचा लवलेशही नसलेले दिसते, जीवन हे तत्त्वहीन होऊन बसते. शुद्ध आणि प्रामाणिक अंत:करणाने ईश्वरावर श्रद्धा ठेवणे, ती जीवंत आणि विशुद्ध ठेवणे हे आपले परमकर्तव्य आहे. अर्धवट आणि अपुऱ्या ज्ञानामुळे तसेच संकुचित वृत्तीमुळे आज ईश्वरावर श्रद्धा ठेवणे म्हणजे रूढ़ीवाद, जुनाट विचार आणि अगदी काहीच रूची नसलेली बाब समजली जात आहे. मात्र ही परिस्थिती अत्यंत गंभीर आणि शोचनीय होय. एवढे असूनही मानवी अंत:करणातून ईश्वराची कल्पना नष्ट करण्यात अद्यापही मानवास पूर्णत: यश मिळालेले नाहीच. म्हणजे हे या गोष्टीचे प्रत्यक्ष प्रमाणच आहे की ईश्वर-धारणा म्हणजे उपेक्षिली जाणारी बाब मुळीच नव्हे.

ईश्वरी अस्तित्वाची खरी संकल्पना काय आहे? त्यावर श्रद्धा ठेवण्याचा अर्थ आणि हेतु काय आहे? व्यावहारिक दृष्टिकोनानुसार ईश्वराशी आपला संबंध काय आहे? वगैरे प्रश्नांवर या छोट्याशा पुस्तिकेत मानवाच्या निसर्गस्वभावाशी सुसंगत चर्चा करण्यात आली आहे. मानव आणि सृष्टीचा निर्माता ईश्वराशी आशा आहे की तो वाचकवर्गास लाभ प्रदान करील, तसेच आम्ही ईश्वराचे अत्यंत आभारी आहोत की त्याने विशेष कृपा करून आम्हास हे सत्कार्य करण्याची सुबुद्धी आणि सामर्थ्य प्रदान केले.

आपला

मुहम्मद फारुक़ खान,

अलीगढ़ - १९७५

# ईश्वरी अस्तित्वाचे प्रमाण

आपल्या विवेक आणि चेतनापटलावर या जगातील भोगवस्तुंचा इतका विलक्षण प्रभाव आहे की ईश्वराला समजून घेणे प्रकार तर सोडाच, स्वत: आपला आत्मा आणि आपले अस्तित्व समजून घेण्याचाही आपण प्रयत्न करीत नाही. तळ्यातील पाण्यावर शेवाळाचे इतके मोठे आवरण असेल तर त्यातील पाणी कसे दिसणार? हे विश्व, हे जग आणि ही सृष्टी मुळात ईश्वरी अस्तित्वाचे स्पष्ट प्रतिबिंब आहे. या सृष्टीतील प्रत्येक वस्तु आणि यातील घडणारी प्रत्येक घटना हे ईश्वरी सामर्थ्याचे जबरदस्त प्रमाण होय. विश्वाच्या प्रत्येक कणात आणि प्रत्येक कार्यात केवळ त्याचेच प्रतिबिंब, त्याच्याच विलक्षण सामर्थ्य व सौंदर्याचे अप्रतिम दर्शन! मनमस्तिष्कात सत्याचा कांतीमय प्रकाश टाकणारे ईश्वरी संकेत सर्वत्र विखुरलेले असूनही आपल्या मुखावर प्रश्नांचे काहूर आहे, आपली चेतना ईश्वरी अस्तित्वाचा इतका शुद्ध, स्वच्छ व पावन आरसा असूनही आपल्या हृदयात शंका-कुशंकानी थर केलेले आहे. जगातील प्रत्येक कण ईश्वरी अस्तित्वाची साक्ष देत असूनदेखील त्याच्या प्रत्यक्ष दर्शनाची आस आपण डोळ्यांत घेऊन् बसलो. हे कदाचित यामुळेच की आपण आपल्या मनातूनच त्याला दूर ठेवले.

ईश्वरास जाणण्याची इच्छा ही प्रत्येकाला असत्याचे म्हटले जाते, मात्र वस्तुस्थिती अशी नाही. प्रत्येकजण कुठेन् कुठे गुंतलेला आहे, प्रत्येकजण कोणत्यान् कोणत्या जाळ्यात गुरफटलेला आहे आणि यातच तो समाधानीसुद्धा आहे. मग ईश्वर पावण्याचा प्रसंगच कुठे उद्‌भवतो. यासाठी उत्कट इच्छा आणि तीव्र आकांक्षेची खरी गरज आहे. ईश्वरास जर खरोखरच जाणून घ्यायचे असेल, त्याचे अस्तित्व समजून घ्यायचे असेल तर प्रथम आपले समस्त अस्तित्व जाणून घेण्याची नितांत आवश्यकता आहे. तुम्ही जर आपले समस्त अस्तित्व जाणून घेण्याचे धाडस कराल तर निश्चितच या महान सत्याचे दर्शन घडल्याशिवाय राहणार नाही. या वास्तविकतेवरील प्रत्येक पडदा उठत जाईल आणि या सर्वांत मोठ्या रहस्याचे कोडे सुटेल, ही विलक्षण वास्तविकता आपोआप तुम्हास दिव्यदर्शन देईल.

प्रकरण पहिले

# ईश्वराचे अस्तित्व

## १) सृष्टीव्यवस्थेत उपयोगितेचे नियम

या सृष्टीत आपण चोहीकडे विविध प्रकारच्या आणि विभिन्न स्वरूपाच्या चित्रविचित्र घटना घडताना नेहमीच पाहत असतो. एवढेच नव्हे तर स्वत: आपल्या अस्तित्वाकडे जरी आपण पाहिले तर तेसुद्धा एक अत्यंत विचित्र, विलक्षण आणि चमत्कारिक बाब असल्याचे दिसते. या सृष्टीमध्ये आपल्याला प्रत्येक वस्तु आणि प्रत्येक बाब अत्यंत व्यवस्थित आणि नियोजनबद्ध स्वरूपात दिसते आणि तेही अगदी तंतोतंत. सूर्य हा सकाळी उगवतो आणि संध्याकाळी मावळतो, यातसुद्धा अद्‌भूत सौंदर्य असल्याचे आपल्याला जाणवते. रात्रीच्या वेळी आकाशात झगमगणारे तारे व नक्षत्र हेसुद्धा किती आकर्षक आणि मन मोहविणारे व अप्रतिम दृष्य असते. वन-उपवनातील सुमनांनी व रंगीबेरंगी फुलांनी नटलेल्या बागा असो की जंगलातील सुंदर पशु-पक्षी असोत, यात किती आकर्षक व अप्रतिम सौंदर्य दिसते! तात्पर्य एवढेच की सृष्टीची छाया ज्या ज्या ठिकाणी पडते, ती वस्तु अत्यंत आकर्षक, विलोभणीय आणि मानवी मनाला नित्य भुरळ पाडणारी दिसते, मनमस्तिष्कावर तिचा विलक्षण प्रभाव पडतो.

सौंदर्य आणि मोहकतेबरोबरच या मायावी विश्‍वात आपल्याला विलक्षण सामर्थ्य आणि प्रचंड शक्तीचे दर्शनसुद्धा घडते. मंद आणि शीतल वाऱ्याबरोबरच या विश्‍वात वादळी वारे बेभान होऊन वाहताना दिसतात. पक्ष्यांची मंजूळ गाणी मन मोहवितात, मात्र याबरोबरच आभाळगर्जना आणि विजेचा भयानक कडकडाट आपले काळीज फाडतो. उषेच्या सुकौमार्याबरोबरच समुद्राच्या अफाट लाटा मनाचा ठोका चुकवितात. एकीकडे फुलांत, अत्यंत कोमलता आहे तर दुसरीकडे अत्यंत कठोर पर्वतांच्या उंच व विशाल रांगासुद्धा मनाला प्रभावित करतात. शेवटी ही सृष्टी आहे काय? हे तर कोमलता आणि कठोरता अगर शक्ती व सौंदर्याचे एक अद्‌भुत मिलन होय. कुरआनात म्हटले आहे,

"ज्याने जी वस्तु बनविली, ती विलक्षण प्रशंसनीय बनविली." (कुरआन ७ : ३२)

याशिवाय सृष्टीतील हे अद्‌भूत सौंदर्य आणि शक्ती केवळ डोळ्यांनी पाहण्यापुरती मर्यादित नसून या समस्त बाबींवर आपल्या गरजा व आवश्यकता अवलंबून आहेत. आपल्या या जीवनाच्या सुरक्षेची संपूर्ण भीस्त यावरच आहे. पाहायला तर ही सृष्टी अबोल आहे, मात्र हिचे कार्य अत्यंत दायित्वपूर्ण आणि खूप गंभीर आहे. आपण या सृष्टीच्या हातातील असे खेळणे तर

मुळीच नाही, जे केवळ मनोरंजनापुरतेच मर्यादित असते. त्याचप्रमाणे हा निसर्ग आणि नैसर्गिक शक्तीसुद्धा आपल्यासाठी केवळ गाजराची पुंगी नव्हे.

आपण खरोखरच सृष्टीची ही मूक व अर्थपूर्ण भाषा समजून घेण्याचा प्रयत्न करायला तयारच नाही. सृष्टी आणि विशेषत: तिच्या सांकेतिक भाषेच्या झोळीत आपण उपेक्षेची ठिकरेच टाकीत असतो. आपण सृष्टीचा जेवढा लाभ घेतो, त्यापेक्षा कितीतरी जास्त पटीने ती आपल्यास देण्यासाठी सदा तत्पर असते आणि याची आपण कल्पनाही करू शकत नाही. ती आपल्या भौतिक आवश्यकतांची तर पूर्तता करतेच, शिवाय आपल्या अभौतिक गरजा पूर्ण करण्यासाठीसुद्धा तिच्याकडे अमर्याद खजिना आहे. ही तर आपली वृत्ती आहे की आपण काय घेतो आणि काय सोडतो. पाण्यामध्ये ऑक्सिजन आणि हायड्रोजनचे प्रमाण किती आहे, केवळ एवढे माहीत करून घेतल्याने अथवा याचप्रकारे काही इतर शोध लावल्याने सृष्टीचे मायावी रहस्य उलगडत नसते. नैसर्गिक वस्तुंमधील संरचनासंबंधी जे कौशल्य आणि त्यातील निहित व गुप्त उपयोगिता, तसेच उद्देशाचा जो अभौतिक अंश आढळतो, शेवटी याचे काय कारण आहे? अर्थातच अभौतिक तत्त्वाचे भौतिक स्तरावर विश्लेषण करण्याचा प्रयत्न म्हणजे अवैज्ञानिक बाब ठरेल.

अशाप्रकारे या सृष्टीमध्ये आपल्या विवेकशक्तीवर या गोष्टीचे प्रत्यक्ष प्रमाण आघात करते की सृष्टीचे उगमस्थान अथवा मूळस्त्रोताचे ठिकाण इतरत्र कोठेतरी आहे. सृष्टी संचालनाचे कार्य कोण्या अशा शासनाच्या हाती आहे, ज्याचा समस्त विश्वावर पूर्ण अधिकार आणि विलक्षण नियंत्रण (Hold and Control) आहे. जर ही गोष्ट आपण स्वीकारण्यास तयार नाही तरं याचा अगदी स्पष्ट अर्थ असा होईल की आपण वस्तु आणि त्यात परिलक्षित एक विशेष तत्त्व 'उपयोगिते'साठी एखादा वैज्ञानिक आधार घेण्यापासून सरळसरळ पाठ फिरवितो. मात्र ही एक प्रत्यक्ष अवैज्ञानिक भूमिका आणि वैज्ञानिक आधार नसलेली नीती ठरेल, अर्थातच कोणतीही विवेकी अगर बुद्धिमान व्यक्ती याचे समर्थन मुळीच करणार नाही.

## २) सृष्टीतील संयोजन

या सृष्टीमध्ये सर्वत्र एकच गोष्ट पाहावयास मिळते आणि ती म्हणजे नियोजनबद्धता, सुनियोजितता. मग यामधील एखादी व किरकोळ वस्तु असो की प्रचंड मोठी वस्तु अगर घटनाकार्य असो अथवा सृष्टीतील वस्तूंमध्ये घडणारे परिवर्तन असो, या सर्वांत कमालीची नियोजनबद्धता आणि उद्देशपूर्णता आढळते. अर्थातच सृष्टीतील प्रत्येक बाब ही सुनियोजित तर

आहेच, शिवाय यामागे एक उद्देशसुद्धा असल्याचे स्पष्टपणे जाणवते. हा नियम व्यापक आहे. समस्त विश्व आपले अंतिम लक्ष्य गाठण्याच्या मार्गावर वाटचाल करीत आहे. हीच बाब कुरआनमध्ये अशा प्रकारे, स्पष्ट करण्यात आली आहे,

"ईश्वराने जमिनीवरील आणि आकाशातील वस्तु कार्यरत केल्या आहेत, निश्चितच यात मोठे संकेत आहेत त्या लोकांसाठी जे विचार करणारे आहेत."(सूरह-ए-जासिया - १३)

"निश्चितच रात्र आणि दिवसांच्या उलटफेरीमध्ये आणि प्रत्येक त्या गोष्टीमध्ये जी ईश्वराने पृथ्वी आणि आकाशांत निर्माण केली आहे, ईशभय बाळगणाऱ्यांसाठी सत्याचे संकेत आहेत." (सूरह-ए- यूनुस - ६)

आपण या ठिकाणी विचार करायलाच हवा. आपल्याला स्पष्टपणे ही वस्तुस्थिती कळल्याशिवाय राहणार नाही की मानवाचे अस्तित्व टिकण्यासाठी अगर सुरक्षित ठेवण्यासाठी ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता आहे, त्या गोष्टी या जगात उपलब्ध आहेत. याची कित्येक उदाहरणे आहेत. समजा, आपल्या शरीरात फुप्फुस आहे. हे फुप्फुस निरर्थक आणि व्यर्थ आहे काय? तर मुळीच नाही. या फुप्फुसाचे एक विशेष कार्य आहे, एका विशेष उद्देशानुसार हे आपल्याला प्राप्त आहे. यामुळे आपण श्वासोच्छवास घेतो आणि यातून मिळणाऱ्या ऑक्सिजनमुळे आपल्या शरीरातील रक्त शुद्ध होते. रक्त जर शुद्ध झाले नाही तर आपले जगणे अशक्य होऊन बसते. फुप्फुसाद्वारेच आपल्यातील अशुद्ध वायूचे विसर्जन होते. अशाप्रकारे हा अवयव द्विगुणित कार्य करतो. त्याचप्रमाणे आपल्या सभोवताली वायू नसता तर आपल्या शरीरातील फुप्फुसाचा काय उपयोग झाला असता? याशिवाय वायू हे आपले शरीर आतून शुद्ध करण्याचेच कार्य करीत नसून आणखीनही बरेच उपयोग व कार्य वायूमुळे होतात. जर वायूचा आपल्या शरीरावर विशेष दबाव नसेल तर शरीराची व्यवस्थाच बिघडून जाते, आपल्याला आपल्या शरीरास संतुलित ठेवणेही अशक्य होते आणि आपल्या धमण्यांमध्ये योग्यप्रमाणात रक्ताभिसरण होणेही शक्य नसते. याच वायुचे हे महत्त्वपूर्ण कार्य आहे की तो पर्जन्ययुक्त ढगांना विविध ठिकाणी वाहून नेतो आणि त्या ठिकाणी पाऊस पडतो. मग याच पावसामुळे जमीन पिकते. पाऊस पडला नाही तर आपली काय अवस्था होते, यावरून याचे महत्त्व आपल्या लक्षात येते.

हात, पाय, डोळे, कान आणि शरीराचे इतर सर्वच अवयव मातेच्या गर्भातच तयार होतात. खरे पाहता मातेच्या गर्भाशयात मुलास चालण्या-फिरण्याची आवश्यकता असते, ना बोलण्याची, पाहण्याची वा ऐकण्याची गरज असते ना वास घेण्याची, खाण्या-पिण्याची ना

श्वास घेण्याची आवश्यकता असते. शरीराच्या या सर्व अवयवांची आवश्यकता ही मुळात जन्मानंतरच भासते. मग ही पूर्वनियोजन व्यवस्था काहीतरी विशेष प्रकारच्या उद्देशपूर्तीच्या नियमांना व्यक्त करीत नाही का? तर उत्तर मिळेल, "होय ! निश्चितच ! यामागे एक फार मोठा उद्देश असल्याशिवाय हे पूर्वनियोजन शक्यच नाही !"

मानवाचे डोळे, यावरच विचार करा. या डोळ्यांमुळेच या सृष्टीतील समस्त बाबी पाहणे शक्य आहे, तर दुसरीकडे परिस्थिती अशी आहे की सृष्टीतील बऱ्यांच वस्तूंच्या अभावामुळे आपले डोळे निरुद्देश आहेत. कारण पाहण्यासाठी जर वस्तुच नसतील तर डोळ्यांचा उपयोगच काय? अर्थातच आपले डोळे आणि सृष्टीतील वस्तूंमध्ये घनिष्ट संबंध असल्याचे स्पष्ट होते. मग डोळ्यांची रचना आणि स्वरूपसुद्धा मोठी विलक्षण बाब आहे. या रचना व स्वरूपात अशी सवलत आहे की यामुळे आपण प्रत्येक बाब अत्यंत उत्तम प्रकारे पाहू शकतो, न्याहाळू शकतो. याव्यतिरिक्त ही बाबदेखील विसरता कामा नये की डोळ्यांच्या पाहण्याची शक्ती अगर सामर्थ्यास एक मर्यादा आहे. आपण आपल्या या साध्या डोळ्यांनी एखाद्याच्या चेहऱ्यास उत्तम प्रकारे पाहू शकतो, निरखू शकतो, मात्र या डोळ्यांनी चेहऱ्याचा केवळ वरचा भागच आपण पाहू शकतो, सुंदर चेहरा पाहण्याचा आनंद उपभोगू शकतो. या डोळ्यांत जर इतकी शक्ती असती की चेहऱ्याची त्वचा भेदून आतला मांसल भाग आणि आतील प्रत्येक पेशी पाहणे शक्य झाले असते तर एखाद्याचा सुंदर चेहरा पाहून आनंद होण्याऐवजी तो चेहरा अत्यंत किळसवाणाच दिसला असता. कारण आतील रक्ताळलेल्या मांसपेशी, धमण्या, शीरा आणि हाडे पाहून आपण भयभीत झालो असतो, हे दृष्य पाहून तत्काळ डोळे बंद केले असते. मात्र असे होऊ नये म्हणूनच आपल्या डोळ्यांच्या द्रावक शक्तीस एक मर्यादा आहे. अशा प्रकारे आपल्या लक्षात ही बाब येते की या सृष्टीव्यवस्थेत आपल्या केवळ सामान्य गरजांवरच लक्ष पुरविण्यात आलेले नसून आपल्या सौंदर्याकर्षणाची इच्छासुद्धा डावलण्यात आलेली नाही. मग हा या गोष्टीचा स्पष्ट पुरावा नाही काय की सृष्टीमध्ये उपयोगिता आणि उद्देशपूर्तीची पूर्ण व्यवस्था करण्यात आलेली आहे? तर उत्तर एकच... होय. निश्चितच करण्यात आलेली आहे. उत्क्रांतीवादाचे समर्थक या ठिकाणी असा दावा करण्याची संभावना आहे की या डोळ्याने अत्यंत प्रारंभिक स्थितीपासून आजच्या वर्तमानकाळापर्यंत पायरीपायरीने उत्क्रांती अगर विकास करून वर्तमान परिस्थिती प्राप्त केली आहे, तसेच ही उत्क्रांती अगदी नैसर्गिक कारणानुसार झाली असून कोणत्याही विवेकी शक्ती व सामर्थ्यशाली अस्तित्वाने कोण्या एखाद्या विशिष्ट उद्दिष्टानुसार या डोळ्यास वर्तमान अवस्था प्रदान केली नाही. मात्र थोडा बुद्धीचा वापर करून विचार केला, तर

आपोआपच उत्क्रांतीवाद्यांचे पितळ उघडे पडते. त्यांचा दावा किती निरर्थक, निराधार व बिनबुडाचा आहे, हे पटकन लक्षात येते. यदाकदाचित उत्क्रांतीवाद्यांची ही विचारसरणी थोड्या वेळाकरिता आपण मान्य जरी केली, तरी या प्रश्नाचे मात्र उत्तर मिळतच नाही की उत्क्रांती क्रियेमध्ये मूल्याचा अविर्भाव आणि उच्च प्राण्यांच्या उत्क्रांतस्वरूपाकडे आकर्षित होण्याची प्रवृत्ती मुळात आली कोठून?

या सृष्टीव्यवस्थेतील चातुर्यपूर्णता आणि प्रयोजन दृष्टीसमोर ठेवून सुप्रसिद्ध वैज्ञानिक 'मिस्टर हेक्सले' यांनी लिहिले आहे,

"ही बाब खरी आहे की उत्क्रांतीवादाचा सिद्धान्त हा प्रयोजनवादाच्या समस्त लहान-मोठ्या बाबींविरुद्ध आहे. यंत्रशास्त्रचा एक अनुयायी हा जेवढ्या स्वतंत्रबुद्धीने विचार करतो, तेवढ्याच दृढतेने प्रारंभिक अणुंच्या (Atoms) रचनेचासुद्धा स्वीकार करतो. विश्वातील सर्वच विलक्षण संरचना ज्यांचे परिणाम आहेत, तेवढेच अधिक तो सृष्टी प्रयोजनवादाच्या कृपेस पात्र होतो. कारण तो हे सिद्ध करू शकत नाही की या प्रारंभिक अणुंच्या संरचनेचा हेतु हा जागतिक संरचनांना उत्क्रांतीच्या स्थानावर स्थानापन्न करणे, असा नाही." (संदर्भ : The Academy, Oct. 1863)

### ३) सृष्टीतील कार्यान्वित सहयोग विधी

आपण पाहतो की या विश्वातील समस्त वस्तु आणि सर्वच शक्ती व सामर्थ्यांमध्ये परस्पर सहयोग आहे. दिसायला परस्परविरोधी दिसत असल्या तरी त्या परस्परविरुद्ध मुळीच नाहीत. उदाहरणार्थ, आपण जमिनीत बी पेरतो, ते अंकुरित होते, त्याचे रोपटे बनते आणि शेवटी ते झाडाचे स्वरूप धारण करते. आपल्याला त्यापासून फुले वा फळे मिळतात. तेव्हा या संपूर्ण क्रियेमध्ये विश्वातील समस्त शक्तीचे सहयोग आणि सहकार्य असते. भूमी त्यास आपल्यामध्ये मूळ धरण्यास अनुकूल असते, सूर्य आपला प्रकाश आणि उष्णता देऊन त्याच्या वाढीस मदत करतो. पाऊस आणि वाऱ्याचे त्यास सहकार्य लाभते, अर्थातच यात परस्परसहकार्य आढळून येते.

शिवाय सृष्टीत घडून येणारे परिवर्तनसुद्धा विनाउद्देश अगर हेतुशून्य नाही. रात्र होते, मग तिच्या मागून दिवस उगवतो. यात एक हेतु आहे. कारण भूतलावर जगणाऱ्या वनस्पती, प्राणी, जीवजंतु आणि मानवाच्या बऱ्याच गरजा यावर अवलंबून आहेत.

पृथ्वी ही स्वत:भोवती शंभर मैल प्रतितास एखाद्या भोवऱ्याप्रमाणे गरगर फिरते. स्वत:भोवती फिरण्याची ही गती जर शंभर मैल प्रतितास असण्याऐवजी दहा तास प्रति मैल

असती तर पृथ्वीवरील दिवस-रात्र दहा पटीने मोठे झाले असते. म्हणजेच २४० तासांची रात्र आणि २४० तासांचा दिवस झाला असता. परिणामी इतक्या दीर्घकाळी सूर्याच्या उष्णतेमुळे पृथ्वीवरील हरितसृष्टी नष्ट झाली असती आणि जे काही बाकी राहिले असते, ते या लांबलचक रात्रीच्या थंडीमुळे नष्ट पावले असते.

सूर्य हा पृथ्वीपासून अगदी योग्य अंतरावर तेवत आहे. त्याचे तापमान आपल्या स्तरावर १२ हजार डिग्री फॅरेनहाइट (°F) एवढे आहे. अगदी योग्य अंतरामुळेच आपल्याला आवश्यक असलेले तापमान आणि प्रकाश मिळत असतो. त्याचे अंतर सध्याच्या अंतरापेक्षा निम्मे असते तर तापमानात द्विगुणित वाढ झाली असती आणि सर्वकाही जळून खाक झाले असते. त्याचप्रमाणे त्याचे पृथ्वीपासूनचे अंतर सध्याच्या अंतरापेक्षा थोडे जरी जास्त असते तर तापमानात इतकी घट झाली असती की ही सृष्टीच अस्तित्वात राहिली नसती.

याचप्रमाणे चंद्र हा आपल्या वर्तमान अंतरापेक्षा ५० हजार मैल दूर असता तर समुद्रात अशी भयानक भरती-ओहोटी आली असती की समस्त भूमंडल दिवसाकाठी दोनदा समुद्रात बुडाले असते.

पृथ्वीच्या बाह्य कवचाची जाडी वर्तमान जाडीपेक्षा केवळ दहा फूट जास्त असती तर ऑक्सिजन वायू समाप्त होऊन सजीव सृष्टी नष्ट झाली असती.

आपल्या पृथ्वीभोवती असणारे हवेचे थर थोडे जरी पातळ असते तर आकाशात तुटणारे तारे थेट पृथ्वीवर आदळले असते आणि उल्कापातामुळे या पृथ्वीवर सर्वत्र विनाशकारी अग्निकांड दिसले असते. दररोज हजारोंच्या संख्येत तारे तुटतात, मात्र वायूंच्या थरातच जळून जातात. पृथ्वीपर्यंत येण्यापूर्वीच ते नष्ट होत असल्यामुळे पृथ्वी आणि ही सृष्टी सुरक्षित आहे.

अशा प्रकारे अशी असंख्य उदाहरणे देता येतील. यावरून हेच सिद्ध होते की या विश्वाची निर्मिती आणि व्यवस्था निरुद्देश नसून यामागे खूप मोठा हेतु आहे. या सर्व प्रकारच्या उदाहरणांतून याशिवाय इतर कोणतीच बाब सिद्ध होत नाही की या विश्वाची निर्मिती अगदी नियोजनबद्धरीत्या झालेली आहे. योजना नेहमीच भविष्याला समोर ठेवून आखण्यात येते. या विचाराशी सहमत झाल्यावाचून गत्यंतर नाही की 'कार्य-कारण-संबंध'मध्ये जर आपण भूतकाळाकडून वर्तमानकाळाकडे येत असलो तर उद्दिष्टसंबंधी तथ्याबाबतीत वर्तमानाचा विचार भविष्याकडून करावा लागतो.

(संदर्भ : Hocking, Types of Philosophy, page No.106)

निश्चितच एखादे उद्दिष्ट बाळगून करण्यात येणारे कोणतेही कार्य नेहमीच भविष्याचा पूर्ण विचार करूनच करावे लागते.

त्याचप्रमाणे कोणत्याही योजनेची कल्पना ही योजनाकाराविना शक्यच नाही. अर्थात योजनाकार असेल तरच योजना करण्याची तो कल्पना करू शकेल. येथूनच आपल्याला एका कुशल योजनाकार आणि निर्मात्याचे प्रमाण सापडते. मग अशा योजनाकार आणि निर्मात्याचा इन्कार करणे म्हणजेच खऱ्या अर्थाने या सृष्टीचा आणि स्वत: आपल्यातील उपलब्ध असणाऱ्या नियोजनाविषयक तत्त्वाचा इन्कार करणे होय आणि हा इन्कार म्हणजे विज्ञानविरोधी आणि अज्ञानी भूमिकाच ठरेल.

## ४) अनुकूलता आणि समरुपतेचा नियम

या मायावी सृष्टीमध्ये उपलब्ध असलेल्या वस्तूंमध्ये परस्पर जी अनुकूलता आणि समरूपता आढळते, यास एखाद्या आंधळ्या वा अविचारी व अप्रत्याशित घटनेचा परिणाम म्हणता येणार नाही. हे कसे शक्य आहे की, छापखान्यातील मुद्रणाक्षरे एखाद्या कागदावर विखुरल्याने एखाद्या सुंदर कवितेची रचना होईल. एखाद्या माकडाला टंकलेखन यंत्रावर अथवा संगणकावर बसविल्यास एखादी कथा टंकलेखित होईल काय आणि कथासुद्धा इतकी उत्कृष्ट की ती टीका आणि समीक्षेच्या प्रत्येक कसोटीवर खरी उतरेल? अशी कथा, जिच्यामध्ये विषय आणि भावसंबंधी कसलाही दोष नसावा. मग हे जर मान्य आहे तर यापेक्षा आणखीन न्यायसंगत बाब काय असू शकते की या विश्वाचा सृष्टा, निर्माता व संचालक हा एक असीम चेतना आणि मर्यादेपलीकडचा विवेक असलेला आहे. येथील उपलब्ध वस्तु विश्वाची निर्मिती ही चिंतनक्रियेच्या माध्यमाने झाली. या विश्वात जो प्रयोजनवादी नियम क्रियात्मक स्वरूपात दिसत आहे, त्याची व्याख्या अशी मुळीच करता येणार नाही की हा यांत्रिक शक्तींचा अचानक परिणाम आहे. साध्य हे अनुकूल साधनांचे स्वरूप धारण करण्याची एक-दोन नव्हे तर अगणित उदाहरणे या सृष्टीत आहेत. यावरून स्पष्टपणे जाणवते की त्यांची निर्मिती विचारपूर्वक आणि विशेष उद्दिष्टानुसार करण्यात आली आहे.

## ५) निवड आणि एकत्रीकरण

विभिन्न प्रकारच्या वातावरणात, विविध प्रकारच्या भूभागात, पाण्यात वा समुद्रात राहण्यासाठी अगदी अनुकूल प्रकारचे विभिन्न अवयव प्राण्यांना मिळालेले आहेत. अर्थात कोठेही आणि कोणत्याही वातावरणाशी अनुकूल असणाऱ्या अवयवांची निवड करण्यात आलेली आहे.

सृष्टीव्यवस्थेत अशा प्रकारची निवड, एकत्रीकरण, क्रमस्थान आणि बुद्धीशील योजना असल्याची जी स्पष्ट चिन्हे आहेत, ते एका बुद्धिमान आणि अपार विवेकशक्ती असलेल्या रचनाकाराच्या अस्तित्वाचेच पुरावे आहेत. मुळात हे सर्वकाही ईश्वरी सामर्थ्यांचेच दर्शन घडविते आणि तेही सृष्टीच्या योजनाकाराच्या स्वरुपात. दुसऱ्या शब्दांत असे की एका अत्यंत बुद्धिमानी आणि अपार विवेकशक्तिशाली निर्माता व योजनाकार ईश्वराचे स्पष्ट दर्शन या संकेतचिन्हांतून घडते.

निवड आणि एकत्रीकरणाची सुंदर उदाहरणे शारीरिक अवयव आणि वाढीसंबंधी मिळतात. मानव-मस्तिष्काचेच उदाहरण घ्या. तुम्ही आपल्या तळहातावर हे ठेवू शकता, पाहू शकता. तुम्हाला दिसेल की तुमच्या हातात असलेल्या मेंदूमध्ये एक अब्ज (शंभर कोटी) च्या संख्येत पेशी आहेत. प्रत्येक पेशीमध्ये ६० हजार केंद्रबिंदू असू शकतात. अशा प्रकारे सृष्टीमध्ये ज्या-ज्या ठिकाणी कार्यकारणाचा संबंध आढळतो, त्या ठिकाणी व्यवस्थेचा असा शृंखलाबद्ध आणि अखंड क्रम आढळतो जो बुद्धी आणि पूर्ण नियोजनाशिवाय शक्यच नाही. निवड, एकत्रीकरण आणि क्रमबद्धतेमध्ये आढळणारे एकरूप अनुषंग अगर अनुकूलीकरण कोण्या अत्यंत अफाट बुद्धिमान सामर्थ्य असलेल्या शक्तीद्वारेच नियमित होते, हे स्वीकारल्याशिवाय गत्यंतर नाही.

## ६) अनंत सामर्थ्याची कल्पना

आणखीन एका बाजूने विचार करा. माणसाचे अस्तित्व मर्यादित स्वरूपाचे आहे. त्याच्यात कोणत्याही प्रकारचे सामर्थ्य अगर शक्ती अमर्याद असण्याचा प्रश्नच नाही. त्याचे सर्वस्व मर्यादित आहे. त्याचे जीवन, शक्ती व सामर्थ्य, त्याचे सुख-दु:ख हे सर्वकाही एका मर्यादेच्या आत आहे. मात्र त्यास जर आत्मचेतना अवगत असेल तर तो अमर्याद सामर्थ्याची कल्पना करू शकतो. त्याच्या बुद्धी-स्वभावामध्ये एका अनंत तसेच सर्वच प्रकारे परिपूर्ण सत्ता-सामर्थ्याची जाणीव अस्तित्वात आहे. आता प्रश्न असा आहे की या जाणीव अगर कल्पनेचे मूळ कारण काय आहे? अंत असलेल्या अस्तित्वात अनंत सत्ता-सामर्थ्याची जाणीव आणि कल्पना यावी, हे मुळात शक्यच नाही. एखाद्या भांड्यात जे काही असेल तेच त्यातून मिळेल. त्याशिवाय इतर काही त्यातून मिळण्याची इच्छा करणेसुद्धा शक्य नाही. जे अस्तित्व मुळात अनंत तसेच सर्वप्रकारे परिपूर्ण नसेल, त्यास अनंताचा कर्ता म्हणणेच नितांत विसंगत बाब होय. हे ईश्वराच्या अस्तित्वासंबंधी एक तत्त्वमीमांसाविषयक तर्क आहे, जे खंडन करण्यासारखे मुळीच नाही. कारण असे केल्यास आपल्या चिंतनाच्या मौलिक आधारांवर आघात होतो, आपल्या चिंतनाचे मौलिक आधारच नष्ट होतात.

## ७) सृष्टीचे मूळ कारण

ईश्वरास तत्त्वज्ञांनी सृष्टीचे मूळ कारणसुद्धा मानले आहे. अर्थात ईश्वर म्हणजे सृष्टीचे मूळ कारण असल्याचे त्यांचे मत आहे. प्रत्येक कार्याला एक कारण असावे लागते. हे विश्वसुद्धा एक कार्य आहे. याची बरीच कारणे असावयास हवीत. मग त्या कारणांचेसुद्धा एखादे कारण असेल. अशा प्रकारे हा क्रम सुरुच राहणार. मात्र कार्यांपासून कारणाकडे अनंत काळापर्यंत जाता येत नाही. त्यासाठी कोठे ना कोठे थांबावेच लागेल आणि एका मूळ कारणाच्या अस्तित्वाचा स्वीकार करावाच लागेल. अर्थात हे कारण इतर एखाद्या कारणावर अवलंबून नसावे. मग या विश्वाचे मूळ कारण म्हणजेच ईश्वर हेच आहे, असे म्हणावे लागेल.

मिस्टर मार्टिन्यू (Mr. Martineau) यांच्या मतानुसार, कारण ही एक शक्ती आहे जी कार्य उत्पन्न करते. कार्यकारणत्व हे केवळ शक्तीचे अस्तित्वच दाखवीत नसून हेसुद्धा दाखवितो की ती शक्ती एका विशेष दिशेकडे कार्यान्वित आहे. शक्तीचा आरंभ आणि तिचे विशिष्ट दिशेत मार्गक्रमण होणे, या दोन्ही बाबी मानवाच्या बुद्धीतच शक्य आहेत. ज्या शक्ती आणि कारणाचे आपल्याला प्रत्यक्ष ज्ञान होते, ती मानसिक शक्तीच आहे. सृष्टीची शक्तीसुद्धा अंधारात दगड मारण्यासारखे अविवेकी कार्य करणारी शक्ती नसून पूर्ण उद्दिष्ट समोर ठेवून आणि पूर्ण विचारांती चेतनाशक्ती किंवा ईश्वराची शक्ती होय. ईश्वरच विश्वाचे कारण आहे. हा विश्वमीमांसाविषयक तर्कसुद्धा काही एखादा दुर्बल तर्क नव्हे.

सृष्टीला एक यंत्ररचना समजणारे असे सांगून मोकळे होतात की सृष्टी आपली व्याख्या करण्यासाठी ईश्वरावर निर्भर नाही. कारण यंत्ररचना स्वत:ची व्याख्या स्वत:च करते. मात्र या दाव्याला काहीच आधार नाही. यंत्ररचनेच्या विविध भागांचा परस्पर संपर्क आपोआप अस्तित्वात येत नाही आणि आपोआप त्यात गती निर्माण होत नाही. यासाठी एखाद्या चेतनायुक्त आणि अफाट विवेकी शक्तीने स्वत:हून एखाद्या विशिष्ट उद्देशपूर्तीसाठी त्यांना अस्तित्व प्रदान करून त्यात गती निर्माण करावी लागते.

याशिवाय आणखीन एक गोष्ट अशी की आता सृष्टीचा यांत्रिक दृष्टिकोन रद्द ठरविण्यात आला असून विज्ञानाच्या संशोधनातून ही बाब स्पष्ट होत आहे की आपण व्यक्तित्व आणि विचार वा विवेकास विश्वाचे मूळ कारण असल्याचे स्वीकारावे आणि या सृष्टीस एका महान कल्पनेसम स्वीकारावे. सर जेम्स जीन्स (Sir James Jeans) आणि लॉर्ड नेगटन (Lord Negton) यांची हीच विचारसरणी आहे. प्राध्यापक व्हाइट हेड (Prof. White Head) यांच्या दृष्टिकोनानुसार, जोपर्यंत स्वत: सृष्टीच्या पलीकडे अगर अनैसर्गिक सामर्थ्य असलेल्या शक्तीचा स्वीकार करण्यात

येत नाही, तोपर्यंत विश्वाच्या व्यवस्थाबद्ध संरचनेची व्याख्या शक्य नाही. सर जेम्स जीन्स यांचे मत असे आहे की विश्व हे महान यंत्रापेक्षा एक महान विचार आहे. हे बाह्य जगत ज्यास समान रूपात आपण सर्वचजण अनुभवतो, भोगतो (ते आपल्या व्यक्तिगत विचारशक्तीऐवजी) एका अशा विश्वव्यापी विचार अथवा चेतनाशक्तीत आहे, ज्याशी आपणा सर्वांचा संपर्क आहे किंवा ज्याचे आपण सर्वजण घटक आहोत.

हे विश्व आणि मानव नेहमीपासून नसल्याचे सर्वत्र वैज्ञानिकांनी स्वीकार केले आहे. आता प्रश्न असा आहे की एखाद्या रचनाकाराशिवाय एखाद्या रचनेची कल्पना करणे शक्य आहे काय? कोणताही आधार नसताना कोणत्याही संरचनेची कल्पना करणेदेखील शक्य नाही. मग इतक्या विशाल व विस्तीर्ण विश्वाला आधारहीन असल्याचे कसे म्हणता येईल? हाच प्रश्न स्वत: कुरआनने केला आहे,

"ईश्वराबाबतीत काही शंका आहे काय जो आकाशांचा आणि धरतीचा रचयिता आहे." (कुरआन १४:१०)

मग ज्याअर्थी पृथ्वी आणि आकाशाच्या अस्तित्वाबाबतीत आपण मुळीच शंका बाळगू शकत नाही, त्याअर्थी त्यांच्या निर्मात्या ईश्वरासंबंधी शंका घेण्याचे काय कारण असू शकते? कुरआनात स्पष्टपणे म्हटले आहे,

"हे (सत्य नाकारणारे) कोणत्याही वस्तुविना निर्माण झाले आहेत काय? का हेच आहेत निर्माण करणारे?" (कुरआन ५२ : ३५)

ईश्वर हा ईश्वरी गुणांनी संपन्न आहे. तो सर्वव्यापी, अजरामर आहे. तो सर्वज्ञ व सर्वदृष्टा आहे. तो तत्त्वदर्शी आणि दयावान आहे. तसेच तो स्वाभिमानीसुद्धा आहे. त्याला केवळ तेच लोक प्रिय आहेत, जे त्याच्या आदेशांचे पालन करतात. जोपर्यंत अवाज्ञाधारक आपली नीती बदलून आज्ञाधारक होत नाहीत, तोपर्यंत तो त्यांना पसंत करणार नाही. कुरआनात स्पष्टपणे म्हटले आहे,

"तुम्ही ईश्वराचा स्वीकार कोणत्या आधारावर करीत नाहीत, जेव्हा की, तुम्ही निर्जीव होता, त्याने तुम्हाला जीवित केले. मग तोच तुम्हाला मृत्यू देतो, मग तोच तुम्हाला परत जीवित करील, मग त्याच्याचकडे तुम्हाला जावे लागणार." (कुरआन २ : २८)

अर्थातच ईश्वराचे दैवी सामर्थ्य आणि चमत्कार तुम्ही स्वत:च्या डोळ्यांनी पाहत आहात, इतक्या जवळून ईश्वरी चमत्कार अनुभवता आहात की तुमचे जीवन हेसुद्धा त्याच्याच कृपा आणि सामर्थ्याचा अगदी जीवंत पुरावा आहे. मग त्या ईश्वराचा इन्कार करण्याचे कारण

याशिवाय आणखीन काय असू शकते की तुम्हाला ना सत्य - असत्याची चिंता आहे ना कोणाच्या उपकाराप्रति आपल्या कर्तव्याची तुम्हाला जाण आहे. मात्र हे विसरता कामा नये की प्रकरण येथेच संपत नाही, एवढ्यावर कोणाचेच भागणार नाही. हा अध्याय सुरूच राहणार. ईश्वर जीवन देतो आणि त्यानंतर मृत्यू देतो. मात्र मृत्यूनंतर तो परत जीवित करणार, भल्या-बुऱ्या आणि काळ्या-पांढऱ्या कर्मांचा हिशेब घेणार, क्षणाक्षणाचा जाब घेणार, चांगल्या कर्माचा चांगला आणि वाईट कर्मांचा वाईट बदला देणार हे निश्चित. कोणालाही असे म्हणता येणार नाही की हे विश्व अंधेरनगरी आहे. कुरआनात आहे,

"तोच आहे ज्याने तुमच्यासाठी कान आणि डोळे तसेच हृदय निर्माण केले. (मात्र) तुम्ही थोडीशीच कृतज्ञता व्यक्त करता." (कुरआन २३:७८)

थोडक्यात असे की जर तुम्ही ईश्वराला मानित नाही अगर त्याच्या आदेशांची तुम्हाला काहीही पर्वा नसते, तर वस्तुत: ना तुम्ही डोळ्यांचा आणि कानाचा वापर केला असता ना आपल्या अंत:करणाचा अथवा हृदयाचा तुम्ही आदर केला असता. कुरआनात आहे,

"तो ईश्वर आहे, ज्याच्याशिवाय कोणीही आराध्य नाही, गुप्त आणि उघड प्रत्येक गोष्टीची खबर राखणारा, तोच दयाळू आणि कृपाळू आहे. तो ईश्वरच आहे, ज्याच्याशिवाय कोणी आराध्य नाही, तो शासक आहे अत्यंत पावन, परिपूर्ण सुरक्षा प्रदान करणारा, शांती प्रदान करणारा, विश्वास ठेवण्यासारखा, निगा राखणारा, प्रभुत्वशाली, जबरदस्त (तुटलेल्यांना जोडणारा) आणि आपले महिमत्व स्पष्ट करणारा व त्याची जाणीव करून देणारा, महान व प्रभुत्वशाली, तो ईश्वर एकमेव आराध्य, तो नियोजन करणारा आणि यानुसार निर्मिती करणारा व आकार देणारा आहे. त्याची उत्तम संबोधने आहेत." (कुरआन ५९:२२-२४)

विचार करण्याची बाब अशी की ईश्वराचा इन्कार करून मानवाला यश आणि साफल्य कसे मिळेल?

## ८) नैतिक दृष्टिकोनानुसार विचार

याविषयी आपण नैतिक दृष्टिकोनानुसार विचार करू शकतो. 'मिस्टर काण्ट' (Mr. Kant) नंतर ईश्वरी सत्ता अगर सामर्थ्याच्या प्रमाणाविषयी नैतिकतेसंबंधी असलेल्या प्रमाणांना बरेच महत्त्व प्राप्त झाले. प्रत्येक व्यक्ती नैतिक-चेतना अनुभवते. 'मिस्टर काण्ट' (Mr. Kant) च्या मतानुसार नैतिक चेतना मान्य केल्यावर नैतिक दायित्वाची पूर्ती आपल्यासाठी सर्वथा अनिवार्य असल्याचे वाटते. नैतिक कायदा एका स्पष्ट अनिवार्य आदेशाच्या स्वरुपात

आपल्या समोर येतो. याबरोबरच आपल्याला हासुद्धा विश्वास होतो की तेच जीवन वस्तुत: बुद्धी, विवेक व सृष्टी स्वभावास अनुकूल आहे, जी नैतिक नियमांच्या अंतर्गत असेल. नैतिक दायित्वाची ही चेतना एक अशी वास्तविकता आहे जी स्वयंसिद्ध आहे. ही वास्तविकता सिद्ध करण्यासाठी कोण्या एखाद्या बाह्य प्रमाणाची मुळीच आवश्यकता नाही. ही वास्तविकता स्वयंप्रकाशित सूर्यासारखी आहे, जिला पाहण्यासाठी इतर प्रकाशाची आवश्यकता नसते.

आता प्रश्न असा पडतो की या नैतिक चेतनेस पदार्थाची उपज म्हणता येणे शक्य आहे काय अथवा पदार्थास नैतिक चेतनेचा आधार ठरविता येईल काय किंवा पदार्थ अगर भौतिक वस्तूंमध्ये आपल्याला आपल्या नैतिक कर्तव्याची जाणीव करून देण्याचा गुणधर्म आढळतो काय आणि तेसुद्धा अशा प्रकारे की ते उचित असण्यात आपल्याला कोणत्याही प्रकारची शंका नसावी? तर या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर असे आहे की भौतिक वस्तु या मुळात नैतिक चेतनेचे मूळ स्रोत नाहीतच, शिवाय हेसुद्धा मान्य करावे लागेल की पुण्य, सदाचार आणि भलाईच्या कल्पनेमागे कोण्या अतिमहान चेतनसामर्थ्याचा हात आहे. अर्थातच एक चेतनसामर्थ्यच मानव-जीवनास कायद्याच्या अधीन राहण्याची प्रेरणा देऊ शकते.

नैतिक चेतनेची जाणीव आपल्याला हे मान्य करण्यास बाध्य करते की आपली दृष्टी संकुचित नसावी. आपण तात्कालिक लाभ-तोट्याच्या लोभ आणि भयापासून मुक्त असावे. याचे कारण असे की कधीकधी आपल्याला नैतिक कर्तव्यपूर्तीमध्ये धन अगर स्वार्थाची हानी तसेच नैतिक कर्तव्याचे उल्लंघन करण्यात धनाचा लाभ अथवा स्वार्थपूर्ती दिसून येते. उदाहरणार्थ, तुम्ही एका अशा व्यक्तीची कल्पना करा, जिला रस्त्याने चालताना एक ब्रीफकेस सापडली. या ब्रीफकेसमध्ये हजारोंच्या नोटा ठासून भरलेल्या आहेत. ब्रीफकेसमध्ये एक डायरीसुद्धा आहे. त्या डायरीमध्ये ब्रीफकेसच्या अथवा त्यातील पैशांच्या मालकाचा फोटो, संपूर्ण पत्ता व मोबाईल क्रमांकसुद्धा आहे. नैतिक चेतनेची अशी मागणी असते की तो पैसा त्याच्या मालकाला जशासतसा परत करावा. खरे पाहता या ठिकाणी कर्तव्यपूर्तीस थारा न देता ती व्यक्ती हजारो रुपये प्राप्त करू शकते. येथूनच ही गोष्ट स्पष्ट होते की नैतिकतेचा आधार हा एखादे अत्यंत उच्च लक्ष्यच असू शकतो. अर्थात त्या पैशापेक्षा येथे आपल्या लक्ष्याचे अधिक महत्त्व जाणवावयास हवे असते. कारण कर्तव्यपालन करायचे म्हटले तर धन, संपत्ती, पैसाअडका आणि ऐशोआरामच नव्हे तर प्राणाचीसुद्धा आहुती द्यावी लागते. मग शेवटी हे 'लक्ष्य' काय आहे, जे प्राप्त करण्यासाठी आपली नैतिक चेतना आपल्याला सामान्य लाभ-तोट्याच्या लोभ आणि भयापासून दूर राहण्याची प्रेरणा आणि आदेश देते आणि प्रेरणा व आदेशसुद्धा असा

यथार्थ, जो आपल्या अंत:करणाची साद असावी अगर आत्मप्रेरित असावे. मग असे लक्ष्य भौतिक पदार्थांच्या आधारे निर्माण होणे शक्य आहे काय? नाही... नाही... आणि मुळीच नाही! जेव्हा नैतिक चेतना आपल्याला भौतिक लाभ व तोट्याच्या लालसा आणि भय झुगारून देण्याचे संकेत देते, तेव्हा हे कसे शक्य आहे की भौतिक वस्तुंद्वारे ते लक्ष्य निर्माण झाले असेल आणि तेसुद्धा असे जे स्वत: भौतिक वस्तुंना नैतिकतेच्या तुलनेत उच्च ठरवित असेल. हे लक्ष्य तर एका अतिउच्च आणि परमोच्च सत्ता वा सामर्थ्यशाली अस्तित्वानेच निश्चित केलेले असू शकते, जे मानवामध्ये नैतिक चेतना तेवत ठेवण्याचे सामर्थ्य बाळगते व याबरोबरच जे अत्यंत महान व परमोच्च अस्तित्व आहे. एका ईश्वराची कल्पना केल्याशिवाय नैतिक चेतनेची कोणतीही समाधानकारक व्याख्या करणे मुळीच शक्य नाही, ही वास्तविकता आहे.

## ९) एक विशेष तथ्य

कुरआनाचे अध्ययन केल्यास एक विशेष तथ्य समोर येते. ते म्हणजे 'जर मनुष्य हा संवेदनाक्षम आणि त्याच्यात अनुभूतीची प्रचंड शक्ती आहे, तर या विश्वामध्ये त्याला सर्वत्र सत्याचे स्पष्ट दर्शन होते. या ठिकाणी कुरआनातून काही उदाहरणे सादर करणे योग्य ठरेल.

"ईश्वराचे स्तुतीगान करीत आहे प्रत्येक वस्तु आकाशात आणि धरतीमध्ये आहे. त्याचेच राज्य आहे आणि त्याचीच स्तुती आहे, आणि त्यास (ईश्वरास) प्रत्येक गोष्टीचे सामर्थ्य प्राप्त आहे." (कुरआन १ : ६४)

कुरआनच्या या आयतीतून विश्वासंबंधी एक विशेष तथ्य समोर येते आणि मनात काहूर माजविणाऱ्या एका मूळ प्रश्नाचे उत्तरदेखील मिळते. या आकाश आणि पृथ्वी तसेच यामध्ये उपलब्ध समस्त वस्तु, त्यांच्या हालचाली आणि कार्यक्रम बुद्धीहीन व हृदयविहीन व्यक्तीसाठी कोण्या महान अलौकिक सत्याचे द्योतक नव्हे. मात्र वास्तविकता याच्या अगदी उलट आहे. विश्व आणि या विश्वातील प्रत्येक वस्तु एका महान सत्यतेचे दर्शन घडविते. अगदी पुस्तकाप्रमाणेच पुस्तकातील शब्द ज्याप्रमाणे पुस्तकातील मजकूर व्यक्त करतात अगदी त्याचप्रमाणे विश्व आणि त्यातील प्रत्येक वस्तु जणू सत्य व्यक्त करणारे शब्दच. या वस्तु मुळात वस्तु नसून अगदी शब्दच आहेत, या शब्दांतून एका महान आणि शक्तिशाली सामर्थ्याचे दर्शन घडते. ज्या चांगल्या आणि प्रशंसा करण्यायोग्य वस्तु आपल्याला येथे दिसतात, त्यातून चेतन-शक्ती व सामर्थ्याचा पूर्ण परिचय होतो. जे प्रभुत्व या विश्व किंवा या ब्रह्मांडातून अनुभवास येते, त्याला कोणताही आधार कसा नसणार? असे तर शक्यच नाही. लक्षात न येणारी बाब ही नाही की या विश्वाचा एक महान

सृष्टा आणि निर्माता व संचालक आहे, तर लक्षात न येणारी बाब ही आहे की प्रभुशिवाय प्रभुत्वाची कल्पना आणि कर्त्याशिवाय कार्याची कल्पना करणे कसे शक्य आहे.

याशिवाय या सृष्टी अथवा विश्वास पाहून एखाद्या भावूक हृदयातून एका अदृष्य आणि माहीत नसलेल्या शक्ती-सामर्थ्यासाठी स्तुती आणि प्रशंसेचे जे शब्द आपोआप फुटू लागतात, त्यांना अर्थ नसतो काय? हे सर्वकाही पाहून माणसाने तोंड बंद जरी ठेवले तरीसुद्धा हे महान विश्व मुळात गप्प बसलेले नसते. ते तर प्रत्येक क्षणी बोलत आहे. त्याच्या कणाकणांत एका अतिमहान सामर्थ्य व कौशल्याच्या स्तवनाचे गीत बाहेर येत आहे आणि हे स्तवनगीत कधीच बंद होणार नाही. ही शक्ती आणि सामर्थ्य म्हणजेच 'अल्लाह' अगर ईश्वर होय.

संशयी विचारसरणीचा विचारवंत 'डेव्हिड ह्यूम' (David Hume) यांच्या तोंडूनसुद्धा संध्याकाळी घरी येतेवेळेस आपल्या मित्रासमोर असे शब्द बाहेर पडले की,

"When one looks at the sky studded with stars, he can not but feel that it is all the work of as Intelligent Being."

" आपण जेव्हा ताऱ्यांनी जडलेले आकाश पाहतो, तेव्हा निश्चितच असे वाटते की हे सर्वकाही अत्यंत बुद्धिमान असलेल्या चेतनशक्तीचे कार्य आहे."

कुरआनाचे दुसरे उदाहरण घेऊ या.

"जे काही ईश्वराने निर्मिले, ते त्यांनी पाहिले नाही काय, त्याच्या सावल्या ईश्वरास सजदा करताना उजव्या आणि डाव्या बाजूस पडतात, या अवस्थेत ते नम्रता प्रकट करतात."

(कुरआन १६ : ४८)

आणखीन एकेठिकाणी म्हटले आहे,

"शेवटी तुमची मने कठोर झाली, पाषाणासारखी कठोर, एवढेच नव्हे तर त्यापेक्षाही कठोर, कारण एखाद्या दगडाला तरी पाझर फुटतो, एखादा दगड पलटून त्यातून पाणी निघते आणि एखादा दगड ईशभयाने घाबरून खालीसुद्धा पडतो." (कुरआन २ : ७४)

एखादी वस्तु खाली पडणे म्हणजे एखाद्या उच्चतेचा भास होतो. त्याचप्रमाणे उच्चता ही वास्तविक रूपाने एका ईश्वरालाच प्राप्त आहे. त्याच्यासमोर प्रत्येक वस्तु नतमस्तक आणि झुकलेली आहे. ज्या ठिकाणी ज्या स्वरुपात पतन होण्याचे दर्शन होते, त्या ठिकाणी वास्तविक स्वरुपात ते पतन ईश्वरासमोर असते. प्रत्येक प्रकारचे पतन आणि नतमस्तक होणे हे ईश्वर महान असण्याचे संकेत देते. एखाद्या वृक्षाची वा इतर वस्तुची सावली पडून केवळ आपल्या दीनताच

नव्हे तर ईश्वराची महानतासुद्धा साकारते. हीच दीनता आणि नति मुळात ईश्वरासमोर नतमस्तक होणे होय.

याचप्रमाणे पर्वतावरून एखादा दगड खाली पडणेसुद्धा फार मोठी वास्तविकता व्यक्त करतो आणि ती वास्तविकता हीच आहे की ईश्वर महान आणि सर्वोच्च आहे. जर उच्चता व महानतेचे अस्तित्वच नसेल तर पडणे आणि पतन होण्याला काही अर्थच नसेल. उच्चता आणि महानता ईश्वराचा गुण आहे. नति आणि पतन ज्या ज्या ठिकाणी व ज्या ज्या स्वरुपात आहे, ते इतर कोणासमोर नसून ईश्वरासमोरच आहे. एखाद्या पर्वताच्या शिखरावरून एखादा दगड पडला तर कोणी याचा काहीही अर्थ सांगतो, मात्र याचे वास्तविक कारण हेच आहे की तो ईश्वराच्या भयाने अगर ईश्वरास उच्च आणि महान समजूनच खाली पडला. ईश्वराशिवाय कोणतेच असे अस्तित्व नाही, ज्यासमोर हे विश्व आणि त्यातील वस्तु नतमस्तक होतात आणि भय बाळगतात. जगात दृष्टीगोचर होणारी आणि अनुभवास येणारी प्रत्येक उच्चता ही ईश्वरी उच्चतेचेच संकेत देते. याचप्रमाणे येथील प्रत्येक पतन आणि नति वास्तविक दृष्टीने ईश्वरी सामर्थ्यापुढेच आहे. ही वास्तविकता कोणत्याही क्षणी नजरेपासून दूर होवू नये, यातच जीवनाची सार्थकता आहे.

विश्वनिर्माता असलेल्या ईश्वराने वस्तूंच्या केवळ बाह्यरचनाच नव्हे तर आंतर्रचना, गुणधर्म व स्वभावसुद्धा आपल्याच मर्जीनुसार ठेवलेले आहे. खरे पाहता या समस्त वस्तु त्यानेच प्रेरित आणि प्रभावित आहेत. या प्रेरणा आणि प्रभाव ज्या ज्या ठिकाणी आणि ज्या ज्या स्वरुपात व्यक्त होतो, तेथे हे स्पष्टपणे निदर्शनास येते की समस्त वस्तुंचे गुण आणि वैशिष्ट्ये ईश्वरी सामर्थ्याच्या अधीन आहेत. त्यातून कोठे ईश्वराची दया दिसते, कोठे त्याचा प्रताप परिलक्षित होतो तर कोठे त्याचे तेज तळपताना भासते. काही ठिकाणी त्याचे सौंदर्य संकलित करताना दिसतात तर काही त्याने भयभीत झालेल्या दिसतात.

कुरआनाच्या या उदाहरणावरून या गोष्टी स्पष्ट होतात की मनुष्य जर भावनाशील आणि अनुभूतिशील असेल आणि त्यात सूक्ष्मदृष्टीने पाहण्याचा गुणधर्म असेल, तर त्यास सर्वत्र ईश्वरी सामर्थ्याची साक्ष मिळेल. प्रत्येक वस्तु विविध स्वरुपात त्याच्या समोरच नतमस्तक दिसेल. 'सजदा' आणि महिमागायन हेच खऱ्या अर्थाने ईश्वराकडे संकेत करण्याचे साधन आहे. वस्तुंचे गुणधर्म आणि वैशिष्ट्य हे ईश्वरी प्रभाव आणि प्रेरणेपासून भिन्न नाहीत. त्याचप्रमाणे सृष्ट वस्तूंमध्ये त्याच्या प्रभावाची अभिव्यक्ती 'सजदा'च्या स्वरूपातच संभव आहे. कुरआनात म्हटले आहे,

"तुम्ही पाहिले नाही काय की पृथ्वी व आकाशातील प्रत्येक वस्तु, सूर्य, चंद्र, तारे, पर्वत, वृक्ष, प्राणी आणि बरेच मानव ईश्वरालाच सजदा करतात आणि यांपैकी बऱ्याचजणांवर ईश्वराचा कोप होईल." (कुरआन २२:१८)

यावरून हे स्पष्ट होते की केवळ मानवालाच या गोष्टीचा अख्त्यार दिला आहे की ईश्वरासमोर 'सजदा' करण्याचा अर्थात त्याच्यासमोर नतमस्तक होण्याचा इन्कार करावा. मात्र त्याची ही भूमिका त्याच्यासाठीच घातक होय. विश्वातील आणि सृष्टीतील समस्त वस्तु ईश्वरापासून प्रेरित आणि प्रभावित होत आहे. अर्थात ईश्वरी प्रेरणा आणि प्रभावच मुळात त्या वस्तुचा आत्मा सिद्ध होत आहे. आता ज्या वस्तु प्रत्यक्षपणे नतमस्तक झालेल्या दिसतात. त्यांचे हे बाह्यस्वरुप त्यांच्या आत्मा आणि वास्तविकतांचेच द्योतक आहे, ज्यामुळे सहजरित्या त्यांच्या मूळ अगर वास्तविक स्वरुपाकडे आपले ध्यान आकर्षित होते.

## १०) धर्माची मूळ प्रवृत्ती आणि ईशधारणा

धर्मामध्ये ईशधारणेला केंद्रबिंदू समजण्यात येते. इतर समस्त बाबी याच केंद्रबिंदूच्या सभोवताली भ्रमण करीत आहेत. धर्माविषयी साधारणत: विचारवंतांनी जी धारणा सादर केली, त्यात सत्याचा काही अंश अवश्य आहे, मात्र त्यात धर्माची पूर्ण व्याख्या येत नाही. समाजशास्त्र, मानसशास्त्र आणि मानवशास्त्र वा इतर अशा प्रकारच्या शास्त्रांनी धर्माची वास्तविकता जाणून घेण्यासाठी आपापले योगदान दिले. तत्त्वज्ञ आणि दर्शनशास्त्रज्ञांनी धर्माच्या विचारात्मक पैलूवर आपले लक्ष मोठ्या प्रमाणात केंद्रित केले. त्यांनी धर्माला ज्ञान, आंतरदृष्टी वगैरे उपाधी दिल्या. धर्म हे विश्वाप्रति एक धारणा असल्याचे म्हणून त्यास दार्शनिक स्वरुप देण्याचे त्यांनी प्रयत्नसुद्धा केले. एवढेच नव्हे तर 'मिस्टर क्रोस' (Mr. Croce) यांच्या विचारानुसार, धर्म हे एक अपूर्ण दर्शनच आहे. जे जीवनासंबंधीचे तथ्य आणि वास्तविकता स्पष्ट करण्यासाठी विविध उपाधी आणि उपमांचा आधार घेते.

आणखीन एक दृष्टिकोन असा आहे की धर्म नैतिकतेचेच दुसरे नाव आहे. धर्मामुळे मानवाचे चरित्र आणि कर्म सुधारते. या दृष्टिकोनामुळे नैतिक जीवनात इच्छाशक्तीला विशेष महत्त्व प्राप्त आहे.

आणखीन एक दुसरा वर्ग हा विचार आणि इच्छा या दोन्ही दृष्टिकोनांपेक्षा एक भिन्न प्रकारची धारणा समोर ठेवतो. या मतानुसार, धर्माचा मूळ आधार अनुभूती अथवा जाणीव किंवा चेतना होय. मग यानुसार, आपल्या दीनता आणि आत्मसमर्पणाची जाणीव असो किंवा

एकप्रकारचे भय जे सामान्य भयापेक्षा नितांत भिन्न असते. ही जाणीव आपल्या उच्च स्तरावर मनाला पाझर फुटण्याच्या आणि आदरातिथ्याच्या भावनेच्या स्वरुपात व्यक्त होते. ही आपल्या निर्मात्यासमोर आपली प्रतिक्रिया आहे. याबरोबरच यामध्ये एकप्रकारची असमर्थता आणि विवशतेची भावना, विस्मय आणि रहस्यमय सत्तासामर्थ्यासमक्ष ज्ञानाच्या एकप्रकारे असमर्थ असण्याची भावनासुद्धा आढळते, तसेच हे धर्मांचे एक अनिवार्य तत्त्व असल्याचेसुद्धा प्रतीत होते. मानवचेतनेमध्ये ईश्वराच्या परिकल्पनेचे एक भीतीयुक्त रहस्य आहे, ज्यामुळे मानवामध्ये भय आणि कंपन निर्माण होते, मात्र याबरोबरच त्या रहस्यमय सामर्थ्य आणि सत्तेप्रति एका विलक्षण, अद्‌भुत आणि मनोरम आकर्षणाचा अनुभवसुद्धा होतो.

वरील मजकुरात ज्या तीन प्रकारच्या विचारसरणींचा उल्लेख करण्यात आला, त्या प्रत्येकात सत्याचा अंश आहे, मात्र ही प्रत्येक व्याख्या धर्माची एक अपूर्ण व्याख्या आहे. वास्तविकता अशी आहे की धर्म हा मानवाच्या संपूर्ण व्यक्तिमत्वास आच्छादित करू इच्छितो. सत्यधर्मात बौद्धिक तत्त्वांना मुळीच डावलण्यात आले नाही. तरीसुद्धा त्यात आस्था अगर श्रद्धेलादेखील विशेष महत्त्व आहे, त्यात रहस्यतेचा अंशसुद्धा आढळतो. धर्म एक विचारधारा आणि जीवनपद्धतीसुद्धा आहे. यामध्ये मानवाचे विचार, हेतु, इच्छा व संकल्पालासुद्धा मान्यता असून याबरोबरच यामध्ये ईश्वरी सहयोग, कृपा आणि सहायतेची कामना व विश्वाससुद्धा ओतप्रोत भरलेला दिसतो. धर्माला संशयित नजरेने पाहण्याची गरज नाही. धर्मामुळे मानवाच्या समस्त गरजा, ज्यामध्ये आंतरिक गरजांचाही समावेश आहे, पूर्ण होणे शक्य आहे. धर्म मानवाच्या संपूर्ण जीवनाची एक परिपूर्ण व्याख्या आहे. धर्माशिवाय आपल्याच अस्तित्वास अर्थ उरत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

जे सत्य माणसाला बुद्धीच्या माध्यमाने प्राप्त होत नाही, ते सत्य कधीकधी त्याला आपल्या आंतरिक दृष्टीने प्राप्त होते. कारण बुद्धीबरोबर एक प्रकारचा संदेह आणि द्विधा असण्याची शक्यता आहे. मात्र अंत:करणाची साद अशी असते की त्यासमोर शंकाकुशंका आणि संदेहाचा काळोख पार नष्ट होतो. ज्याप्रमाणे सुर्योदयामुळे रात्रीचा काळोख नष्ट होतो, त्याचप्रमाणे आंतरिक प्रकाशासमोर संदेहाच्या काळोखाची काय बिसात, ही आंतरिक शक्ती कशाप्रकारे कार्य करते, याचे एक उत्तम उदाहरण आम्ही देत आहोत.

'मिस्टर एडवर्डस' याने आपल्या व्यक्तिगत अनुभवानंतर म्हटले की ईश्वरी अस्तित्वाचा अनुभव एक भावनाशील व्यक्तीच करू शकते. तर्क-वितर्क आणि पुराव्यामुळे आपल्या अंत:करणाच्या कामना अगर मागण्या पूर्ण होत नाहीत. मिस्टर एडवर्डसच्या मनात

ईश्वराच्या सर्वशक्तिमान असण्याच्या सिद्धान्ताप्रति बऱ्याच अडचणी होत्या. मात्र या समस्त अडचणी क्षणार्धात दूर झाल्या आणि तेही अगदी विलक्षणरित्या.

ईश्वर आणि दैवी गोष्टींमध्ये आंतरिक आणि मनोहर आनंद वा संतोष त्याने अनुभवला, तो अगदी पहिला प्रसंग. हा प्रसंग त्याला त्याक्षणी आठवला, जेव्हा त्याची नजर बायबलच्या या शब्दांवर रेंगाळली,

"आता अनंत:, अनश्वर, अदृष्य नरेश, एकमात्र ज्ञानमय, ईश्वरासाठी सदा आणि सदा सन्मान." (तथास्तु) (१ तीमुथियुस १, १७)

मिस्टर एडवर्डस याने लिहिले आहे की, हे शब्द वाचताच दैवीरूपी महिमत्वाच्या एका भावनेने माझ्या आत्म्यात प्रवेश केला आणि जणू समस्त आत्म्यावर आपला प्रभाव टाकला. ही भावना अतिशय विलक्षण, विचित्र, जी यापूर्वी कधीच न अनुभवलेली, मागील समस्त अनुभवांपेक्षा अगदीच भिन्न अशी होती. यानंतर दैवी गोष्टीसंबंधी माझी भावना हळूहळू वाढत गेली आणि अधिकाधिक जीवंत होत गेली, तसेच त्यात आंतरिक गोडवा निर्माण झाला, वाढतच गेला. प्रत्येक वस्तुचे स्वरूप बदलले, सर्वकाही वेगळेच दिसू लागले. असे भासू लागले जणू प्रत्येक वस्तुमध्ये ईश्वरी महिमत्वाचे मधुर आणि मनोरम प्रतिबिंब आहे. (संदर्भ : Jonothon Edwarda : Reprsentative Sections, New York, 1935, Page 58, 59, 60)

एडवर्डसच्या, मतानुसार, सामान्य 'संकल्पक्रियेत' संकल्प हे वास्तवामध्ये 'विवेकाच्या अंतिम' आदेशाच्या माध्यमाने निर्मित होत असते. मात्र अलौकिक भावनेचा विषय याहून अगदी भिन्न आहे. कारण याठिकाणी मात्र ईश्वरी महिमत्वाच्या अनुभूती अगर ग्राह्यतेमुळे त्यात विवेक निर्माण होतो. एडवर्डसने म्हटले आहे की याच्या तार्किक निर्णयात की 'मध हे गोड असते आणि त्याच्या गोडव्याच्या आस्वादामध्ये फरक असतो', एखाद्या वस्तुच्या उत्कृष्टता व परिकल्पित तार्किक निर्णयामध्ये आणि त्याच्या माधुर्य व सौंदर्याच्या भावनेत खूप अंतर आहे. पहिल्याचा आधार हा केवळ मस्तिष्कात असून त्याचा संबंध मात्र कल्पनेशी आहे, तर दुसऱ्या गोष्टीचा संबंध अंत:करणाशी आहे. ज्याअर्थी अंत:करणात एखाद्या वस्तुच्या सौंदर्याचे आकर्षण निर्माण होते अथवा त्या वस्तुचा लळा लागतो, तेव्हा ती वस्तु ग्रहण केल्यास हृदय आणि अंत:करणास असीम सुख मिळते, हे निश्चित. (संदर्भ : Representative Selection, Page No. 107)

मनोवैज्ञानिक दृष्टिकोन ठेवणाऱ्या विचारवंतांच्या मनन-चिंतनातूनसुद्धा एका विश्वात्म्याचे रहस्योद्घाटन केले आहे. उदाहरणार्थ 'जी.ए.को.', 'ई.एस.ब्राइटमॅन', 'एस.सी.नुडसन' आणि 'आर.टी. फ्लेवलिंग' या सर्वांचेच असे मत आहे,

"सगळी मूल्ये आणि परिप्रेक्ष्य अर्थ, व्यक्तित्वाचेच घटक आहेत. म्हणून व्यक्तित्व हाच अंतिम अनुभाविक पदार्थ आहे. त्याचप्रमाणे ईश्वर हा व्यक्तीचे व्यक्तित्व आहे."

दर्शनशास्त्राचा हा मजकूर आस्तिकतेचे समर्थन करणारा आहे. त्याचप्रमाणे याचा दृष्टिकोन हा मानसिक आहे.

'जॉन केयर्ड' याने म्हटले आहे,

"चेतनेचा अंतिम आधार हा व्यक्ती (प्राण), त्याचा आत्मा नव्हे. जर व्यक्ती अधिक सार्वभौम चेतनेवर जी त्याच्या पाठीशी आहे, आधारित नसती तर तिच्या आत्म्याला काहीच अर्थ नसता."

त्याचप्रमाणे 'ऋग्वेदाच्या' पुरुष सुक्त (१०-९०) मध्येसुद्धा या परम सामर्थ्याचा उल्लेख 'पुरुष' या शब्दानेच करण्यात आला आहे तो अशा प्रकारे,

"पुरुष एवेदं सर्व यद् भूतं यच्च भव्यम्" अर्थात पुरुषच सर्वकाही आहे, जो पुढे वर्तमान आहे, जो अतीत झाला आहे आणि जो पुढे भविष्यातही असेल. या संपूर्ण जगात पूर्ण राहिलेला आहे, त्यास पुरुष असे म्हटले गेले आहे. 'पुर' या शब्दाचा अर्थ 'ब्रह्मांड' आणि 'शरीर' असा होतो. एका ब्रह्मांडामध्ये जो सर्वत्र व्याप्त आहे आणि जो जिवाच्या किंवा प्राणाच्या आतसुद्धा व्याप्त आहे, तोच परमपुरुष ईश्वर होय.

वेदामध्ये ईश्वरासाठी 'अप' हा शब्दसुद्धा वापरण्यात आला आहे. वेदमंत्रात आहे,

"ओ शन्नो देवीरभिष्टम आपो भवंतु पीतये।
शंयोरभी सवंतु नः॥ (संदर्भ यजुर्वेद, ३६-१२)

अर्थात : "सर्वांना प्रकाशमय करणारा, सर्वांना आनंद देणारा आणि सर्वव्यापक ईश्वर मनोवांछित आनंदासाठी आणि पूर्व आनंदाच्या प्राप्तीसाठी आपल्याला कल्याणकारी होवो. तोच परमेश्वर आपल्यावर सुखाची सर्वथा वर्षा करो."

या मंत्रामध्ये 'देवीः आपः' हा शब्द लक्ष देण्यासारखा आहे. 'आप्लृ व्याप्तौ' या धातूने 'अप' हा शब्द सिद्‌ध होतो. 'दिवु' धातूने ज्याचा अर्थ क्रीडा वगैरे होतो, 'देवी' शब्द सिद्ध होतो. 'देवीः आपः' या शब्दापासून ईश्वर अभिप्रेत आहे, जो सर्वांना प्रकाशमय करतो, आनंद देतो आणि सर्वव्याप्त आहे. अशा प्रकारे आपण पाहतो की, ज्या विशेष गुणामुळे वेदामध्ये ईश्वरास 'पुरुष' असे म्हटले गेले आहे, त्याच गुणामुळे त्याच्यासाठी 'अप' हा शब्द वापरण्यात आला आहे.

## ११) एक प्रश्न

या ठिकाणी हा प्रश्न विचारला जाऊ शकतो की जर ईश्वर आहे तर तो आपल्या अस्तित्वाची सूचना अथवा संकेत का देत नाही? जगात कित्येकजन त्याच्या अस्तित्वासंबंधी शंका-कुशंकांच्या भोवऱ्यात पडलेले आहेत, शिवाय त्याच्याप्रति सर्वांच्या नीती आणि भूमिकासुद्धा भिन्न आहेत. अशा बिकट अवस्थेत ईश्वर मात्र गुपचूप तोंडावर बोट ठेवून बसला. याला काय अर्थ? मात्र या प्रश्नाचे उत्तर अगदी सरळ आणि स्पष्ट आहे. ईश्वर कधीच गुपचूप बसलेला नाही, बसूही शकत नाही. त्याने प्रत्येक काळात, प्रत्येक युगात आणि प्रत्येक प्रदेशात आपला संदेश पाठविला. मानव-इतिहासामध्ये प्रेषितांची एक लांबलचक शृंखला पाहायला मिळते. प्रेषितांच्या मूलभूत शिकवणी नेहमीच एकच होत. सर्वांनीच ईश्वराकडे लोकांना हाक दिली. सर्वच प्रेषितांनी लोकांना ईश्वराप्रति जे कर्तव्य असते, त्याने अवगत केले. हे इब्राहीम (अ.), मूसा (अ.), ईसा (अ.) वगैरे कोण होते? यांच्या माध्यमाने ईश्वराने मानवजगतास संबोधित केले नाही काय? अंतिम प्रेषित मुहम्मद (स.) यांनी समस्त विश्वातील समस्त मानवांसमोर ईश्वराचा संदेश ठेवला नाही काय? त्यांचा संदेश तर अशा परिपूर्ण, अबाधित व अविनाशी स्वरुपाचा आहे की, हे जग असेपर्यंत समस्त मानवांच्या मार्गदर्शनासाठी पुरेसे आहे. ईश्वराने त्याच्या वाणीतून आपल्या मनात उठणाऱ्या शंका व संदेहाचे काळोख नष्ट केले. ही एक वास्तविकता आहे की प्रेषित म्हणजेच ईश्वराचा संदेश घेऊन येणारे हे स्पष्ट संकेत आणि प्रमाण घेऊन आले. त्यांचे पवित्र जीवनच या गोष्टीची साक्ष देते की ते सच्चे व प्रामाणिक होते. प्रेषितांचे या जगात येणे हेच ईश्वरी सामर्थ्याचे अगर ईश्वरी अस्तित्वाचे सर्वात मोठे प्रमाण आहे. ईश्वरासंबंधी सर्वांत जास्त विश्वसनीय ज्ञान म्हणजे प्रेषितांच्या माध्यमाने अवतरित झालेले ज्ञान होय. कुरआनमध्ये प्रेषित मूसा (अ.) यांच्या बाबतीत म्हटले आहे,

"जेव्हा प्रेषित मूसा (अ.) तरूण झाले आणि त्यांची शारीरिक वाढ पूर्ण झाली, तेव्हा आम्ही त्यास आदेश किंवा कायदा आणि ज्ञान प्रदान केले." (संदर्भ : कुरआन २८:१४)

प्रेषित इब्राहीम (अ.) आपल्या पित्यास म्हणतात,

"हे पिताजी! माझ्याकडे एक असे ज्ञान आहे, जे तुमच्याकडे नाही. तुम्ही माझ्या मार्गदर्शनाने चाला, मी तुम्हास मार्ग दाखवीन." (संदर्भ : कुरआन १९:४३)

त्याचप्रमाणे कुरआनात प्रेषित दाऊद (अ.) आणि सुलैमान (अ.) यांच्या बाबतीत आहे,

"त्यांच्यापैकी प्रत्येकास आम्ही कायदा आणि ज्ञान प्रदान केले."

(संदर्भ : कुरआन २१:७३-७४)

प्रेषित मुहम्मद (स.) यांना म्हटले गेले आहे,

"आणि ईश्वराने प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यावर ज्ञानग्रंथ आणि तत्त्व आणि असे ज्ञान दिले जे त्यांना पूर्वी नव्हते." (संदर्भ : कुरआन ४:११३)

प्रेषितांचा ईश्वराशी प्रत्यक्ष संबंध आणि संपर्क असतो. त्याने दिलेली सत्याविषयी सूचना संदेह आणि शंकामुक्त असते. त्याचे शब्द हे सत्याची कसोटी असतात. प्रेषित हे ज्ञान-विश्वात सूर्याप्रमाणे चमकतात आणि अज्ञानाचा अंधार दूर करतात. मात्र ही गोष्ट वेगळी की काहीजण डोळे बंद करून बसतात.

## १२) अंत:करणाची हाक

ईश्वरी अस्तित्व स्वीकारण्याचा संबंध हा बुद्धी अगर तर्काशी नाही. ईश्वराचा स्वीकार करणे हे मानवाचा स्वाभाविक गुणधर्म आहे. मुळात हा स्वीकार हृदयात विधमान आहे. ज्याप्रमाणे या जगातील 'शिव' आणि 'सुंदरते'ची व्याख्या ईश्वाराचा स्वीकार केल्याशिवाय अशक्य आहे, त्याचप्रमाणे मनाच्या अथवा अंत:करणाच्या कोमल आणि पावन भावनांची व्याख्यासुद्धा ईश्वराचा स्वीकार केल्याशिवाय अशक्य आहे. अंत:करणात दृढ प्रेम, सेवा आणि समर्पनाची भावना विराजमान असते. या भावनेचा अनादर आणि उपेक्षा करणे म्हणजे स्वत: मानवाचा तिरस्कार होय. ईश्वरावर विश्वास अगर श्रद्धेचा मानवाच्या व्यक्तिमत्त्वाशी खूप दृढ संबंध आहे. हा सुमन आणि सौंदर्य, अग्नी आणि ज्वाला, जल आणि प्रवाहासारखा संबंध आहे.

ज्याप्रमाणे बाह्यजगत हे ईश्वरी प्रभावांतर्गत कार्यरत आहे, स्वयं मानवी शरीरातील रक्ताभिसरण, चयापचय क्रिया वगैरे सर्वकाही ईश्वरी आदेश आणि नियमांच्या अधीन कार्यरत आहेत, त्याचप्रमाणे हेसुद्धा अपेक्षित आहे की, शरीराप्रमाणेच मानवाचे अंत:करणसुद्धा ईश्वराकडे आकृष्ट व्हावे, त्याच्याकडून विमुख होता कामा नये. मुळात हेच अंत:करण अगर हृदयाचे सूक्ष्म वैशिष्ट्य आहे, जी धर्म आणि ईश्वरवादाची आधारशीला आहे. ईश्वर ज्याप्रमाणे आपल्या शरीराचा निर्माता आहे, त्याचप्रमाणे आपल्या आंतरिक मनोवृत्तीचासुद्धा निर्माता आहे. त्यामुळे हे आपले परम कर्तव्य आहे की, शरीराप्रमाणेच ईश्वराच्या या आंतरिक सूक्ष्म रचनेलासुद्धा विकृत होऊ देता कामा नये. आपल्याला हे आवडेल काय की आपले नाक-कान कापून अगर हात-पाय तोडून आपले शरीर विकृत करण्यात यावे? मुळीच नाही! त्याचप्रमाणे आपले आंतरिक स्वास्थ्यसुद्धा अभिष्ट असावयास हवे. तेसुद्धा विकृत होऊ देता कामा नये. हीच गोष्ट कुरआनात अशा रितीने स्पष्ट करण्यात आली आहे,

"याच सृष्टीस्वभावावर कायम व्हा ज्यावर ईश्वराने मानवास निर्माण केले. ईश्वराने तयार केलेली वृत्ती बदलणे शक्य नाही. हेच बिलकुल रास्त आणि सत्यधर्म आहे. मात्र लोकांना माहीत नाही."

(संदर्भ : कुरआन ३०:३०)

अर्थातच विशुद्ध धर्म म्हणजे केवळ हेच की मानवाने आपली नैसर्गिक आणि स्वाभाविक मागणी पूर्ण करावी. याची उपेक्षा आणि अनादर करून केवळ धर्माचाच नव्हे तर आपले निर्मळ व नादर स्वरूपसुद्धा नष्ट करणे होय. खरा धर्म हा आपल्या आत्म्याचा विकास आहे. धर्म हा आपल्या प्रकृती अथवा स्वभावाचा निषेध नसून धर्म हा तर आपल्या आंतरिक भावनांना पूर्णाकार बनवितो. एखादे कार्य जर धर्मविरुद्ध असेल तर याचा स्पष्ट अर्थ असा की ते कार्य आपल्या प्रकृती आणि आपल्या स्वभाव व आत्मिक स्वरूपाच्या प्रतिकूल आणि विरुद्ध आहे. म्हणूनच कुरआनात म्हटले गेले आहे,

"निश्चितच सफल झाला तो माणूस त्याने आत्मशुद्धी केली आणि विफल झाला तो ज्याने त्याला दाबून टाकले."

(संदर्भ : कुरआन ९१ : ९, १०)

ईश्वर हा आपल्या हृदयाचा एकमात्र आश्रय आहे. तो असा पुरुष आहे, ज्याच्या आभा व कांतीने समस्त ब्रह्मांड व्यापलेले आहे. एवढेच नव्हे तर आपले अंतरसुद्धा त्याच्याच कांतीने प्रकाशमय आहे. आपले शरीर जीवित राहण्यासाठी अन्न, पाणी, हवा वगैरेसारख्या कित्येक वस्तूंची गरज असते. आपल्याला हेसुद्धा चांगल्याप्रकारे माहीत आहे की यापैकी कोणतीही वस्तु अशी नाही, जी आपल्या अस्तितत्वाशी निगडीत असेल, तर आपल्या शरीराबाहेर या वस्तूंचे भंडार उपलब्ध आहेत. मग एवढे असूनसुद्धा मानवास आत्मिक दृष्टीने स्वत:मध्येच पूर्ण होण्याचा भ्रम का बरे होतो? शारीरिक आवश्यकतांच्या पूर्ततेसाठी तो आपल्या बाहेरून अन्न-पाणी वगैरे शोधत असतो, भटकत असतो. मग एका ईश्वरास प्राप्त करण्याच्या इच्छेची मुस्कटदाबी का बरे करतो? तसेच अशा भ्रमान कशासाठी पडतो की त्याचा जीवनाशी काही संबंधच नाही. खरे पाहता आपल्या आंतरिक आणि आत्मिक मागण्यांची पूर्तता ही मुळात ईश्वर पावल्याशिवाय होणे शक्य नाही. भौतिक आनंदाचे वर्तुळ खूप मर्यादित असून ते हृदय-कामनांची साथ देऊ शकत नाही. ईश्वराशिवाय जीवनाची व्याख्याच अनिश्चित व अपुरी आहे. जीवन आणि अमृत त्याच्याच छायेत आहे. 'यस्य छाया मृतम' नास्तिकतेनंतर हृदय ज्या दशेत जीवित राहते, त्याची कशी दशा अगर दुर्दशा होते, यासाठी 'डेविड ह्यूम (David Hume)' चे उदाहरण पुरेसे आहे. त्याने 'Treatise of Human Nature' या पुस्तकात आपल्या मानसिक अशांतीचे वर्णन करताना लिहिले आहे,

"मी काय आहे? मी कोठे आहे? कोणत्या स्थानावरून माझे जीवन प्रवाहित झाले आणि कोठे मी जाणार आहे? मग कोणाच्या कृपेची मी आशा बाळगतो आणि कोणाच्या कोपाची भीती वाटते? माझा कोणावर प्रभाव आहे आणि कोण माझ्यावर प्रभाव टाकतो? माझ्या चोहीकडे या प्रश्नांचे काहूर उठलेले आहे. मी अत्यंत निराशपूर्ण अवस्थेत विचारमग्न आहे. माझ्या चोहीकडे अंधकार आहे आणि माझी मानसिक शक्ती आणि अंग शिथिल होत आहे."

खरी गोष्ट अशी आहे, ईश्वरी अस्तित्व स्वीकार करणे आणि त्याच्याप्रति आपले कर्तव्य पूर्ण करणे हे असेच सुखद आणि स्वाभाविक आहे, जसे एका स्वस्थ व्यक्तीसाठी आपले जीवन सुखद आणि स्वाभाविक असते. मानवास आपले जीवन किती प्रिय असते, या गोष्टीवरून अनुमान करता येते की बऱ्याचजनांना या कारणास्तव अन्य विषयांवर विचार करण्याची संधीच मिळत नाही. त्यांना आपले जीवन कंटाळवाणेही वाटत नाही आणि आपले दैनंदिन कार्य त्यांना अवघडही वाटत नाही असे का? याचे कारण काय? तर याचे हेच कारण आहे की त्यांचा आपल्या जीवन-वैशिष्ट्यांशी घनिष्ट संबंध असतो. त्यांच्या व्यक्तित्व आणि जीवन-वैशिष्ट्यांमध्ये काहीच अंतर व वैविध्य दिसत नाही. आपल्याला ज्या स्वरुपात अस्तित्व मिळाले आहे, ते अत्यंत सुखद, मधुर व मनोरम आहे. जीवनाप्रति वैराग्याने आपला आत्मा अपरिचित आहे.

यासंबंधी ठोस दृष्टिकोन असा आहे की ज्याप्रमाणे मानव जीवनाचा स्वीकार आनंदाने, सहर्ष करतो, जीवनास आपल्यावर ओझे समजत नाही, नापसंत आणि न आवडणाऱ्या ओझ्यासारखे समजत नाही. नेमक्या याचप्रमाणे मानवाने सहर्ष आणि सानंद ईश्वराचा स्वीकार करावा. त्याच्याप्रति आपले कर्तव्य समजून घेतले पाहिजे. ईश्वराचा स्वीकार करणे हे काही जीवनविरोधी तत्त्व मुळीच नाही. उलट याचा आपल्याशी तसाच घनिष्ट संबंध आहे, जसा स्वयं आपल्या जीवनाशी आपला घनिष्ट संबंध आहे.

मानवाचे अंत:करण हे आपल्या ईश्वरास बरोबर ओळखते. ईश्वराचा स्वीकार हे मानव स्वभावत:च आहे. ईश्वराला नाकारणे म्हणजे स्वत: आपल्यालाच नाकारणे होय. जीवन आणि जीवनहेतु या दोन्ही पैलूंनी ईश्वराशी आपला घनिष्ट संबंध आहे. आत्मा परमात्म्यामुळेच आहे. ईश्वराशिवाय आत्म्याचे स्वतंत्र आणि मुक्त असे अस्तित्व मुळीच नाही.

"God minus world equals God. The world minus God equals nothing."

(अर्थात : विश्वाच्या अस्तित्वाशिवाय ईश्वर हा ईश्वरच असतो. मात्र ईश्वराशिवाय विश्वाचे काहीच अस्तित्व नसते.")

आरशात ज्याप्रमाणे आपल्या प्रतिबिंबाचे स्वतंत्र अस्तित्व नसते. आपण नसलो की आरशात काहीच नसते. अर्थात प्रतिबिंबाचे काहीच अस्तित्व नसते. त्याचप्रमाणे आपले अस्तित्वसुद्धा स्वतंत्र अस्तित्व नसून ईश्वराच्या अस्तित्वावरच अवलंबून आहे. आरशामध्ये केवळ आपले प्रतिबिंब असते, आपण मात्र नसतो. त्याचप्रमाणे आत्मा अगर आपले अस्तित्व हे ईश्वरी गुणधर्माची केवळ छायाच आहे, स्वयं परमात्मा नाही.

ईश्वराने आपल्याला काय दिले नाही? आपल्याला आवश्यक असलेल्या सर्व बाबी त्याने प्रदान केल्या आहेत. पाहण्याचे-ऐकण्याचे सामर्थ्य दिले, सोबत अतिकोमलतम चेतना व अनुभूतींची शक्ती आणि सामर्थ्यसुद्धा प्रदान केले. मानवहृदय हे अत्यंत कोमलतम, सूक्ष्म आणि मधुर भावनांचे स्त्रोत आहे. मानव म्हणजे काही असे वाळवंट नाही, जे अगदी कोरडे, शुष्क, उजाड आणि हिरवळीचा लवलेश मात्र ज्या ठिकाणी नसावा. ज्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे सुंदर फूल उगविण्याची शक्यताच नसावी. यावरही जर मानवास आपल्या परम उपकारक इष्टपूज्य ईश्वराचा शोध घेण्याची कामना नसेल तर नवलच म्हणावे लागेल.

ही गोष्ट निश्चितच की, ईश्वरावर विश्वास ठेवण्याचा आधार हा तर्क मुळीच नसून संपूर्ण मानव-चेतना होय. जेव्हा मानव-आत्मा एखाद्या कारणास्तव विकल होतो. अथवा तळमळतो, तर ही बाब खरी असण्यात शंकाच काय आहे की त्याक्षणी तो आत्मा आपल्या प्रभूचा असा शोध घेतो, जसे एखादी तहाणेने व्याकूळ झालेली हरीणी पाण्याचा शोध घेत जंगलात वनवन धावत फिरते. याच तथ्याकडे कुरआनाने संकेत करताना म्हटले,

"तो कोण आहे, जो कासाविस होऊन हाक देणाऱ्याची हाक ऐकतो, जेव्हा हाक देतो, तेव्हा त्याचे संकट दूर करतो." (संदर्भ : कुरआन २७ : ६२)

लोकांजवळ अंत:करण अथवा हृदय असले तरीही हा प्रश्न बाकी उरतोच की हृदयात असलेली अलैकिक आशा-आकांक्षा कोणासाठी आहे? हृदयाच्या खऱ्या शांती, समाधान आणि संतोषाकरिता कोणती वस्तु आहे? जीवनाचा हा असा प्रत्यक्ष आणि स्थिर व दृढ पैलू आहे, जो त्याला त्याच्या ईश्वराशी संबंधित करतो. ईश्वरास नाकारण्याची भूमिका म्हणजे स्वत:लाच आघात पोचविणे होय. कुरआनात स्पष्ट म्हटले आहे,

"जाणून घ्या! केवळ ईश्वराच्या स्मरणानेच हृदयांना शांती आणि समाधान प्राप्त होते."

(संदर्भ : कुरआन१३:२८)

मानव जर चेतनाशून्य, भावनाशून्य नसेल आणि जागरुक व चरित्रवान असेल, तर तो कधीच ईश्वरविरोधी नीतीचा अवलंब करीत नाही. ईश्वर हा खरे पाहता त्याची गरजच नव्हे तर सर्वांत मोठी आणि प्रमुख गरज आहे. ईश्वराशी आपला संबंध जेवढा घनिष्ट असेल, तेवढाच तो ईश्वराचा कृतज्ञ आणि आज्ञाधारक असेल. हे एक असे मानसिक तथ्य आहे, ज्यावर कुरआनाने विश्वास आणि श्रद्धेचा पाया रोवला आहे. कुरआनात आहे,

"ईश्वर तुम्हास यातना देऊन काय साधेल? जर तुम्ही कृतज्ञता दाखवाल, आणि श्रद्धाधारण कराल तर ईश्वर स्वत: तुमची कदर करील आणि तो सर्वज्ञ आहे."

(संदर्भ : कुरआन ४ :१४७)

आणखी एक ठिकाणी म्हटले आहे,

"तोच आहे, ज्याने तुम्हाला निर्माण केले, आणि तुम्हाला कान, डोळे आणि हृदय प्रदान केले. तुम्ही थोडीशीच कृतज्ञता दाखविता." (संदर्भ : कुरआन ६७:२३)

हा केवळ तर्कासंबंधी विषय नाही की आपल्याला हे कान, नाक, डोळे आणि मन अथवा हृदय कोणी दिले. तर हा कृतज्ञतेचासुद्धा विषय आहे. ईश्वरावर विश्वास अगर श्रद्धेचा आधार हा केवळ तर्क नसून संपूर्ण मानव-चेतना आहे.

सामान्यत: असे म्हटले जाते की इस्लामच्या एकेश्वरवादात भावनेचा स्पर्श दिसत नाही. म्हणून तेथे मनुष्याच्या भावविश्वाचा व्यापक आधार पाहायला मिळत नाही. मात्र वस्तुस्थिती अशी आहे की हा एक फारमोठा गैरसमज असून शक्य होईल तितक्या लवकर दूर होणे आवश्यक आहे. संधी मिळाल्यास यावर स्वतंत्रपणे लिहिण्याचा विचार आहे.

## एकेश्वरवाद

ईश्वर एक आहे. ही केवळ एक वास्तविकताच नाही तर ती आपल्या निसर्गवृत्तीची खरी आणि परिपूर्ण व्याख्यासुद्धा आहे. हे आपल्यासाठी शुभ आहे. हृदयपूर्ण आणि आंतरमनाने करण्यात येणारी प्रामाणिक सेवा ही कोण्या एकाच्याच प्रति शक्य आहे. भक्ती आणि ईशसेवेसाठी मनाची एकाग्रता हवी असते. ही एकाग्रता अनेक प्रभुंची भक्ती करण्यात शक्य नसते. अनेकांबरोबर निष्ठा ठेवता येणे शक्य नाही. अनेकाबरोबर निष्ठा जोपासण्याचा दावा करणे म्हणजे एका पत्नीने अनेक पतींशी अगर अनेक पुरुषांशी निष्ठा जोपासण्याचा दावा करण्यासमान होय आणि असे करणे म्हणजे एकाचा विश्वासघात करून सर्वांशी व्यभिचार करण्यासम आहे. याशिवाय ईश्वर एक असण्याचा अर्थ असासुद्धा आहे की, प्रत्येक बाबतीत आपण त्याच एका ईश्वराची मर्जी जोपासली पाहिजे, मग यामुळे आपले ऐहिक नुकसान झाले तरी चालेल. आपल्याला त्याच्याच आज्ञेवर चालावे लागेल, केवळ त्याचीच गुलामी आणि त्याचेच दासत्व स्वीकारावे लागेल. आपल्या मनात सर्वांत जास्त प्रेम आणि आदर व महिमत्व त्याचेच असावयास हवे.

# कुरआन आणि अन्य ग्रंथांच्या भूमिका

## १) ईश्वर एक आहे

ईश्वराविना हे विश्व नाही आणि असूही शकत नाही. मग याबरोबर हेसुद्धा स्वीकारावे लागेल की ईश्वर एकच आहे, अनेक नाहीत. अनेक ईश्वरांची कल्पना करता येणे शक्य नाही. अनेक ईश्वरांची संभावना ही स्वयं ईश्वरत्वाच्या विरुद्ध आहे. एकापेक्षा अधिक ईश्वर स्वीकारण्यात आले तर त्यांच्यापैकी कोणालाही अपार सामर्थ्य आणि शक्तीने विभूषित असल्याचे स्वीकारता येत नाही. अर्थातच अशा प्रसंगी शक्ती आणि सामर्थ्याचे अस्तित्व खंडित होईल, शक्ती आणि सामर्थ्यांचे विभाजन होईल. अनेक ईश्वरांचे अस्तित्व ईश्वरी अधिकार आणि शक्तींना मर्यादित करणारे आहे. तसेच मर्यादित अधिकारांबरोबर आणि मर्यादित शक्तींबरोबर अनादी अस्तित्व शक्य नाही.

विश्वात दोन ईश्वरांची चिन्हे सापडत नाहीत. दोन विचारतत्त्व अथवा दोन विश्वव्यापी चिंतनक्रिया येथे मुळीच आढळत नाहीत. एकच चेतना आणि एकाच बुद्धीचे नियंत्रण समस्त ब्रह्मांडावर आहे. दोन परम अस्तित्वांचे एकत्र असणे शक्य नाही. कोणत्याही राज्यशासनात एकाचवेळी दोन आदेश चालू शकत नाहीत. अशाप्रकारे विश्वव्यवस्थाच बिघडून जाईल. कुरआनात म्हटले आहे,

"जर या दोन्ही (पृथ्वी आणि आकाशा) चे ईश्वराशिवाय इतर प्रभु असते, तर दोन्हीची व्यवस्था बिघडली असती." (संदर्भ : कुरआन २१:२२)

अर्थातच मानवाने दोन अगर अनेक प्रभुंची कामना करणे घोर अन्याय व अज्ञान आहे. कुरआनात असेदेखील म्हटले आहे,

"ईश्वर आपल्या दासांकरिता (मानवांकरिता) पुरेसा नाही काय?"

(संदर्भ : कुरआन ३९:३६)

एकच हृदय अगर अंत:करण किंवा मन प्राप्त असलेला मानव एकाच वेळी अनेक स्वामींच्या सेवेत असणे कसे शक्य आहे. एकाच अंत:करणाने अनेक प्रभुंची सेवा कशी शक्य होईल. अर्थातच त्याचे एकुलते एक हृदय अनेक स्वामींची भक्ती व श्रद्धा ठेवण्यास असमर्थ आहे. भक्ती ही अशी कोमल भावना आहे, जी विविध भागांत विभागली जाऊ शकत नाही. भक्ती ही एकाच प्रभुची अपेक्षा करते. म्हणजेच अनेक प्रभुंची धारणा आणि त्यांची आराधना करणे हे अत्यंत घोर अन्याय आहे, एवढेच म्हणता येईल. कुरआनच्या दृष्टीमध्ये तर असे लोक, जे एका प्रभुला सोडून अनेक प्रभुंची उपासना करतात, ते उच्चतम स्थानावरून खाली पडलेले अतिदुर्दशाग्रस्त असतात.

"जो ईश्वराचा भागीदारी ठरवील, तो जणू आकाशातून पडला. आता त्याला पाखरे उचकून घेवो की वाऱ्याने उडून तो दूर जाऊन पडो." (संदर्भ : कुरआन २२:३१)

आणखीन एकेठिकाणी म्हटले आहे,

"तुम्ही पाहात नाहीत काय की पृथ्वी आणि आकाशादरम्यान जे काही आहे, ते ईश्वरासमोर नतमस्तक होतात, सूर्य, चंद्र, तारे, पर्वत आणि वृक्षे व प्राणी आणि बरेच मानवसुद्धा." (संदर्भ : कुरआन २२ : १८)

मानवी निसर्गस्वभाव जर विकृत नसेल तर तो अवश्य अनेकेश्वरवादाऐवजी एकेश्वरवादालाच हृदयाशी कवटाळेल. हीच वास्तविकता कुरआनात अशारितीने मांडण्यात आली आहे,

"ईश्वर एक उदाहरण देतो. एक असा माणूस आहे ज्याचे भरपूर मालक आहेत, जे त्याला आपापल्या आज्ञा पाळण्यासाठी ओढत असतात आणि दुसरा माणूस पूर्णत: एकाच मालकाचा दास आहे. या दोन्ही माणसांची अवस्था सारखी असू शकते काय? (मुळीच नाही) मात्र ही गोष्ट बरेचजण समजून घ्यायला तयार नाहीत." (संदर्भ : कुरआन ३९ : २९)

कुरआन ही गोष्ट स्पष्ट करु इच्छितो की शांती आणि समाधान हे केवळ एकेश्वरवादातच आहे. अनेकानेक आराध्यांची आणि देवांची भक्ती व आराधना तसेच दासत्व सुख आणि मनाची शांती प्राप्त करता येत नाही. सरळ आणि सच्चा धर्म तर हाच आहे की मनुष्याने एका ईश्वरास आपला आराध्य आणि प्रभु स्वीकार करून त्याची आराधना सेवा करण्यात मग्न व्हावे. कोणत्याही इतर विभूतीस ते स्थान अथवा दर्जा मुळीच देता कामा नये, जो केवळ ईश्वराचा आहे. एकाच ईश्वराचे दासत्व व सेवा हेच मानवाकरिता श्रेयही आहे आणि अभिमानही आहे. ईश्वराव्यतिरिक्त काही अन्य उपास्य ठरवून त्यांची उपासना करणे हे केवळ ईश्वराच्या अधिकारात हस्तक्षेप करणेच नव्हे तर स्वत: आपली प्रतिष्ठासुद्धा मातीत मिसळणे होय. 'प्रेषित यूसुफ (अ.)' यांनी कैदेत असताना जे भाषण दिले होते, त्यामध्ये विशेषत: हे तथ्य समोर ठेवण्यात आले की अनेकेश्वरवाद, कृतज्ञतेची नव्हे तर कृतघ्नतेची नीति होईल की ईश्वराने मानवास केवळ आपलाच दास बनविले, आपल्याशिवाय इतर कोणाच्याही दासत्व आणि आराधनेसाठी मानवास त्याने निर्माण केले नाही. हे तर ईश्वराचे आपल्यावर खूपच मोठे उपकार आहे की त्याने त्याच्याशिवाय इतरांसमोर मान तुकविण्याच्या नामुष्कीपासून आपल्याला वाचविले. आता कोणी जर ईश्वराच्या या महान उपकारास नाकारून इतरांना ईश्वराच्या विशेष पदावर बसवू इच्छित असेल किंवा ईश्वराचा दर्जा देत असेल, तर तो स्वत:ला पतनाच्या खोल अंधकुपात टाकून घेत आहे.

"मी त्या लोकांची जीवनपद्धत सोडून, जे ईश्वरावर श्रद्धा ठेवित नाहीत आणि परलोकाचा इन्कार करतात, मी आपले पूर्वज इब्राहीम, इसहाक आणि याकूब यांची पद्धत अवलंबिली आहे. ईश्वरामध्ये इतर कोणाला भागीदार ठरविणे हे आपल्याला शोभणारे नाही. खरे पाहता आपल्यावर ईश्वराची कृपाच आहे आणि सर्वच मानवांवर की त्याने त्याच्याशिवाय इतर कोणाची भक्ती व दासत्व करण्यासाठी दुर्बुद्धी दिली नाही. मात्र बरेचजण कृतज्ञता व्यक्त करीत नाहीत." (संदर्भ : कुरआन १२ : ३७,३८,३९,४०)

ईश्वरासंबंधी स्वत: कुरआनने म्हटले आहे,

"ईश्वर हा जीवंत आणि अविनाशी अस्तित्व आहे, जो समस्त विश्वाला सांभाळून ठेवत आहे. त्याच्याशिवाय कोणीही ईश्वर नाही. तो ना कधी झोपतो ना त्याला डुलकी लागते. जमीन आणि आकाशात जे काही आहे, ते सर्व त्याचेच आहे. कोण आहे, जो त्याच्या परवानगीशिवाय शिफारस करील. जे काही मानवदासांसमोर आहे, त्याचीही त्याला खबर आहे आणि जे आपल्याला माहीत नाही, तेसुद्धा त्यास माहीत आहे. त्याच्या माहितींपैकी कोणीतीही बाब इतर कोणाच्या विवेकशक्तीच्या आवाक्यात येऊ शकत नाही. अपवाद एवढाच की एखाद्यास जर त्याने काही स्वत:हून प्रदान केले असेल. त्याची हिकमत आकाश आणि पृथ्वीवर अच्छादित आहे. यांची देखरेख केल्याने त्यास कधीही थकवा येऊ शकत नाही."

(संदर्भ : कुरआन २ : २५३ ते २५५)

ईश्वर हा नित्य आहे, नेहमीपासून आहे, काळ आणि समयाचे त्याला बंधन लागू होत नाहीत. तो नेहमी कायम आणि जीवंत राहणार, अर्थातच तो अविनाशी वा नश्वर आहे. ईश्वरासंबंधी हा प्रश्नच निर्माण होत नाही की त्याचा निर्माता कोण आहे आणि तो केव्हापासून आहे. कारण 'केव्हा' या शब्दाचा संबंध युगाशी अगर काळाशी आहे आणि ईश्वर हा मात्र ईश्वर हा काळाच्या परिभाषेतून मुक्त आहे. त्याचा कोणी पिता अगर सृष्टा असण्याची कल्पना करणेसुद्धा घोर अज्ञान आहे.

## कुरआनाव्यतिरिक्त अन्य धर्मग्रंथांची साक्ष

कुरआन हा ईश्वरी ग्रंथाच्या स्वरूपात आपल्यासमोर आहे. याबरोबरच कुरआनाने हा संदेशसुद्धा दिला की ईश्वरी संदेश या जगामध्ये पहिल्यांदा आलेला नसून यापूर्वीही विभिन्न काळात आणि विभिन्न देशात आला. कुरआनने भविष्यात या संदेशाची रक्षा करण्याचा विश्वास प्रदान केला. त्याने स्पष्टपणे म्हटले की स्वयं ईश्वरच या संदेशाचे रक्षण करील, यास विनाशापासून वाचवेल. प्रेषित येण्याची शृंखला बंद करण्यात आली. प्रेषित मुहम्मद (स.) हे अंतिम प्रेषित आहेत.

येथे प्रश्न असा पडतो की कुरआनापूर्वी जे ईश्वरी संदेश आले होते, त्यांचे काही अवशेष अगर भग्नावशेष या जगात सापडतात काय? आम्ही याच प्रश्नांचे येथे योग्य उत्तर देऊ इच्छितो. काळामध्ये कित्येक परिवर्तन आलेत, काळ बदलत गेला आणि काळाच्या ओघात प्रत्येक गोष्ट बदलत गेली. धर्मस्वरूपसुद्धा याला अपवाद नाही. धर्माचे स्वरूप कित्येकवेळा काळानुरूप विकृत झाले. मात्र सत्याची समस्त चिन्हे नष्ट होत नसतात. आपल्याला याची अशी प्रत्यक्ष चिन्हे आजही सापडतात, ज्यावरून हे मात्र सिद्ध होते की कुरआनाचा हा दावा निश्चितच सत्य आहे की मानवास नेहमीच ईश्वरी संदेशाने अवगत करण्यात आलेले आहे. मानवांना भटकण्यासाठी कधीच वाऱ्यावर सोडून देण्यात आलेले नाही. कित्येक प्रेषितांचा उल्लेख स्पष्टपणे स्वत: कुरआनाने केला आहे. ज्या प्रेषितांचा कुरआनाने उल्लेख केला, ते काही काल्पनिक चरित्र नसून ते धर्मइतिहासातील प्रसिद्ध विभूती आहेत. त्यांच्या व्यक्तित्वाची गडद छाप मानव-हृदयावर पडलेली आढळते. हीच परिस्थिती कुरआनच्या मूळ शिकवणींचीसुद्धा आहे. कुरआनच्या मूळ शिकवणी समोर ठेवून जेव्हा आपण प्राचीन धर्मांचा अभ्यास करतो, तेव्हा त्याची स्पष्ट चिन्हे आपल्याला प्राचीन ग्रंथांमध्ये सापडतात. यावरून हेच सिद्ध होते की, कुरआनची शिकवण काही नवीन नाही. कुरआनच्या पुष्टीसाठी बरीच साधन-सामग्री जगाच्या धार्मिक अवशेषांमध्ये सापडते. या प्राचीन धर्मग्रंथातील अवशेषांतून हे पाहावयास मिळते की कुरआनने दिलेल्या शिकवणी या नवीन नसून प्राचीन धर्मग्रंथांतसुद्धा कुरआनच्या शिकवणींचे अवशेष आढळतात. आपण जास्त विस्तारामध्ये न जाता कुरआनातील एकेश्वरवादासंबंधी असलेली शिकवण समोर ठेवून काही अशा साक्षी आणि पुरावे पाहू या, ज्यावरून निश्चितच आपल्या लक्षात येईल की एकेश्वरवादाची शिकवण काही नवीन नसून कुरआनचे हे मत सत्य आहे की प्राचीन धर्मग्रंथातसुद्धा ही शिकवण प्रचारित आणि प्रसारित करण्यात आली होती.

## वेदांची साक्ष

सर्वप्रथम जगातील अत्यंत प्राचीन असलेल्या वेदांचा आढावा घेऊ या. वेदांमध्ये एकेश्वरवादाची पुष्टी होत असलेल्या काही बाबी आपण येथे उदाहरणादाखल घेऊ या.

१) एको विश्वस्य भुवनस्य राजा । - ऋग्वेद ६/३६/४

अर्थात : या संपूर्ण ब्रह्मांडाचा राजा एकच आहे.

२) एक एवं नमस्यो बिक्ष्वि ऽ य :। - अथर्ववेद २/२/१

अर्थात : एक ईश्वरच स्तुती आणि नमस्कार करण्यास पात्र आहे.

३) नत्वावांर अन्यो दिव्यो न पार्थिवो न जातो वा जानिष्यते। -यजुर्वेद २७/३६

अर्थात : (हे ईश्वर!) तुजसारखा इतर कोणीही द्युलोकातही नाही आणि पृथ्वीच्या पदार्थातही नाही. ना तुजसमान कोणी जन्मला नी जन्मणार.

४) महद यक्षं भवनस्यं मध्ये तपसि क्लान्तं सलिलस्य पुष्टे। तस्मिन श्रयन्ते ये के च देवा, वृक्षस्य स्कन्ध परित इव शाखा॥ - अथर्ववेद १०/७/३८

अर्थात : समस्त विश्वात एक मोठी पूज्य शक्ती वर्तमानात विराजमान आहे; ज्याचे ज्ञान अनंत आहे; जो या संपूर्ण सृष्टीची अधिष्ठाता आहे. जेवढ्या दिव्य शक्ती आहेत, त्या सर्व तिच्यावरच आश्रित आणि अवलंबून आहेत, जसे वृक्षाच्या बुंध्यावर त्याच्या फांद्या आश्रित आणि अवलंबून असतात.

५) ईशावास्यमिंद सर्व यत्किंच जगत्यां जगत्। - यजुर्वेद ४०/१

अर्थात : या चराचर जगामध्ये म्हणजेच सजीव आणि निर्जीव सृष्टीमध्ये जी काही गती आहे, ती सर्व त्या सर्वशक्तीसंपन्न परमेश्वराने अच्छादित आहे.

६) इंद्र मित्रं वरूणमग्नि माहुरथो दिव्य: स सुपर्णो गुरुत्मान।

एक सद्विप्रा बहुधा वदन्त्यग्नि यमं मातरिश्वानमाहु:॥ - ऋग्वेद १/१६४/४६

अर्थात : विद्वान लोक त्याच एका अस्तित्वास अनेक नावांनी हाक देतात, त्याला अग्नी, यम, मातारिश्वा म्हणतात, त्या ज्ञान-स्वरूपास इंद्र, मित्र, वरूण म्हणतात आणि ते दिव्य, सम्यग्ज्ञानवान, उत्कृष्ट पालन शक्तीसमान आणि गौरववान आहे.

७) दिव्यो गन्धर्वो भुवनस्य यशपतिरेक एवं नमस्य विक्ष्वीऽय:।

तं त्वा यौमि ब्रह्मणा दिव्य देव नमस्ते अस्तु दिवि ते सधनस्थम्॥ - अथर्ववेद २/२/१

अर्थात : जो अद्भुत भवन धारण करणारा आहे, जो भवनांचा एकच स्वामी आहे, तोच प्रजांमध्ये नमस्कार करण्यास आणि प्रशंसा करण्यास आणि स्तुती करण्यास पात्र आहे. तुला मी प्राप्त होत आहे. तुला नमस्कार असो. तुझा वास तुझ्याच प्रकाशात आहे.

८) न द्वितीयो न तृतीयश्चर्यो नाप्युच्यते।

न पंचमो न षष्ठ: सप्तमो नाप्युच्यते॥

नाष्टमो न नवमो दशमो नाप्यच्यते।

स सर्वस्मै विपश्यति यच्च प्राणिति यच्च न॥

तमिदं निगतं सर: स एष एक-एक वृदेक एवं।

सर्व अस्मिन देवा एक वृत्तो भवंति॥ - अथर्ववेद १३/४/१६-२१

अर्थात : तो ईश्वर ना दुसरा ना तिसरा आणि ना चौथा म्हटला जाऊ शकतो. तो पाचवा, सहावा आणि सातवाही म्हटला जाऊ शकत नाही. (अर्थात ईश्वर एक आहे, असे मुळीच नाही की, ईश्वराचा लहान-मोठा एखादा समूह असेल.) तो त्या सर्वांना स्वतंत्रपणे पाहतो जे श्वास घेतात

अथवा घेत नाहीत. या सर्व शक्ती त्याच्याच आहेत. शक्तींनी परिपूर्ण समस्त सृष्टी त्याच्याच आश्रित आहेत. तो एक आहे. अद्वितीय वर्तमान आहे आणि निश्चितच तो एक आहे.

९) तदेवाग्निस्तदादित्यस्तद्वायुस्तदु चंद्रमा:।

तदेव शुक्रं तद ब्रह्म ता आप स प्रजापति:॥ - यदुर्वेद ३१/१

अर्थात : तोच परमात्मा अग्नि, आदित्य, वायु, चंद्रमा, शुक्र, ब्रह्म, आप: आणि प्रजापति इत्यादी संबोधने धारण करतो.

१०) ज्योतिरसि विश्वरुपम्। - यजुर्वेद ५/३५

अर्थात : तु प्रत्येक ठिकाणी विराजमान असणारा प्रकाश आहेस.

११) प्रत्यरुजनास्तिष्ठती सर्वतो मुख:। - यजुर्वेद ८/३२/८

अर्थात : तो परमेश्वर सर्वतोमुख होऊन (अर्थात सर्वासमोर सर्वत्र) विराजमान होतो.

१२) एवं ज्योतिर्बहुधाविभाति। - अथर्ववेद १३/३/१७

अर्थात : एकच प्रकाश आहे, जो विविध रूपांमध्ये आलोकित होत आहे.

१३) य एक इद हव्यश्चर्षणीता मिन्द्रं त गीभीर्रभ्यनों आभि य: पत्यते वृष्णय वृष्णयावान्त्स त्य: सत्वा पुरुमाया: महस्वान्। - ऋग्वेद ६/२२/१

अर्थात : जो ईश्वर संपूर्ण मानव-विश्वाचा एकच उपास्य आहे, त्याचेच या वाणीद्वारे चांगल्याप्रकारे स्तवन करा. तोच सुखांची वर्षा करणारा, सर्वशक्तिमान, सत्यस्वरुप, सर्वज्ञ आणि समस्त शक्तींचा अधिपती आहे.

१४) अत्यमेक इत्थ पुरुरु चष्टे विविश्पति तस्य् ब्रन्तान्यनु वश्चरामसि।

- ऋग्वेद ८/२५/१६

अर्थात : तो एकच ईश्वर समस्त प्रजेचा स्वामी आहे. तो सर्वांचा कुशल निरीक्षक आहे. आपण आपल्या कल्याणास्तव त्याच्या आज्ञांचे पालन करीत आहोत.

१५) वेदाहमतं पुरुष महान्तमादित्य वर्णन्तमस: परस्तात।

तवेव विदित्वत्ति मृत्युमेतिनान्य: पन्थाविद्यते ऽ यनाय॥ - यजुर्वेद २/४/१८

अर्थात : मी त्या महान प्रभुला ओळखतो, जो अंधकाररहित आहे आणि ज्योतिस्वरुप आहे. त्याला जाणूनच मनुष्य मृत्यू पार करतो आणि कोणताही मार्ग मुक्तीचा नाही.

१६) नासदासीन्नो सदासीत्तदानीं नासीद रजो नो न्योमा परो यत्।

किमावरीव: ? कुह कस्य शर्मन? अम्भ: किमासीद् गहरं गंभीरम्॥

न मृत्युरासीदमृतं न तर्हि न रात्र्या अह्य: आसीत् प्रकेत:।

आसीदवातं स्वध्या तदेकं तस्मान्दान्न पर: किंचनास॥ - ऋग्वेद १०/१२९

अर्थात : "सृष्टीच्या आदीकाळात ना असत् होते ना सत् होते. तेथे ना आकाश होते ना स्वर्ग होता, जो त्याच्या पार आहे, कोण झाकेल होते? हे कोठे होते? आणि कोणाच्या रक्षणात होते? त्या ठिकाणी गंभीर आणि गहिरे पाणी होते काय? त्यासमयी मृत्यू नव्हता आणि अमरत्वही नव्हते. त्या समयी दिवस आणि रात्रीचा फरक नव्हता. त्या काळी बस एकच होता, जो वायुरहित असून आपल्या सामर्थ्याने श्वास घेत होता. त्यापेक्षा जास्त इतर कोणतीच गोष्ट नव्हती. त्या एकाचा (तदेकं) चमत्कार कोणत्या रुपात पाहिला जाऊ शकतो?" वेदात म्हटले आहे,

"मनुष्यांच्या मधुर वाणींतून तोच बोलतो, पक्ष्यांच्या किलबिलाटांमध्ये तोच चिवचिवाट करतो, विकसित पुरुषांच्या रुपांत तोच हसतो, प्रचंड गर्जन आणि वादळात तोच क्रोधभाव प्रकट करतो, आकाशमंडळात चंद्र, सूर्य आणि ताऱ्यांना तोच सतत स्थानावर स्थिर करतो." 'ऐतरेय अरण्यकाने' स्पष्टपणे प्रतिपादित केले की,

"एकाच महिम अस्तित्वाची उपासना ऋग्वेदी लोक 'उक्थात' करतात. त्यालाच वजुर्वेदी लोक 'याज्ञिक अग्नि'च्या रुपात आणि सामवेदी लोक 'महाव्रत' नामक योगामध्ये उपासना करीत आहेत." (संदर्भ : ऐतरेय अरण्यक, इ-२-३-१२१)

वेदांच्या अभ्यासावरून एक परम-अस्तित्वावर धारणा ठेवण्याचे प्रतिपादन केवळ प्राचीन काळातील विद्धानांनीच केले असे नव्हे तर, नेमकी हीच भूमिका वर्तमानकाळातील विद्धानांनीसुद्धा व्यक्त केली.

(१) स्वामी विवेकानंद यांनी लिहिले की,

"वेद ते वास्तविक ईशप्रेरित ग्रंथ आहेत, ज्यांमध्ये एका ईश्वराचे ज्ञान प्रदान करण्यात आले आहे." (संदर्भ : दे. स्वामी विवेकानंदांची पत्रे मद्रासच्या लोकांच्या नावे)

वेदांमध्ये एकेश्वरवादाचा स्पष्ट उल्लेख असल्याचे पाहूनच,

(२) 'डब्ल्यू.डी. ब्राउन (W. D. Brown)' यांनी आपल्या 'Superiority of the Vedic Religion' या पुस्तकात लिहिले आहे की, It (Vedic Religion) recognises but one God.

अर्थात : "वैदिक धर्म एकेश्वरवादाचेच प्रतिपादन करतो."

(३) मिस्टर 'श्लेजेल (Schlegel)' यांनीसुद्धा म्हटले आहे,

"ही गोष्ट नाकारता येत नाही की अगदी सुरुवातीच्या काळातील भारतीयांना वास्तविक ईश्वराचे ज्ञान प्राप्त होते."

(४) मिस्टर अर्नेस्ट वूड (Mr. Earnest Wood) यांनी लिहिले,

"हिंदूच्या मते केवळ एकच परमेश्वर आहे. प्राचीन काळात ऋग्वेदामध्ये हीच भूमिका होती की 'विद्वान लोक त्याच एका अस्तित्वाचा अनेक संबोधनांनी धावा करीत असतात."

(संदर्भ : An English Man Defence Mother India - Page 128)

(५) 'मिस्टर काउंट जॉर्न्सजर्नी (Mister Count Bjornsjerne) यांनी वेदांतून काही उदाहरणे देऊन म्हटले आहे,

"या वास्तविक उत्कृष्ट धारणा हे स्वीकारण्यासाठी पुरेशा आहेत की वेदांमध्ये एकाच ईश्वरास मान्यता देण्यात आली, जो सर्वशक्तिमान, अनंत, नित्य, स्वयंभू प्रकाश आणि विश्वाचा प्रभु आहे."

**'बायबल'ची साक्ष**

'बायबल' हे बऱ्याच प्राचीन धर्मग्रंथांचा संग्रह आहे. हे ग्रंथ आपले मूळ स्वरुप हरवून बसले. अर्थातच या ग्रंथांची प्रामाणिकता बऱ्याच अंशी संदेहास्पद आहे. यामध्ये तऱ्हेतऱ्हेचे बदल झाले आहेत. तरीसुद्धा एकाच ईश्वरावर श्रद्धा ठेवण्याचे पुरावे आजही बऱ्याच प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यातील काही उदाहरणे येथे देत आहोत.

१) "मीच प्रथम आहे आणि मीच अंतिमही आहे आणि माझ्याशिवाय कोणीच ईश्वर नाही."

(Isaiah - 46 : 6)

२) "तू कोण्या इतर उपास्यांची उपासना करता कामा नये. कारण, प्रभुवर ज्याचे नाव स्वाभिमानी आहे, तो स्वाभिमानी आहेसुद्धा." (Exodus - 34 :4)

३) "हे 'इस्राईल'च्या वंशजा, ऐक! आपला ईश्वर हा एकच प्रभु आहे. तू आपल्या संपूर्ण हृदय, संपूर्ण प्राण आणि संपूर्ण शक्तीनिशी आपल्या ईश्वराशी प्रेम कर आणि या गोष्टी, ज्यांचा आदेश आज मी तुला देत आहे, ते तुझ्या हृदयावर अंकित असावे. आणि तू यांना, आपल्या वंशजांना हृदयंगम करावे आणि घरी बसल्यावर आणि पदगमन करताना आणि झोपते-उठतेवेळी त्यांची चर्चा करीत राहावा." (Deuteronomy 6 : 4-7)

४) "माझ्याबरोबर कोणीच प्रभु नाही. मीच मारतो आणि मीच जीवंत करतो. मीच आजार देतो आणि मीच बरा करतो आणि असा कोणीच नाही जो माझ्या पासून मुक्त करील."

(Deuteronomy 32 : 39)

५) तू महान आहेस आणि अद्‌भुत कार्यवान आहेस. तूच एकटा ईश्वर आहेस. (Psalm 86 : 10))

६) "तूच एकटा सर्व राज्यांचा ईश्वर आहेस. तूच आकाश आणि पृथ्वी निर्माण केली."

(Isaiah 37 : 16)

'इंजील' ग्रंथात म्हटले आहे,

१) "ईसा मसीह (अ.) यांनी उत्तर दिले की हे 'इस्त्राईल' च्या वंशजा, सर्वप्रथम ऐकून घे! आपला प्रभुवर ईश्वर हा एकच आहे आणि तू आपल्या ईश्वराशी संपूर्ण हृदय, आपल्या संपूर्ण प्राण, संपूर्ण बुद्धी आणि आपल्या संपूर्ण शक्तीनिशी प्रेम कर." (Mark 12 : 29)

२) "आणि सदैवाचे जीवन हे आहे की तुज एकट्या आणि वास्तविक ईश्वराला तसेच ईसा (अ.) यांना जे तुझे प्रेषित आहेत, त्यांनी ओळखावे." (John 17 :3)

३) "ईश्वर हा एकच आहे आणि ईश्वर व मानवांदरम्यान मध्यस्थसुद्धा एक ईसा मसीह (अ.) आहेत, जे मनुष्य आहेत." (I Timothy 2 : 5)

४) "हे धरतीच्या अंतिम सीमेपर्यंत राहणाऱ्यांनो! तुम्ही लक्ष द्या आणि मुक्ती प्राप्त करा, कारण मी ईश्वर आहे आणि माझ्याशिवाय कोणीच नाही." (Isaiah 45 : 22)

५) "तुझा कोणी अतिरिक्त इष्ट पूज्य नसावा आणि तू इतर कोणत्याही अतिरिक्त प्रभुला सजदा (नतमस्तक) करता कामा नये. तुझा ईश्वर केवळ मीच आहे." (Psalm 81 : 9)

६) "तू आपल्या ईश्वरास सजदा कर (अर्थात ईश्वरासमोर नतमस्तक हो) आणि केवळ त्याचीच उपासना कर." (Mathew 4 : 10)

**प्रकरण चौथे**

## ईश्वराचे सत्य स्वरुप

ईश्वर हा आपल्या शरीराचाही ईश्वर आहे आणि आत्म्याचाही ईश्वर आहे. तो स्वयंभू, सर्वशक्तिमान आणि दयावान आहे. त्याच्यासारखा कोणीच नाही. समय आणि युग त्याच्या ताब्यात आहे. कारण तो वेळेच्याही पुढे आहे आणि स्वयंपूर्ण आहे. तो कोणत्याही पैलूने कोण्या अन्यावर आश्रित नाही. त्यास कोणाचीही आणि कशाचीच गरज नाही.

याबरोबरच तो आपला इष्टसुद्धा आहे. तोच जीवनाचा एकमात्र आधार आहे. त्याच्यात ती समस्त वैशिष्ट्ये आहेत, जी एका प्रभु, पूज्य व प्रिय आराध्यामध्ये असू शकतात. आपल्या आत्मिक इच्छा आणि कामना त्याच्याकडूनच पूर्ण होऊ शकतात. आपल्या मनात असणारे निर्मळ आणि कोमलतम भाव केवळ त्याच्यासाठीच आहेत. तो आपल्या केवळ प्रेमालाच नव्हे तर उपासनेससुद्धा पात्र आहे. तो आपला केवळ उपास्यच नव्हे तर प्रेमपात्रसुद्धा आहे.

प्रकरण पाचवे

# ईश्वराचे रहस्यमय अस्तित्व

## १) ईश्वराची कल्पना

ईश्वराविषयी आपली धारणा अथवा श्रद्धा काय असावी? हा विषय मात्र विवादास्पद आहे. कोणी ईश्वरास निर्गुण मानून त्याची उपासना करण्याचा निश्चय केला, तर कोणी त्यास सगुण-उपास्य असल्याचे मानले. मानवाची ही कामना सदैव प्रबळ राहिलेली आहे की वर्तमान जीवनात ईश्वराचे प्रत्यक्ष दर्शन घेणे शक्य झाले नसले तरी कमीतकमी ईश्वरी अस्तित्वाची आणि स्वरुपाची कल्पना करण्यात तरी यश मिळावे. ईश्वराविषयी हे तरी मान्य करावेच लागते की, तो सर्वशक्तिमान आहे. त्याच्यात कोणत्याही प्रकारचा दोष मुळीच असू शकत नाही. सृष्टी-विश्वात ज्या-ज्या ठिकाणी व ज्या-ज्या स्वरुपात ज्ञान, शिव, शुभ आणि सुंदर पाहायला मिळते, त्याचे मूळ कारण ईश्वरच आहे. साधारणशी गोष्ट आहे की कोणत्याही पात्रात जे काही आहे, तेच दिसेल, तेच व्यक्त होईल. या विश्वाच्या स्वरुपात असलेल्या आरशामध्ये सामर्थ्य, ज्ञान आणि सौंदर्याचे जे प्रतिबिंब दिसते, ते निराधार असल्याचे तर म्हणता येणार नाही. मग ईश्वराशिवाय दुसरा कोण आहे, ज्याला या अतिविशाल जगाचा आधार म्हणता येईल? आपण ऐकतो आणि पाहतोही. शिवाय आपल्या ऐकण्या आणि पाहण्याचे सामर्थ्य मर्यादित आहे, मग हे कसे शक्य असेल की आपल्याला पाहण्याचे व ऐकण्याचे सामर्थ्य प्राप्त असावे आणि ईश्वरास हे सामर्थ्य प्राप्त नसावे? आपल्याला संकल्प आणि इच्छाशक्ती प्राप्त असावी आणि ईश्वराला मात्र नसावी, हे कसे शक्य आहे? सांगण्याचे तात्पर्य असे की, ईश्वरामध्ये ते समस्त गुण आणि सामर्थ्य असावे, ज्यामुळे त्यास परिपूर्ण अस्तित्व म्हणणे शक्य होईल. आपली पाहण्याची वा ऐकण्याची शक्ती अत्यंत मर्यादित स्वरुपाची आहे, मात्र ईश्वराची पाहण्याची व ऐकण्याची शक्ती अमर्याद आहे. त्याचप्रमाणे आपले ज्ञान आणि चेतनशक्तीसुद्धा मर्यादित आहे, मात्र ईश्वराची कोणतीच शक्ती मर्यादित नाही. आपल्याला अस्तित्व आहे खरे, मात्र ईश्वरी अस्तित्व हे अनंत, नित्य आणि स्वयंभू आहे. तो प्रत्येक बाधा, त्रुटी आणि न्यूनतेपासून सर्वथा मुक्त आहे. एवढेच नव्हे तर वास्तविक अस्तित्व हे केवळ त्याचेच आहे. मुळात आपले आणि या ब्रह्मांडाचे अस्तित्व हे त्याच परम-अस्तित्वाने प्रदान केले आणि त्याच्याच दयादृष्टीवर विसंबून आहे. जर त्याने आपली कृपादृष्टी फेरली तर आपले अस्तित्व बाकी राहणार नाही.

ईश्वर आपला निर्माता असून आपण त्यांची निर्मिती आहोत. ज्याप्रमाणे आपण आपल्या कल्पनाशक्तीने आपल्या मनात कोणत्याही वृक्ष, बंगला अगर इमारत निर्माण करू

शकतो. हे वृक्ष, बंगला अगर इमारत प्रत्येक क्षणी आपल्यावरच निर्भर असतील. आपले ध्यान कल्पनाबिंदूवरून सरकताच अगदी क्षणार्धात ते लुप्त होऊन जाईल. या उदाहरणातून हे स्पष्ट होते की आपण आणि आपण निर्माण केलेल्या वस्तु एकत्र असूनही एक-दुसऱ्यांशी भिन्न अगर वेगवेगळ्या आहेत. आपण आणि आपल्या निर्मित वस्तुंमध्ये घनिष्ठ सामिप्य असूनदेखील अत्यंत मोठा दुरावासुद्धा आहे. या उदाहरणातून सृष्टी आणि स्रष्टा अगर निर्मात्याच्या पारस्पारिक संबंधाविषयी हा अनुमान लावता येईल की, हा संबंध कशा प्रकारचा असतो. आरसा आणि त्यातील प्रतिबिंबाचे उदाहरण आपण यापूर्वी पाहिलेच आहे.

ईश्वर यथोचित गुणांनी संपन्न आहे. कोणते अभिष्ट गुण असेल, जे त्याच्यात नाही. जर त्याच्यातच गुण नसते तर, या सृष्टी-विश्वात कोणत्याही गुणाचा लवलेशही दिसला नसता. त्याचे गुण दोषरहित आहेत. पूज्य आणि आराध्य असण्यास केवळ तोच पात्र आहे. तोच आहे, ज्याच्यासमोर नतमस्तक व्हावे. प्रत्येक परिस्थितीत ज्याच्यावर विश्वास करता येईल, ज्याच्यासाठी अंत:करणात आकर्षण असेल आणि बुद्धीसुद्धा ज्याचा सर्वदिशा शोध घेत असेल, असा तोच मात्र आहे. ज्याचे आदेश असे अटळ कायदे असतील, ज्याच्या पालनांत मानवकल्याण असेल, असा तोच मात्र आहे. ज्यापासून आपल्या आत्मिक आवश्यकता पूर्ण होतील, असा तोच मात्र आहे. ज्यावर आपण समग्र मन आणि समस्त बुद्धी, विवेक आणि शक्तीनिशी प्रेम करावे, ज्याला आपण आपले सर्वस्व समर्पित करावे, असा तोच मात्र आहे. ज्याकडे आपण सदैव विनय आणि समर्पनभावाने पाहावे, जो केवळ स्वामी आणि शासकच नसून आपल्या प्रेमाचा उबदार आश्रय असावा, असा तोच मात्र आहे. ज्याच्या नावाने आपल्याला त्याच्या महिमत्वासमोर स्मरण आणि अभासाने आपल्या समस्त कामना पूर्ण व्हाव्या, असा तोच मात्र आहे. जो आपल्या जीवन आणि जीवनाच्या समस्त घडामोडींचा उद्देश असावा, जो जीवन आणि विश्वाची व्याख्या असावा, असा तोच मात्र आहे. जो जीवनास प्रकाशमान आणि अमर करतो; जो पावल्यावर कशाचीही गरज उरत नाही, असा तोच मात्र आहे. जो न पावल्यास केवळ विनाष असतो, असे अस्तित्व केवळ मात्र त्याचेच असते. कुरआनने हाच संदेश दिला आणि समस्त मानवविश्वासमोर हे सत्य मांडले. आता आपण या ठिकाणी कुरआनाच्या आधारे ईश्वराच्या काही अशा गुणांची चर्चा करु या, ज्यातून वर उल्लेख करण्यात आलेल्या बाबींचा पुरावा मिळतो. कुरआनात स्पष्टपणे म्हटले की,

१) "पूर्व-पश्चिम सर्व ईश्वराचे आहे. तुम्ही जिकडे वळाल, तिकडे ईश्वराचेच सामर्थ्य दिसेल." (संदर्भ : कुरआन २ : ११५)

२) "तुमचा ईश्वर एकच आहे. त्या दयाळू आणि कृपाळू ईश्वराशिवाय कोणीही ईश्वर नाही." (कुरआन)

३) "त्याच्याव्यतिरिक्त कोणीही ईश्वर नाही." (संदर्भ : कुरआन ३ : ६)

अर्थात ईश्वर अमर, अविनाशी आणि सजीव आहे. जीवनाचा मूळस्रोत तोच आहे. शिवाय तो त्याच्या अस्तित्वाकरिता कोणावरच अवलंबून नाही. तो स्वत:हून कायम आहे. तो एकटाच कोणाच्याही मदतीशिवाय या आणि अशा प्रकारच्या असंख्य सृष्टी स्थापन करणारा, कार्यरत ठेवणारा आणि कायम ठेवणारा आहे. कुरआनात म्हटले आहे,

४) "त्याच्याशिवाय कोणीही पूज्य नाही. तो प्रभुत्वशाली आणि तत्त्वज्ञ आहे." (संदर्भ : कुरआन ३ : ६)

५) "निस्संदेह ईश्वराला प्रत्येक गोष्टीचे सामर्थ्य प्राप्त आहे." (संदर्भ : कुरआन १६ : ७७)

६) "अत्यंत पवित्र आहे तो ज्याने आपल्या दास (प्रेषित मुहम्मद (स.)) यांच्यावर फुरकान अवतरित केले. जो समस्त विश्वातील लोकांना खबरदार करणारा आहे.

तो जो पृथ्वी आणि आकाशाच्या शासनाचा एकटाच स्वामी किंवा शासक आहे. ज्याने कोणत्याच मुलास जन्म दिला नाही, ज्याच्या शासनात कोणीही भागीदार नाही." (संदर्भ : कुरआन २५ : १,२)

ईश्वराने प्रत्येक वस्तु निर्माण केली आणि एवढेच केले नसून प्रत्येक वस्तुसाठी रंगरुप, शक्ती व सामर्थ्य, गुणवैशिष्ट्ये आणि विकासाच्या मर्यादा वगैरे सर्वकाही निश्चित केल्या. प्रत्येक वस्तु आपल्या कार्यवर्तुळात कार्यरत असावी, यासाठी ईश्वराने सृष्टीविश्वात समस्त साधने आणि समूह जोडले. याचा कुरआनात उल्लेख करताना म्हटले आहे,

७) "तो महिमावान आहे, तो ज्याच्या हाती प्रत्येक गोष्टीचा पूर्ण अधिकार आहे! आणि त्याच्याचकडे तुम्हा सर्वांना यावे लागणार आहे." (संदर्भ : कुरआन ३६ : ८३)

८) "ईश्वराचे पावित्र्यगान केले त्या प्रत्येक वस्तुने जो आकाश आणि धरतीमध्ये आहे आणि तो प्रभुत्वाशाली आणि तत्त्वदर्शी आहे. आकाशाचे आणि धरतीचे राज्य त्याचेच एकट्याचे आहे, आणि त्याला प्रत्येक गोष्टीचे सामर्थ्य प्राप्त आहे. तोच आदि आणि तोच अनंत आहे. तोच आत आणि तोच बाहेर आहे. आणि त्याला प्रत्येक गोष्टीचे ज्ञान आहे." (संदर्भ : कुरआन ५७ : १-३)

९) "निश्चितच तुमच्या पालनकर्त्याची पकड खूप घट्ट आहे." (संदर्भ : कुरआन ८५ : १२)

१०) ("हे प्रेषिता मुहम्मद (स.) !) आपल्या पालनकर्त्यांच्या नावाचे स्तवन करा, ज्याने निर्माण केले आणि संतुलन कायम केले. ज्याने नशीब ठरविले आणि मग मार्गदर्शन केले."
(संदर्भ : कुरआन ८७ : १-३)

११) "ईश्वर एक आहे, एकटा आहे, सर्वांशी निस्पृह आहे आणि सर्वजन त्याचे गरजवंत आहेत. ना त्याची कोणी संतती आहे ना तो कोणाची संतती आणि कोणीही त्याचा समकक्ष नाही."
(संदर्भ : कुरआन ११२ : १-४)

तो एकटा आणि निराळा आहे. तो नेहमीपासून आहे आणि सदैव राहणार वह नित्य आहे. त्याच्यापूर्वी कोणीच आणि काहीच नव्हते. त्यासम पूर्वीही कोणीच आणि काहीच नव्हते, आताही नाही आणि भविष्यातही नसणार. त्याचा कोणीच सजातीय नाही. तो एकमेव अस्तित्व आहे. तो बऱ्याच अंशाचा योग वा संयोग नाही की ज्यामुळे त्याचे विभाजन शक्य व्हावे आणि कोण्या एका दिशेत अथवा एखाद्या ठिकाणी असावा. तो प्रत्येक अतिरेकापासून मुक्त एक अस्तित्व आहे. तो प्रत्येक दृष्टीने वेगळा आहे. पालनकार्यात त्याचा कोणीही भागीदार नाही, तसेच यामुळे त्याच्या प्रभुत्वातही कोणी भागीदार नाही. तो एकटाच ब्रह्मांडाचा स्रष्टा, निर्माता आणि नियंत्रक व प्रबंधक आहे. तोच सर्वांचा आश्रयदाता आणि रक्षक आहे. तोच प्रत्येक संकटात मदत करतो.

तो स्वयं परम स्वतंत्र आणि निरपेक्ष आहे, मात्र सर्वांचा आधार आणि सहायक आहे. तोच वास्तविक सहारा आणि विश्वासपात्र आहे. इतर सर्वच त्याचे आश्रित आणि गरजवंत असून त्यावर निर्भर आहे. ती माणसे खरोखरेच भटकलेली आहेत, जे त्याच्याव्यतिरिक्त इतरांची वंदना आणि पूजा करतात.

मग ज्याअर्थी तो अनादी काळापासून आहे, आणि त्याच्यासम कोणीही नाही, त्याअर्थी त्याला कोणाचा पुत्र अगर पिता समजणे ही एक विक्षिप्त आणि चुकीची धारणा आहे. असा कोणीच नाही, जो कोणत्याही पैलूने व कोणत्याही अर्थाने आणि कोणत्याही दृष्टीने त्याचा समकक्ष असेल. कुरआनने म्हटले आहे,

१२) "तोच एक ईश्वर आकाशाचा आणि पृथ्वीचासुद्धा तुमचे उघड व गुप्त बाबी जाणणारा आहे. जे पुण्य आणि पाप तुम्ही करता, ते सर्व त्याला ज्ञात आहे." (संदर्भ : कुरआन ६ : ३)

१३) "तुझा पालनकर्ता खूप क्षमाशील, दयाळू आहे. तो त्यांच्या पापाची पकड करू इच्छितो, तेव्हा लवकर पकड करतो नि घोर शिक्षा देतो. मात्र त्यांच्यासाठी वचनपूर्तीची एक वेळ निश्चित आहे आणि त्याच्यापासून सुटका करून कोठेही पळता येत नाही." (संदर्भ : कुरआन १८ : ५८)

१४) "तुमच्या पालनकर्त्यांनि दया व क्षमा करण्याचे कर्म स्वत:साठी अनिवार्य ठरविले आहे. जर तुमच्यापैकी कोणी चुकून एखादे वाईट कर्म केले तर त्याने क्षमायाचना करावी, तो निश्चितच क्षमा करणारा आहे." (संदर्भ : कुरआन ६ : ५४)

१५) "हे प्रेषिता ! माझ्या दासांना ही खबर द्या की, मी क्षमा करणारा आहे. मात्र याबरोबरच माझा कोपसुद्धा कठोर आहे." (संदर्भ : कुरआन १५ : ४९,५०)

१६) "प्रत्येक गोष्ट माझ्या दयेने आच्छादलेली आहे." (संदर्भ : कुरआन ७ : १५६)

अर्थात ईश्वर ज्या पद्धतीने आपले राज्यशासन चालवित आहे, त्यात मौलिक स्थान त्याच्या प्रकोपास नसून त्याच्या दया व कृपेला आहे. त्याच्या दया आणि कृपेवरच सृष्टी विश्वाचा हा कारखाना कार्यरत आहे. लोकांचा अत्याचार मर्यादेपेक्षा वाढल्यावरच त्याचा प्रकोप अवतरतो. कुरआनात म्हणजे आहे,

१७) "(शुऐब (अ.) ने म्हटले) खरेच माझा पालनकर्ता दयावान आणि खूप प्रेम करणारा आहे." (संदर्भ : कुरआन ११ : ९०)

१८) "तोच आकाशांचा ईश्वर आहे आणि जमिनींचासुद्धा ईश्वर आहे आणि तोच तत्त्वज्ञ आणि ज्ञानी आहे." (संदर्भ : कुरआन ४३ : ८४)

१९) त्याने आकाशांना आणि जमिनीला निर्मिले, तोच दिवसावर रात्र आणि रात्रीवर दिवस पांघरतो. त्यानेच सूर्य आणि चंद्राला असे अधीन ठेवले आहे की प्रत्येक ठराविक वेळेनुसारच कार्यरत आहे. ध्यान ठेवा, तो जबरदस्त आहे आणि क्षमाशील आहे." (संदर्भ : कुरआन ३९ : ५)

अर्थात ईश्वर हा सृष्टीचा केवळ निर्माताच नसून तिचा संचालक आणि स्वामीसुद्धा आहे. कुरआनात म्हटले आहे,

२०) "असे कित्येक प्राणी आहेत, जे आपली उपजीविका सोबत घेऊन फिरत नाहीत, मात्र ईश्वर त्यांना उपजीविका अवश्य प्रदान करतो आणि तुम्हाला उपजीविका देणारा केवळ तोच आहे." (संदर्भ : कुरआन २१ : ६०)

प्रेषित मुहम्मद (स.) यांनीसुद्धा म्हटले आहे,

"जर खरोखरेच तुम्ही ईश्वरावर विश्वास ठेवला, तर तो तुम्हाला अशी उपजीविका प्रदान करतो, जशी पक्ष्यांना देतो की, ते सकाळी उपाशीपोटी घरट्यांतून निघतात आणि संध्याकाळी पोट भरून घरट्यांत पोचतात."

कुरआनात म्हटले आहे,

२१) "स्पष्टपणे घोषणा करा की ईश्वराला सोडून मी इतराला आपला स्वामी बनवू काय? त्या ईश्वरास सोडून जो जमीन आणि आकाशाचा स्वामी आहे आणि जो उपजीविका देतो, उपजीविका घेत नाही. घोषित करा की, मला हाच आदेश झाला की सर्वप्रथम मी केवळ त्याच्यासमोरच नतमस्तक व्हावे." (संदर्भ : कुरआन ६ : १४)

२२) "ईश्वर तुमचे जीवन तंग करू इच्छित नाही, तो केवळ तुमचे जीवन पवित्र करतो, आणि आपले वरदान तुमच्यावर पूर्ण करतो, कदाचित तुम्ही कृतज्ञ व्हावे." (संदर्भ : कुरआन ५ : ६)

२३) "अनेक पालनकर्ते योग्य आहेत की एकटा ईश्वर जो प्रभुत्वशाली आहे."

(संदर्भ : कुरआन १२ : ३९)

२४) "वास्तविकता अशी की बरेचजण केवळ भ्रमातच पडलेले आहेत. खरे पाहता भ्रमामुळे सत्याची गरज पूर्ण होत नसते." (संदर्भ : कुरआन १० : ३६)

२५) "मला दाखवा, या इतरांनी कोणती गोष्ट निर्माण केली. ही संपूर्ण निर्मिती केवळ ईश्वराचीच आहे. (अर्थातच ज्यांचा तुम्ही धावा करता) ते ईश्वर असूच शकत नाहीत."

(संदर्भ : कुरआन ३१ : ११)

२६) ज्या विभूतींना तुम्ही आपले आराध्य समजता, त्यांचा धावा करा. ते आकाश आणि पृथ्वीत एक कणसुद्धा निर्माण करू शकत नाहीत. तसेच या पृथ्वी नी आकाशात त्यांचे प्रभुत्वही चालत नाही आणि त्यांच्यापैकी कोणीही मदतीस येणार नाही." (संदर्भ : कुरआन ३४ : २२)

२७) आम्ही मानवास निर्मिले आणि त्याच्या मनात निर्माण होणारे विचारसुद्धा आम्ही जाणतो. कारण तुम्ही त्याच्या आत्म्यापेक्षाही जवळ आहात." (संदर्भ : ५० : १६)

२८) "ईश्वर आकाश आणि पृथ्वीचा प्रकाश आहे." (संदर्भ : २४ : ३५)

अर्थात ईश्वराचीच ती अत्यंत प्रकाशमान ज्योती आहे, जिच्यामुळे समस्त ब्रह्मांड प्रकाशमय होते. समस्त विश्व त्यानेच परिपूर्ण असून त्यानेच सुशोभित होत असते. त्याचे सामर्थ्य संपूर्ण जगावर व्यापलेले आहे.

२९) "तो ईश्वरच आहे, ज्याच्याशिवाय कोणीही आराध्य नाही. तो बादशाह आहे अत्यंत मंगल आणि महीम, सर्वस्व सुरक्षा प्रदान करणारा, शांती देणारा, निगा राखणारा, सर्वांचा प्रभू, आपला आदेश बलपूर्वक लागू करणारा आणि महीमत्व असलेला, पवित्र आहे तो या गोष्टीपासून तो मुक्त आहे की त्याचा कोणी समकक्ष ठरविण्यात यावा. तो ईश्वरच आहे, निर्मितीचे नियोजन करणारा आणि त्यानुसार निर्मिती करणारा. त्याच्याकरिता उत्तम संबोधने

आहेत. या पृथ्वीवरील आणि आकाशातील प्रत्येक वस्तू त्याचे स्तवन करीत आहे आणि तो जबरदस्त आणि तत्त्वज्ञानी आहे." (संदर्भ : ५९ : २२,२३,२४)

२९) "पृथ्वी आणि आकाशातील सर्वच वस्तूंचा स्वामी ईश्वर आहे आणि सर्व प्रकरणे त्याच्याच दरबारी सादर करण्यात येतील." (संदर्भ : ३ : १०९)

३०) "ईश्वर हा पृथ्वी आणि आकाश व त्यात असणाऱ्या समस्त वस्तूंचा स्वामी आहे, तो वाटेल त्या गोष्टीची निर्मिती करतो आणि समस्त वस्तूंवर त्याचेच प्रभुत्व आहे."

(संदर्भ : ५ : १७)

३१) "ईश्वर हाच सत्य आहे." (संदर्भ : २२ : ६)

३२) "खूपच बरकतीचे आणि मंगल आहे तुमच्या पालनकर्त्याचे नाव तो अत्यंत प्रतापी आणि महान आहे." (संदर्भ : ५५ : ७८)

३३) "नि:संदेह ! माझा पालनकर्ता निकट आहे आणि प्रार्थना पूर्ण करणारा आहे."

(संदर्भ : ११ : ६१)

३४) "आणि निश्चितच ईश्वर मानवांसाठी खूपच दयाळू आणि क्षमाशील आहे."

(संदर्भ : ५ : ९)

## निर्गुण असण्याचा खरा अर्थ

अशा प्रकारे कुरआनातील कित्येक आयती सादर करता येतील, ज्यावरून हे प्रत्यक्षात स्पष्ट होते की ईश्वराचे अस्तित्व म्हणजे काही बाब नाही, जिच्यासंबंधी सकारात्मकरित्या विचार मांडता येणार नाही. केवळ नकारात्मक विचारातून समस्या सुटत नसते. याउलट वस्तुस्थिती अशी आहे की मानवआत्मा एका अशा प्रभुच्या शोधार्थ आसूसलेला आहे, ज्याचे केवळ भयच नसावे तर कमालीचे आकर्षणसुद्धा असावे. यासाठी सकारात्मक दृष्टिकोनाची आवश्यकता असावीच लागते. कुरआनने या पैलूवर विशेष लक्ष पुरविले आहे. वरील आयतीवरून हे आपल्या लक्षात आलेच आहे.

ईश्वरास निर्गुणसुद्धा म्हटले जाते. निर्गुण मानन्याचा अर्थ असा मुळीच नाही की ईश्वर म्हणजे काही अशी शुष्क कल्पना असावी जिच्यामध्ये विशेष प्रकारच्या आवडीचे समाधान होत असले तरी मानवहृदयासाठी त्यात आकर्षणाचे कोणतेही तत्त्वच नसावे अथवा भक्ती आणि प्रेमभावाची काहीही संधी नसावी. तर याउलट निर्गुण असण्याचा वास्तविक अर्थ असा की त्याचे गुण पार्थिव आणि लौकिक वस्तुंच्या गुणांपेक्षा उच्चतर आहेत. येथील वस्तु पाहिल्यास

आपल्याला असे आढळेल की त्यांची वैशिष्ट्ये आणि गुणसापेक्ष आहेत. ईश्वरी अस्तित्वात अपूर्णतेचा मुळी अंशही सापडत नाही. तो आपल्यात पूर्ण आहे. तो कोणत्याही दृष्टीने इतर कोणावर अवलंबून अगर आश्रित नाही. याउलट मनुष्याला पाहिल्यास असे दिसते की तो सर्वस्वी इतरांवर अवलंबून आहे. गरजा आणि आवश्यकतांचा तो जणू संग्रह आहे. त्याला अन्न, पाणी, निवारासारख्या बाबींची गरज आहे. पाहण्यासाठी केवळ डोळेच नव्हे तर सूर्यप्रकाशाचीसुद्धा नितांत गरज आहे. जर बाह्य वातावरणात प्रकाश नसेल तर मानवमुखाचे समस्त सौंदर्य लुप्त होईल. त्याच्या जवळ असा पर्यायी प्रकाशसुद्धा नाही, ज्यामुळे त्याचे सौंदर्य व्यक्त होईल. केवळ मनुष्यच नव्हे तर विश्वाची प्रत्येक वस्तु इतर असंख्य वस्तु आणि अवस्थांवर अवलंबून आहे. मात्र ईश्वराच्या बाबतीत असे मुळीच नाही. त्याच्यासंबंधी अशी अपूर्णतेची कल्पना करणेही शक्य नाही. त्याला कशाचीच मुळी गरजच नाही. अर्थातच तो परिपूर्ण आहे आणि मनुष्य व विश्वासातील प्रत्येक गोष्ट एकदुसऱ्यांवर अवलंबून असल्याने अपूर्ण आहे.

ज्या अपूर्णतांना गुण समजण्याची आपल्याला सवय पडली आहे, त्या अपूर्णता अगर अशा स्वरुपाचे गुण ईश्वरात नाहीत, याच दृष्टीने त्याला कोणी जर निर्गुण अथवा चरम निरुपाधी अस्तित्व म्हणत असेल तर यात काही गैर नाही. ईश्वर आपल्या आत्मस्थित एकतेमध्ये स्वयपूर्ण आहे. अनंतास सान्त (अर्थात अंत असलेला वा नाश पावणारा) ची गरज कशाला पडेल? निरपेक्ष हे सापेक्षावर, अकाराण सकारणावर निर्भर अथवा आश्रित असू शकत नाही. 'मिस्टर हेमिल्टन (Mr. Hemilton)' याने म्हटले की, मनुष्याचे समग्र ज्ञान सापेक्ष असून जे निरपेक्ष असते, ते आपण कधीच जाणून घेऊ शकत नाही. (संदर्भ : Introduction to Philosophy of Religion, P. 13) 'मिस्टर मॅन्सेल' यानेसुद्धा हेच म्हटले आहे की, निरपेक्ष हे संपूर्ण अवस्था आणि मर्यादापलीकडे आहे. निरपेक्षाचा विचार करता येणे शक्य नसते. तो अज्ञात आणि अज्ञेयच राहतो. आपल्याला सिंहासन समजते मात्र अशाच अवस्थेत की, जेव्हा आपण त्यात मेज किंवा इतर वस्तु त्याला सीमित करीत नाही, फरक करतो. त्यामुळे फरक अथवा भेद करणे किंवा भेद करण्याचा अर्थ 'सीमित करणे' होय. निरपेक्ष हे आपल्यापेक्षा पृथक अगर भिन्न असलेल्या इतर कोणत्याही वस्तुने सीमित होत नाही. म्हणून त्याचा विचार करणे शक्य नाही. 'मि. हर्बट स्पेन्सर (Mr. Herbert Spencer)' यानेसुद्धा हेच मत मांडले. अज्ञेयवादाच्या या धारणेत सत्याचा अंश असला तरी त्यास पूर्णतः सत्यानुकूल म्हणता येणार नाही. ज्ञान आणि ईश्वरी अस्तित्व, या दोहोंना परस्पर नितांत असंबद्ध समजणे योग्य नाही.

वस्तुस्थिती अशी आहे की सांत (अंत असलेला वा नाशवंत) चा स्वभावगुण हा आहे

की तो आपले स्वातंत्र्य आणि जीवनाची उच्चतम सिद्धी निरपेक्षातूनच प्राप्त करतो. जर निरपेक्ष वस्तूंना सापेक्ष वस्तूंच्या विश्वापासून पूर्णत: वा सर्वथा भिन्न आणि असंबद्ध तसेच मुक्त मानले तर मग त्या सीमित विश्वाचा आधार आणि मूळ कारण कशा असू शकतील? म्हणून हे स्वीकार केल्याशिवाय पर्याय नाही की निरपेक्ष ईश्वर हा सांत (नाशवंत) पदार्थांच्या आणि वस्तूंच्या विश्वात पूर्णस्वरुपाने केवळ मुक्तच नसून या जगाचा आधार आणि प्रारंभिक रुपाने यावर व्याप्तसुद्धा आहे. कारण तो कारणरहित, कारणमुक्त वा कारणहीन असीम अस्तित्व आहे. असे म्हणणे की आपण केवळ प्रतीति लाच ओळखू शकतो, तत्त्वाला नाही. तर ही गोष्टच परस्परविरोधी आणि स्वत:चे स्वत:च खंडण करणारी होय. जर वास्तविक वस्तुसंबंधी आपल्याला काहीच माहीत नसेल तर आपण ही गोष्ट कशी तोंडावर आणू शकतो की आपल्याला ती ओळखणे शक्यच नाही? ज्याअर्थी आपण म्हणतो की वस्तु ही केवळ प्रतीति अथवा गुणच आहे, तर याचा असा देखील अर्थ निघतो की, प्रतीति किंवा दर्शनाव्यतिरिक्तसुद्धा काही वास्तविकता किंवा गुणांशिवायसुद्धा एखादे तत्त्व असे आहे, जे पाहून आपण सामान्य वस्तुपेक्षा त्यास भिन्नवर्गात ठेवतो. अशाप्रकारे प्रतीतिमुक्त अथवा अदर्शनीय असणाऱ्या ईश्वरी अस्तित्वाविषयी आपणाला कमीतकमी काही तरी माहीत आवश्य आहे. ही गोष्ट खरी की त्याची समग्र माहिती किंवा ज्ञान प्राप्त करण्यात आपली बुद्धी समर्थ नाही. उपनिषदामध्ये एक मनोहर वाक्य आहे,

"नाहं मन्ये सुवेदेति नो न वेदेति वेदच।"

अर्थात : "मी हे मान्य करीत नाही की मी त्यास बऱ्याप्रकारे ओळखतो आणि हेदेखील मान्य करीत नाही की मी त्याला मुळी ओळखतच नाही."

तात्पर्य असे की ईश्वराप्रति सकारात्मक आणि नकारात्मक हे दोन्ही पैलू आपण आपल्यासमोर ठेवावयास हवेत. कुरआनाने ज्या ठिकाणी ईश्वरी गुणांची सविस्तर ओळख स्पष्ट केली त्याच ठिकाणी त्यानेच त्याच्या महिमत्व, पवित्रता वगैरेंचा उल्लेखसुद्धा केला आहे.

एकीकडे कुरआनात आपल्याला हे आढळते की,

१) "आणि ईश्वराचे सर्वोच्च उदाहरण आहे आणि तो प्रभुत्वशाली आणि तत्त्वज्ञ आहे."

(संदर्भ : १६ : ६०)

२) "आकाशात आणि धरतीमध्ये त्याचे उदाहरण सर्वोच्च आहे आणि तो प्रभुत्वशाली आणि तत्वदर्शी आहे." (संदर्भ : ३० : २७)

३) "त्याची चांगली नावे आहेत."                    (संदर्भ : ५९ :२४)

. याबरोबरच दुसरीकडे कुरआनात हेदेखील स्पष्ट करण्यात आले आहे,

१) "त्यासम कोण आहे? आणि तो ऐकतो आणि पाहतो आहे."          (संदर्भ : ४२ : ११)

२) "कोणीही त्यासम नाही."                    (संदर्भ : ११२ : ४)

३) "महिमावान आहे तो (ईश्वर) त्या गुणांनी जे ते वर्णन करतात."          (संदर्भ : ६ : १०१)

४) "तुझ्या पालनकर्त्या ईश्वराची महिमा, जो प्रतिष्ठेचा स्वामी आहे, प्रतिकूल आहे जे काही ते (त्याच्याविषयी) वर्णन करतात."          (संदर्भ : ३७ : १८०)

याव्यतिरिक्त प्राचीन ग्रंथातूनसुद्धा कुरआनची पुष्टी होते. बायबलमध्ये याची उदाहरणे बरीच आहेत. काही उदाहरणे येथे देत आहोत.

१) "हे प्रभुवर तुजसारखा कोणीच नाही. तू महान आहेस. शक्ती आणि सामर्थ्यामुळे तुझे नाव महान आहे."          (Jeremiah 10 : 6)

२) "मीच प्रथम आहे आणि अंतिमही मीच आहे."          (Isaiah 48 : 12)

३) "तुझे सिंहासन चिरकालीन आहे, तू अनादीकाळापासून आहेस."          (Psalms 93 : 2)

४) "स्थायित्व केवळ त्यालाच आहे आणि तो त्या आकाशी आहे जेथे कोणीच पोचू शकत नाही. कोणीही त्यास पाहिले नाही आणि पाहूही शकत नाही."          (Jeremiah 23 :24)

आता आपण भारतीय प्राचीन ग्रंथ-वेदांचा आढावा घेऊ या.

१) "अनन्त विततं पुरुत्रानन्तमन्तवच्चा समन्ते।

ते नाकपालश्चरित विचिन्वन् विद्वान भूतमुत भव्यमस्य॥

(संदर्भ : ऋग्वेद १०/८/१२)

अर्थात : "अनंत (ब्रह्म) सर्वत्र व्यापक आहे. हे अनंत (ब्रह्म) आणि अंतरिक (नाशवंत जीव वगैरे) मिळालेले आहेत. या दोहोंना भिन्न समजणारा सुखी जीवन जगतो."

२) ईशावास्यमिदं सर्वम्।          (संदर्भ : यजुर्वेद ४०/१०)

अर्थात : "ही समस्त सृष्टी त्याच परमात्माने परिपूर्ण आहे."

३) तदेजती तन्नेजति तद्दूरे तद्वन्तिके।

तदन्तरस्य सर्वस्य तदु सर्वस्यास्य बाह्यतः ॥          (संदर्भ : यजुर्वेद ४०/५)

अर्थात : "परमात्मा चालतो आहे आणि चालत नाहीसुद्धा, तो खूप दूर आहे आणि जवळसुद्धा आहे. मात्र तो सर्व सृष्ट (निर्मिती) मध्ये सामावत आहे."

४) "ना त्वावां अन्यो दिव्यो न पार्थिवो न जातो न जानिष्यते। (संदर्भ : ऋग्वेद ७/३२/२३)

अर्थात : "(प्रभो !) तुझ्यासारखा कोणी दुसरा ना द्युलोकात आहे ना पृथ्वीवर आहे आणि ना झाला नि होणार."

"ज्या प्रभुचे मोठे प्रसिद्ध यश आहे, त्याची कोणतीही प्रतिमा (मूर्ती) नाही."

उपनिषदांमध्येही ही गोष्ट या शब्दांत वर्णन करण्यात आली आहे, (संदर्भ : यजुर्वेद ३२/३)

१) यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह आनंद ब्राह्मणो विद्वान न भवेति कुतश्चन।

अर्थात : "वाणी आणि मन दोन्ही त्या ब्रह्मास न पावताच परतले, केवळ आनंदाद्वारेच तो पावतो."

२) पिचैति चान्ते विश्वमादौ।

अर्थात : "तोच प्रारंभात आहे आणि तोच अंतामध्ये आहे."

अशा प्रकारे हे स्पष्ट आहे की ईश्वरी अस्तित्वासंबंधी आपल्याकरिता गरजेचे आहे की आपण दोन्ही पैलू आपल्यासमोर ठेवावे. आपण त्यास अनावश्यक मात्र समजता कामा नये, तसेच त्यास लौकिक आणि भौतिक वस्तूच्या स्तरावर आणताही कामा नये. ईश्वराची महानता आणि पवित्रता तसेच त्याच्या निरपेक्ष असण्याचे स्मरण प्रत्येक अवस्थेत आवश्यक आहे.

## ईश्वराचे रहस्यमय व्यक्तित्व

आता प्रश्न असा पडतो की आपण ईश्वरी व्यक्तिमत्त्वाची धारणा आपल्या मनात कशारितीने धारण करावी? यासंबंधी लक्ष देण्यासारखी गोष्ट ही आहे की, चेतना, ज्ञान, संकल्प वगैरे गुणांनी संबोधल्याखेरीज कोणत्याही व्यक्तिमत्वाची कल्पना करणे शक्य नाही. एखाद्या महान अस्तित्व अगर व्यक्तित्वाकरिता ही गोष्ट आवश्यक आहे की, त्याच्यात हे गुण पूर्णपणे असावेत. मग याबरोबर हेसुद्धा आवश्यक आहे की त्या व्यक्तित्वात सौंदर्यतत्वसुद्धा असावे. कारण हा व्यक्तित्वाचा स्पष्ट झालेला गुण वाटतो.

खरी अडचण येथे निर्माण होते की आपल्याला या गुणांची ओळख सापेक्ष स्वरुपातच होते. ईश्वरी अस्तित्व सापेक्ष नसून निरपेक्ष असल्यामुळे आपल्या मन-मस्तिष्कासाठी एक अडचण निर्माण होते. कारण माणूस प्रत्येक गोष्टीला सापेक्ष स्वरुपातच पाहतो. त्याला हीच सवय पडलेली आहे. अपेक्षारहित वस्तूंची कल्पना करणे त्याच्यासाठी काही सोपी गोष्ट नाही.

तरीसुद्धा स्वत: मानवाच्या आत अशी स्थिती आढळते, जिच्यामुळे त्याला सत्यग्रहण करणे सोपे जाते. सत्याचा मागोवा घेण्यासाठी त्यास जास्त धडपड करावी लागत नाही.

आपण निश्चितच केवळ एक मानव आहोत. आपण मातीने निर्मित झालो. होय हे खरे आहे. मात्र ही गोष्ट मुळीच विसरता कामा नये की आपण केवळ एखादा मातीचा पुतळा नव्हे. आपल्या शरीराबरोबरच आपला आत्मासुद्धा आहे, हे आजही कोणी नाकारू शकत नाही. हा आत्मा आपले शरीर परिवर्तनशील असूनदेखील आपल्या व्यक्तित्वाची अखंडता स्थिर ठेवते आणि आपण स्वत:स तीच आणि अगदी तीच व्यक्ती समजतो, जी लहानपणापासून असते.

आपल्या पाहण्याचे ऐकण्याचे कार्यसुद्धा वस्तुत: त्या चेतनाबिंदूवरच होत असते, जेथे आत्मा एखादी वस्तु पाहतो अगर ऐकतो. आत्मा जर पाहात नसेल वा ऐकत नसेल तर काहीही पाहणे व ऐकणे शक्य नाही. आपल्या आत्म्यापर्यंत एखाद्या वस्तुचा रंग अगर स्वरूप अथवा तिचे शरीर पोचत नसले तरी तो त्या वस्तुला पाहू शकतो, ऐकू शकतो.

हितगुज करतेवेळेससुद्धा वस्तुत: आपला आत्माच हितगुज करीत असतो. आत्म्याची वाणी मस्तिष्क, जिव्हा वगैरेसारख्या माध्यमातून प्रकट होत असते. आपली वाणी अगर आवाज हा आपल्या आत्म्याचेच मूर्त स्वरुप होय. याचप्रमाणे आपले पाहणे आणि ऐकणेसुद्धा आपल्या आत्म्याचेच बाह्य स्वरुप म्हणता येईल. नेमका हाच प्रकार आपले प्रत्येक कर्म, सौंदर्य वगैरे वैशिष्ट्येसुद्धा वस्तुत: आत्मिक वैशिष्ट्ये आणि गुणांचे प्रत्यक्ष स्वरुपच आहेत.

आपला आत्मा आणि परमात्मा, या दोहोंमध्ये खूप समरूपता दिसून येते. ज्याप्रमाणे ईश्वर हा ज्ञानेंद्रियांपासून पूर्णत: मुक्त आहे. त्यास कसल्याही ज्ञानेंद्रियांची गरज नाही आणि त्यास ज्ञानेंद्रिये नाहीतच. त्याचप्रमाणे आपला आत्मासुद्धा दिशा आणि स्थानापासून मुक्त आहे. याठिकाणी 'कोठे', 'किती' वगैरेसारख्या बाबींची कल्पनाच मुळी शक्य नाही आणि दिशा वगैरे प्रकारच्या बाबींचे चिन्हसुद्धा दिसत नाही.

ज्याप्रमाणे ईश्वर प्रत्येक वस्तु पाहतो, ऐकतो मात्र त्याठिकाणी कोणतीही भौतिकता पोचू शकत नाही आणि त्याच्या श्रवणशक्तीशी शब्दांची टक्करही होत नाही. नेमकी हीच अवस्था आपल्या आत्म्याची आहे.

ज्या प्रकारे ईश्वरी वाणीची पवित्रता आणि निरपेक्षतेची अवस्था अशी आहे की ना तिच्यात शब्दांच्या ध्वनींना सीमा आहे ना उच्चारावर ती अवलंबून आहे, तरी त्याच्या वाणीमध्ये 'अर्थ' आणि 'भाव' असतो. त्याचप्रमाणे ऐकण्याचे व ऐकविण्याचे गुणसुद्धा आहेत. शब्द आणि उच्चाराच्या अटी व शर्ती तर या ईहलोकात प्रकट होतात. याचप्रमाणे आपण आपल्या

आत्म्याची वाणी अथवा आवाज हृदयाच्या कानांनी ऐकतो. खरे पाहता त्या वाणीमध्ये कोणत्याही प्रकारचा आवाज नसतो, कोणत्याही प्रकारचे शब्द नसतात.

हे सर्व पाहिल्यावर आपल्या आत्म्यामुळे ईश्वरी अस्तित्वाची कल्पना करणे काही असाध्य आणि अशक्य कारण राहात नाही. आपल्या आत्म्यास आपण पाहू शकत नसलो तरी त्याचा एक विशेष गुण हा 'चेतना' आणि ह्याचा विशेष गुण आपल्याला माहीत आहे. जरा विचार करा. चेतना म्हणजे ही काही भौतिक वस्तु आहे काय? चेतना ही स्वयंपूर्ण नाही काय? तिला आपले अस्तित्व स्थित ठेवण्यासाठी एखाद्या विशिष्ट स्थानाची आणि दिशेची गरज आहे काय? तिचे पॅकिंग करणे शक्य आहे काय? पदार्थाप्रमाणे तिला वजन आहे काय? ती जागा व्यापते काय? तिचे घनफळ अथवा वस्तुमान वा क्षेत्रफळ आहे काय? तर एकच उत्तर मिळेल, "मुळीच नाही!" मग हे का बरे बुद्धीत बसू नये, ईश्वरास स्थान अगर आश्रयाची गरज नाही आणि तो या बाबींपासून मुक्त आहे?

आता प्रश्न एवढाच की, ईश्वरी अस्तित्वामध्ये सौंदर्यबोधाची संभावना आढळते काय? तर याचे अगदी सरळ-साधे उत्तर आहे आणि ते असे की जर तेथे सौंदर्य नसेल तर या सृष्टीमध्ये सौंदर्याचा प्रादुर्भाव असणे कोठून संभव झाले. ईश्वराचे अंतिम प्रेषित मुहम्मद (स.) यांनीसुद्धा म्हटले आहे, "ईश्वर हा सुंदर आहे आणि तो सौंदर्याला पसंत करतो." यासंबंधी आपल्या अडचणीचे वास्तविक कारण असे की आपल्याला रंग-रूपाच्या आधारेच सौंदर्य पाहण्याची सवय आहे. आपला समजच असा आहे की काया अगर शरीराशिवाय सौंदर्य स्थित असूच शकत नाही. अर्थात काया वा शरीर नसेल तर तेथे सौंदर्यच नाही. मात्र वास्तविकता याच्या अगदी उलट आहे. सौंदर्य हे वास्तविकरित्या भाव अथवा जाणीव आहे. सौंदर्याच्या संबंध आपण पाहण्याशी जोडतो. पाहणे हे आपल्या वास्तविक स्थितीत केवळ चेतना किंवा भाव अगर जाणीव होय. 'मिस्टर ऐगल' याने ही वास्तविकता अशा शब्दांत मांडली आहे,

"Beauty is the shining of Idia through matter. Only the soul and what pertains to it truly beautiful and therefore the beauty of the nature is only reflection of natural beauty of spirit."

अर्थात : "सौंदर्य हे भौतिक वस्तुच्या माध्यमाने कल्पनेचे तेज आहे. वास्तविक पाहता सौंदर्य हे आत्मा आणि तत्संबंधी वस्तुमध्येच आहे. म्हणून निसर्गाचे सौंदर्य आत्म्याच्या नैसर्गिक सौंदर्याचे केवळ प्रतिबिंब आहे."

सौंदर्य हे त्याच्या वास्तविक दृष्टीने भौतिकतेपासून मुक्त बाब आहे. सौंदर्य निव्वळ एक

अभौतिक बाब आहे. भौतिक वस्तूंमध्ये सौंदर्य असण्याचे कारण असे की सौंदर्य हे भौतिकतामुक्त आहे. अन्यथा भौतिक वस्तूंमध्ये ही शक्यताच नसती. म्हणूनच ईश्वरी अस्तित्वात हा गुण आहे, असेच सिद्ध होते. ही वास्तविकता नाकारण्यासाठी कोणताही आधार नाही. ईश्वराच्या वास्तविक कल्पनेमुळे केवळ बौद्धिक अडचणीचेच समाधान होत नसून आपल्या हार्दिक आणि आत्मिक अडचणींचेसुद्धा समाधान होते. मनात तरंगणाऱ्या कित्येक मधुर भावना व जाणिवांना ईश्वरी कल्पनेमुळे आश्रय मिळतो. एवढेच नव्हे तर हेसुद्धा सत्य नाकारता येत नाही की ईश्वराचे सत्य-स्वरूप माहीत नसल्यामुळे अशा समस्यांचेसुद्धा समाधान होणे शक्य नसते, ज्यांना आपण सामान्यत: भौतिक समस्या म्हणतो. जी व्यक्ती ईश्वराच्या सान्निध्यात येत नाही, तिला जीवनाचे सौंदर्य आणि त्याची वास्तविकता कधीच समजू शकत नाही.

## रहस्यवादाची वास्तविकता

ही गोष्ट अगदी खरी आहे की ईशकल्पनेबरोबर एक प्रकारचा रहस्यवाद लागलेला आहे. मात्र ही एक स्वाभाविक बाब आहे आणि मानव-जीवनास अशा प्रकारच्या रहस्यवादाची आवश्यकतासुद्धा आहे. या रहस्यमयतेची दोन मुख्य कारणे आहेत. पहिले कारण असे की ईश्वराचे अस्तित्व खरोखरेच रहस्यमय आहे. त्याला पूर्णपणे ओळखणे मानवाला मुळीच शक्य नाही. एवढेच नव्हे तर मानव अद्यापही स्वत: आपले रहस्य समजू शकला नाही. मग तो ईश्वरासंबंधी असा दावा कोणत्या आधारे करू शकतो की त्याने ईश्वराला पूर्णत: ओळखले आहे?

या रहस्यवादाचे दुसरे कारण असे की ईश्वरासंबंधी जर एखाद्यास रहस्योद्‌घाटन होतही असेल तर त्याच्याजवळ यासाठी शब्दच नसतात, ज्यांच्या माध्यमाने ईश्वरी अस्तित्वासंबंधी इतरांना त्याला माहिती देणे शक्य होईल. तो यासंबंधी काही सांगू इच्छितो आणि सांगतोसुद्धा जे काही सांगावेसे वाटते, ते सांगूनही टाकतो. मात्र जेव्हा अभिदा, लक्षण, व्यंजन आणि यासारख्या शब्दांचे सामर्थ्य याविषयी निरुपयोगी ठरते, तर मग कोण काय करणार? एखाद्याने जर तोंडून काही शब्द काढलेसुद्धा तरी त्यामुळे फायदा कमी आणि हानि जास्त झाली. लोक संभ्रमात पडले आणि कित्येकजण खऱ्या मार्गापासून भटकत-भटकत मार्गभ्रष्टतेच्या खोल अंधकारमय गर्तेतेत जाऊन पडले.

केवळ एकाच आणि स्वयंभु ईश्वरावर जर कोणी धारणा ठेवली आणि हे मान्य केले की स्वतंत्र अस्तित्व केवळ ईश्वराचेच असून इतर कोणालाही स्वतंत्र अस्तित्व प्राप्त नाही, अर्थातच

दुसऱ्यांचे अस्तित्व हे ईश्वरी कृपा अथवा त्याचा चमत्कार आहे, ईश्वरानेच सर्वांना अस्तित्व प्रदान केले, इथपर्यंत तर ठीक आहे, मात्र त्यासाठी भावावेशात ज्या शब्दांचा अतिप्रयोग करण्यात आला, त्यामुळे कित्येकजन मार्ग भटकले, एवढेच नव्हे तर त्यांनी जगातील प्रत्येक वस्तुला आणि स्वत:लादेखील यथातथ्य ईश्वर घोषित करून टाकले आणि सत्यापासून खूप दूर झाले.

ही ईश्वराची मोठी दया आणि कृपाच आहे की त्याने मानवावर ही अवघड जबाबदारी टाकलेली नाही की त्यांनी स्वत: ईश्वरी रहस्याचा उलगडा करण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावावे. केवळ एवढीच जबाबदारी आहे की त्यांनी ईश्वराचे पावित्र्य आणि उच्चता स्वीकार करावी आणि त्याच्यासमोर नतमस्तक व्हावे. ईश्वरावर पूर्ण आस्था ठेवावी. ईश्वर इतका दयाळू आणि कृपाळू आहे की तो कोणाच्याही बुद्धी-क्षमतेपेक्षा जास्त जबाबदारी टाकत नाही. दार्शनिक दृष्टिकोनाने मानवावर त्याच्या बुद्धी आणि विवेक-सामर्थ्यांएवढीच जबाबदारी टाकण्यात आली आहे. मागे आपण पाहिलेच आहे की माणूस पूर्णरूपाने स्वत:लाही ओळखत नसूनही आपले स्वत:चे व्यक्तित्व आणि अस्तित्व स्वीकारतो. मग ईश्वरावर विश्वास ठेवण्यासाठी आपल्याला असा आग्रह करण्याचा अधिकार कोणत्या आधारे प्राप्त होईल की जोपर्यंत आम्ही ईश्वरास पूर्णपणे ओळखणार नाहीत, तोपर्यंत त्याच्यावर विश्वास ठेवणार नाही?

**प्रकरण सहावे**

# एकेश्वरवाद आणि मानवजीवन

आपण केवळ ईश्वरी अस्तित्वाचाच स्वीकार करून चालणार नाही, तर याबरोबरच त्याला आपल्या संपूर्ण जीवनात पूर्णपणे सम्मिलितसुद्धा करणे आवश्यक आहे. आज सर्वांत मोठी समस्या हीच आहे की मानवाने ईश्वराला आपल्या जीवनातून विभक्त केले. मनातून ईश्वराचे भय आणि जीवनात त्याच्या मर्जीचे ध्यान नसेल तर आज अनैतिकता आणि दुष्कर्मांचे भयानक वादळ उठले, ते अजूनही कमीच आहे, असे म्हणावे लागेल.

ईश्वराला विसरून वा त्याला फारकत देऊन चरित्रनिर्मितीचा किती जरी प्रयत्न केला तरी फोलच ठरणार. समाजात कोणावरही विश्वास ठेवणे शक्य राहणार नाही.

मानव-जीवनाचे रक्षण, कल्याण व प्रतिष्ठेसाठी केवळ एकच उपाय आहे आणि तो म्हणजे, "जीवनात ईश्वरी आदेशाचे पालन आणि त्याची मर्जी प्रत्येक क्षणी व प्रत्येक पावलावर राखण्यात यावी."

प्रकरण सातवे

# मानव जीवनात ईश्वराचा प्रवेश

## एकेश्वरवादाचा प्रभाव

आपल्या समग्र जीवनाशी ईश्वराचा अत्यंत गाढ संबंध आहे. आपले व्यक्तिगत जीवन असो की सामाजिक जीवन असो, ईश्वरास जीवनाच्या कोणत्याही भागातून विभक्त करता येत नाही. ईश्वराला केवळ मानूनच चालणार नाही, तर आपल्यासाठी हेसुद्धा आवश्यक आहे की आपण आपले संपूर्ण जीवन हे ईश्वराच्या मर्जीच्या साच्यात ढाळावे. उदाहरणार्थ, ज्याअर्थी आपला आणि संपूर्ण सृष्टीचा निर्माता, स्रष्टा व पालनकर्ता आहे, त्याअर्थी आपणही त्यास स्रष्टा व पालनकर्ता स्वीकारावे आणि जीवनाच्या प्रत्येक पावलावर आणि प्रत्येक अवस्थेत त्याच्या आदेशाचे पालन करावे.

ज्याअर्थी तो आपला दाता आहे, तेव्हा आपण त्याच्यासमोर कृतज्ञता दाखवावी, त्याच्या मिठाला जागावे. आपले प्रेम, भावना त्यालाच समर्पित कराव्यात. आपल्या इच्छा आणि कामना त्याच्यासमोरच मांडाव्या. आपल्या अभिलाषा आणि प्रेमाचे त्यालाच लक्ष्य ठरवावे.

ज्याअर्थी तो आपला रक्षक आहे, त्याअर्थी आपण त्यावरच विश्वास करावा. त्याचीच मदत मागावी. संकट आणि विपत्तीमध्ये त्याचाच धावा करावा. त्याच्याचसमोर प्रार्थनेसाठी हात उचलावेत. ज्याअर्थी तो प्रभुत्वशाली आणि सर्वशक्तिमान आहे, त्याअर्थी त्याच्यावरच पूर्ण विश्वास असावा.

ज्याअर्थी तो सर्वज्ञ आहे, त्याअर्थी आपण हे स्वीकारतो की त्यापासून काहीही लपलेले नाही. ज्याअर्थी तो आपला मार्गदर्शक आहे, त्याअर्थी आपण त्याच्याच मार्गदर्शनाचे अनुसरण करावे. अर्थात त्याने प्रेषितांच्या माध्यमाने आपल्याला जीवनाचा जो मार्ग दाखविला, त्यावरच जीवन जगावे आणि त्याविरुद्ध जेवढे मार्ग असतील, त्यांचा त्याग करावा.

## मानव-जीवनावर एकेश्वादाचा प्रभाव

एकेश्वरवादाची धारणा ही माणसाला अधर्म आणि मार्गभ्रष्टतेपासून वाचविते, याबरोबरच जीवनास अनुपम प्रतिष्ठा प्रदान करते. एकाच ईश्वरावर श्रद्धा आणि विश्वास ठेवलयने मानव ईश्वराशिवाय कोणाचीही गुलामी, परावलंबन वा पारतंत्र्य स्वीकारण्याची अपमानास्पद नामुष्की स्वीकारत नाही. ईश्वराशिवाय इतर कोणासमोरही आपली मान तुकवित नाही, आपण मान-सन्मान पायदळी तुडवित नाही. ज्याने ईश्वराव्यतिरिक्त इतरासमोर स्वत:ला तुकविले, त्याने आपली प्रतिष्ठा तुकविली. यापेक्षा मोठे आणि दुर्दैवी पतन काहीही नाही. हीच गोष्ट कुरआनात अशा प्रकारे स्पष्ट करण्यात आली आहे,

"आणि जी व्यक्ती ईश्वराचा भागीदार ठरविते, ती जणू आकाशावरून पडली. आता तिला पक्षी उचलून नेवोत अथवा वारा एखाद्या दूरवर्ती स्थानावर फेकून देवो."

(संदर्भ : २२ : ३१)

ही उपमा खूप स्पष्ट आहे. अनेकेश्वरवादी अथवा ईश्वरास सोडून इतरांची पूजा करणारी व्यक्ती ही एखाद्या व्यभिचारीणी स्त्रीप्रमाणेच असते. एकाच पुरुषाशी लग्न करून आणि त्याच्याच पतित्वाची शपथ घेऊन परपुरुषाशी समागम करणाऱ्या स्त्रीची प्रतिष्ठा समाजात नसते. ती प्रतिष्ठा गमावून बसते आणि समाजात तोंड दाखविण्याच्या लायकीची नसते. सदरील आयतीमध्ये 'आकाशावरून खाली पडला' असे संबोधून हेच तथ्य समोर ठेवण्यात आले. अशा व्यक्तीमध्ये चारित्र्यशक्ती क्षीण झालेली असते. व्यभिचारी स्त्रीप्रमाणेच तिचा स्वाभिमान, आत्मगौरव नष्ट पावतो. यापेक्षाही जास्त दुर्दैवाची बाब अशी आहे की ती व्यक्ती आपल्या परमलक्ष्य आणि श्रेयापासून दूर होते. याच बाबीकडे आयतीच्या या शब्दांतून संकेत मिळतो,

"वारा एखाद्या दूरवर्ती स्थानावर फेकून देवो."

एका ईश्वरावर विश्वास ठेवणारी व्यक्ती केवळ त्या ईश्वरासमोरच मान तुकविते आणि नतमस्तक होते, ज्याच्यासमोर संपूर्ण ब्रह्मांड नतमस्तक झालेले आहे. एका ईश्वरासमोर नतमस्तक होणे हेच मानवासाठी गौरव, सन्मान आणि प्रतिष्ठेचे लक्षण आहे. जी व्यक्ती ईश्वराव्यतिरिक्त इतर ठिकाणी गौरव, सन्मान व प्रतिष्ठा शोधत असते, तिला आदर आणि सन्मान कोठेच सापडत नाही. तिचा कोणीही सन्मान करू शकत नाही.

एका ईश्वरावर श्रद्धा ठेवणाऱ्या व्यक्तीची दृष्टी कधीही संकुचित असू शकत नाही. माणूस जोपर्यंत ईश्वराव्यतिरिक्त एखाद्या अन्य अस्तित्वावर अगर स्वत:वरच श्रद्धासुमने उधळत असतो, त्याची दृष्टी संकुचित असणारच. सृष्टीतील प्रत्येकजण आपल्याप्रमाणेच असल्याचे त्यास वाटते. सर्वांना कमी लेखतो. त्याच्यासमोर एखादा उच्च अगर व्यापक आदर्श नसतो. अशा माणसाची मैत्री, वैर, आदर, अनादर वगैरे अत्यंत संकुचित असतो. अशा परिस्थितीत कित्येकांची भीती बाळगतो, कशालाही घाबरतो आणि कशाही किरकोळ गोष्टीशी आशा बाळगतो. अगदी कुत्री, मांजरी आडवी गेली अथवा समोरून रिकामे भांडे गेले, तरीही यापासून घाबरतो आणि अगदी स्वत:च्याच हातून तयार केलेल्या वस्तूंशी आशा बाळगतो. अशी असंख्य उदाहरणे मिळतात. मात्र एका ईश्वरावर धारणा व श्रद्धा ठेवून माणूस जेव्हा संकोचाच्या आणि खोट्या श्रद्धांच्या बेड्या झुगारून फेकतो, तेव्हा माणसाच्या जीवनात एक अद्‌भुत आणि विलक्षण क्रांती घडते. आता मात्र तो प्रत्येक वस्तुकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहतो. त्याच्या दृष्टीत कोणाविषयी तुच्छतेची भावना नसते. सर्वांनाच अगदी न्यायपूर्ण दृष्टीने तो पाहतो. सृष्टीतील प्रत्येक वस्तु ही ईश्वराच्याच मालकीची असल्याचा त्याचा दृष्टिकोन

बनतो. या प्रत्येक वस्तुबरोबर त्याचे नातेसंबंध जुळतात. त्याची मैत्री आणि वैर हे सर्वकाही ईश्वरासाठीच असते. तो स्वार्थासाठी कोणाशी मैत्री वा वैर करीत नाही. त्याला दिसते की सृष्टीतील प्रत्येक वस्तु त्यांच्याच ईश्वरासमोर नतमस्तक होत आहे. म्हणून या जगात कोणीच त्यास परका वाटत नाही, सर्वांविषयी आपलेपणा त्याच्या हृदयी निर्माण होतो. अर्थातच तो कोणाशीही वैरभाव अगर द्वेष-मत्सराची भावना ठेवत नाही. त्याच्या प्रेम, सहानुभूती आणि ममत्वाचे वर्तुळ सीमित राहात नसून ते खूप व्यापक होते, इतके व्यापक की त्यात समस्त विश्व सामावते. आता मात्र तो अत्यंत उदारमतवादी होतो.

एका ईश्वरावर श्रद्धा ठेवून माणूस अगदी निर्भय होतो. कोणालाही मुळीच घाबरत नाही. त्याची आत्मप्रतिष्ठा, स्वाभिमानाची भावना जागृत होते. ईश्वराशिवाय कोणासमोरच झोळी पसरवित नाही. केवळ ईश्वरासमोरच आपली मागणी ठेवतो. ईश्वरासमोरच मदतीचा हात पसरतो. ईश्वरालाच नफा आणि तोट्याचा स्वामी समजतो. कारण त्याला माहीत असते की सर्वकाही ईश्वराच्याच हाती आहे. त्याच्याशिवाय कोणाचाच सहारा खरा नाही.

एका ईश्वरावर विश्वास ठेवणारा माणूस कधीच निराश होत नाही. तो नेहमी आशावादी असतो. कितीही मोठे संकट आले तरी तो ईश्वराची कास सोडत नाही. कारण त्याला माहीत असते की कितीही मोठ्या संकटात केवळ ईश्वरच तारणारा आहे. देव तारी, त्याला कोण मारी, हे अगदी बरोबर आहे.

त्याच्याकडून जर अपराध घडला तरी त्यास माहीत असते की ईश्वराने क्षमा करण्याचे द्वार बंद केलेले नाही. याबाबतीत कुरआनात म्हटले आहे,

"एखाद्याने एखादे दुष्कर्म केले अथवा स्वत:वर अन्याय केला आणि ईश्वरासमोर क्षमा मागितली तर तो निश्चितच क्षमा करणारा दयाळू आहे." (संदर्भ : ४ : ११०)

एका ईश्वरावर विश्वास करणारा अत्यंत धैर्यवान आणि साहसी असतो. कितीही मोठे संकट त्याला सत्यापासून परावृत्त करू शकत नाही. त्याला निश्चित हे माहीत असते की माणसावर येणारी प्रत्येक विपत्ती आणि संकट हे ईश्वराशिवाय कोणीच टाळू शकत नाही. म्हणून तो प्रत्येक कठीण, अत्यंत अडचणीच्या व संकटमय परिस्थितीत अगदी पर्वतासारखा तठस्त असतो. प्रेषित हूद (अ.) यांनी आपल्या विरोधकांना आव्हान देताना जे शब्द वापरले, त्याचा कुरआनाने उल्लेख केला आहे,

"तुम्ही सर्वजन एकत्र येऊन आपला डाव खेळा आणि मला संधीदेखील देऊ नका. मी तर त्या ईश्वरावर विश्वास ठेवतो, जो माझाही पालनकर्ता आहे नि तुमचाही पालनकर्ता आहे. कोणतीही सजीव वस्तु अशी नाही, जिच्यावर त्याचा ताबा नाही." (संदर्भ : ११ : ५५, ५६)

एका ईश्वरावर विश्वास ठेवणाऱ्या माणसामध्ये विलक्षण आणि अद्‌भूत वीरता निर्माण होते. ईश्वरावर तो प्राणपणाने प्रेम करतो. ईश्वरासाठी तो आपले सर्वस्व त्यागतो. त्याला ईहलोकातील क्षणभंगुर भौतिक सुख आणि वैभव हे परलोकी मिळणाऱ्या स्थायी आणि शाश्वत सुखासमोर अगदी तुच्छ वाटते. त्याला माहीत असते की मृत्यू अटळ आहे. एक न एक दिवस आपण मरणारच. मग कोणाची कशाला भीती बाळगायची? तो केवळ ईश्वरालाच भितो. एका ईश्वराच्या भीतीमुळे त्याच्या मनातून सर्व प्रकारचे भय नष्ट होतात.

अशा माणसात एकीकडे आत्मप्रतिष्ठा अगर आत्मगौरवाची भावना आढळते, तर दुसरीकडे तो अत्यंत विनयशील आणि नम्रसुद्धा असतो. त्याच्यात अहंकार, फाजील गर्व व घमेंड नसते. कारण तो आपल्या ईश्वरासमोर विवश असतो. ईश्वराच्या अधिकारक्षेत्रातून त्याची शक्ती बाहेर निघत नाही. ही धारणा त्याला अत्यंत विनयशील, नम्र व सुशील बनविते.

एका ईश्वरावर धारणा ठेवल्यावर माणूस खोट्या आणि लटक्या आशांवर जगत नाही. तो यथार्थवादी होत जातो. त्याला माहीत असते की ईश्वराला धोका देऊन चालत नाही. तेथे कुठलीही शिफारस चालत नाही. त्याच्यासमोर केवळ धर्मपरायणता आणि ईशभक्तीच कामी येते. ईश्वराचा सच्चा आज्ञाधारक आणि त्याच्या कोपाचे भय बाळगणाराच त्याच्या दरबारी सन्मानास पात्र ठरतो. तो ईश्वर आहे. त्याने कोणासही आपला पुत्र म्हणून जन्माला घातले नाही, जो आपल्या पापांचे प्रायश्चित्त करून सर्वांना मुक्ती देईल. तसेच त्याचा कोणी असा चाहता आणि लाडकाही नाही, सगासोयराही नाही, ज्यांना तो त्यांच्या अपराधांची वा पापांची शिक्षा देणार नाही. ईश्वराच्या दृष्टीत सर्वच मानव अगदी समान आहेत. त्याच्या दृष्टीत कोणीच श्रेष्ठ वा कनिष्ठ नाही. सर्वांना त्यानेच निर्माण केले. वाईट मार्गावर चालणारा वाईट आणि सत्‌मार्गावर चालणारा श्रेष्ठ, असाच त्याचा नियम आहे. ईश्वराची इच्छा आणि मर्जीला अनुसरून जीवन जगणाराच ईश्वराला प्रिय आणि लाडका आहे.

एका ईश्वराच्या आदेश, इच्छा आणि मर्जीनुसार जीवन व्यतित करणाऱ्या माणसाच्या जीवनात पावित्र्य येते. त्याच्या हृदयात लोभ, ईर्ष्या, घृणा, वैर, द्वेष, मत्सर वगैरेसारख्या तुच्छ भावना कधीच घर करू शकत नाहीत. असा माणूस उतावळा आणि अधीर होत नाही. त्याचा ईश्वरावर पूर्ण विश्वास असतो. तो धैर्याने जगतो. त्याच्या मनात लालसा, अघोरी अभिलाषा येत नाही. धैर्य आणि संयमामुळे त्याच्या चारित्र्यात अत्यंत दृढता असते. रोजी-रोटी मिळविण्यासाठी तो सन्मानित आणि प्रामाणिक मार्गाचा अवलंब करतो. प्रामाणिकतेमधूनच जे काही मिळते, ते ईश्वराची कृपाफळे समजून त्याचे आभार मानतो. प्रामाणिक मार्गाने मिळालेली उपजीविकाच वैध असते. वैध स्वरुपात मिळालेल्या अल्पशा उपजीविकेच्या तुलनेत अवैध मार्गाने मिळणारी कितीही मोठी संपत्ती ठोकारून लावतो. कारण त्याला हे माहीत आहे की आदर,

सन्मान, सत्ता, संपत्ती, शक्ती व सामर्थ्य, सौंदर्य व वैभव या समस्त बाबींचा स्वामी हा केवळ ईश्वरच आहे. त्याच्या निर्धारित आणि सुनियोजित व्यवस्थे अंतर्गत प्रत्येकाला जे काही ठरलेले असते, ते कोणत्याही परिस्थितीत मिळणारच, यावर त्याचा पूर्ण विश्वास असतो. प्रत्येक वस्तुबाबत खरे ज्ञान केवळ ईश्वरालाच असल्याचे त्याला माहीत असल्याने तो कधीही नाराज होत नाही. कारण ईश्वरी-व्यवस्था आणि पद्धतीवर कोणत्याही प्रकारचा आक्षेप घेणे केवळ अज्ञान होय.

एका ईश्वरावर विश्वास ठेवणारा माणूस ईश्वराच्याच आदेशांचे पालन करतो. ईश्वराने आपल्या प्रेषिताच्या माध्यमाने पाठविलेल्या शुभसूचना आणि चेतावन्यांनुसार आचरण करून आपली जबाबदारी पूर्ण करतो. असा माणूस आपला आत्मा आणि शरीर या दोहोंवर ईश्वराचा अधिकार मान्य करतो. अशा परिस्थितीत त्याचे आंतरिक आणि बाह्य जीवन पवित्र राहते. त्याचा आत्मा जागरूक असतो. त्याला पूर्ण माहीत असते की त्याच्या प्रत्येक बाबीची ईश्वराला माहिती असते. त्याची कोणतीही वस्तु ईश्वराच्या माहितीकक्षेच्या बाहेर नाही. त्याचे प्रत्येक पाऊल, प्रत्येक क्षण, प्रत्येक श्वास, प्रत्येक उघड गुप्त बाब ईश्वरास माहीत असते. म्हणून तो कधीही आणि कोठेही स्वत:ला ईश्वरापासून लपवू शकत नाही. त्याला या गोष्टीची जाणीव असल्यामुळेच त्याची पावले अनैतिक आणि ईशद्रोही व अपराधी वाटेवर जात नाही. हृदयात असणारे ईश्वराचे भय पातक कर्माच्या वाटेवर पूर्वसूचना देणारे लाल-सिग्नल देते. असा माणूस ईश्वरी इच्छेविरुद्ध कधीच वागत नाही. शिक्षणामुळे निश्चितच लोकांना प्रभावित करता येते. समाजसुधारणेचे कार्य करता येते. मात्र शिक्षणाचा समाजसुधारणेवर होणारा परिणाम मर्यादित असतो. शंभर टक्के सुधारणा केवळ शिक्षण-प्रशिक्षणाने शक्य नाही. कारण याबरोबर बऱ्याच अडचणी मार्गस्थ होतात. स्वत: माणसाच्या इच्छा व अभिलाषा आणि अघोरी वासना त्यास आपला गुलाम बनवितात. त्याला अक्षरश: बोटांवर नाचवितात. उच्चशिक्षिताला इच्छा, वासना, आशा-आकांक्षा नसतात. अशातला प्रकार नाही. कधी-कधी तो आपल्या शिक्षणाचा आणि ज्ञानसामर्थ्याचा आपल्या अघोरी इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी गैरवापर करतो. मात्र शिक्षणापेक्षाही आणि इतर सर्वच पद्धतींपेक्षाही समाजसुधारणेचे सशक्त आणि यशस्वी माध्यम हे ईश्वरी अस्तित्वावर विश्वास ठेवणे होय. हृदयात ईश्वर असेल तर जगातील प्रत्येक गोष्ट शक्य आहे. ईश्वरावरील श्रद्धा आणि विश्वासामुळे मानवात असे उत्तम चरित्र निर्माण होते, जे इतर कोणत्याही माध्यमाने निर्माण होणे शक्य नाही.

वास्तविक बाब अशी आहे की एकेश्वरवाद म्हणजे मनुष्याने स्वेच्छापूर्वक ईश्वरासमोर आत्मसमर्पण करावे. आपल्या इच्छा आणि मर्जी ईश्वराच्या इच्छेच्या ताब्यात द्यावे. ईश्वरी इच्छा आणि आदेशांसमोर आत्मसमर्पण केल्यावर जातीय, राष्ट्रीय, वांशिक वगैरे कोणत्याही प्रकारची भावना त्याची दृष्टी संकुचित करू शकत नाही, या आणि यासारख्या इतर सर्वच

बाबींच्या आधारांवर एकेश्वरवादी माणूस कोणाशीही अन्याय, अत्याचार आणि पक्षपातीपणाचे वर्तन करीत नाही. कारण त्याची उपासना, वंदन, पूजा आणि जीवनातील प्रत्येक कर्म एवढेच नव्हे तर त्याचे जगणे आणि मरणे, हे सर्वकाही केवळ त्याचा एकमेव स्वामी आणि प्रभु ईश्वरासाठीच असते. तो मानवतेची सेवा करतो, मात्र मानवतेला आराध्य समजून नव्हे तर एवढ्यासाठी करतो की त्याचा आराध्य व पूज्य स्वामीने त्याला हे कर्तव्य ठरवून दिलेले आहे. कुरआनात हीच वास्तविकता या शब्दांत मांडलेली आहे,

"तुम्ही ही स्पष्टपणे घोषणा करा की, माझी नमाज, माझे बलिदान, माझे जीवन आणि माझे मरण हे सर्वकाही त्या ईश्वरासाठी आहे जो या समस्त सृष्टीचा पालनकर्ता आहे."

(संदर्भ : ६ : १६३)

आदरणीय प्रेषित मुहम्मद (स.) यांनीसुद्धा यासंबंधी म्हटले आहे,

"प्रेम करावे, तर केवळ ईश्वरासाठीच, शत्रुत्व करावे तर केवळ ईश्वरासाठीच, द्यावे तर केवळ ईश्वरासाठीच आणि देऊ नये तर तेही केवळ ईश्वरासाठीच. जो असे करील, त्याने श्रद्धेचे अंतिम लक्ष्य गाठले."

## राजकीय आणि सामाजिक जीवनावर एकेश्वरवादाचा प्रभाव

एकेश्वरवादाच्या प्रतिबिंबामुळे माणसाचे केवळ वैयक्तिक जीवनच प्रभावित होत नसून मानवाचे समस्त सामूहिक व सामाजिक जीवन ईश्वरी शीतल छायेच्या प्रभावाखाली येते. माणसाच्या सामाजिक जीवनात स्थायी न्यायाची स्थापना करणे हीच सर्वांत मोठी आणि जटील समस्या आजपर्यंत सर्वत्र आढळते. तथाकथित आणि स्वयंघोषित विचारवंतांनी भले-भले कायदेकानू तयार केले. मात्र कायद्यांचा मूळ आत्मा न समजल्यामुळे अथवा इस्लामच्या फाजील द्वेषापोटी त्यांना सर्वार्थ न्यायाची स्थापना करता येणे कधीच शक्य झालेले दिसत नसल्याचा इतिहास नाकारता येत नाही. यामुळे समाजजीवनात अन्याय, अत्याचार, विषमता, भीषण रक्तपात सर्वत्र उपद्रव, अरेरावी, अहंकार, उच्च-नीचतेच्या असूरी भावना व यासारख्या अनेक प्रकारच्या हाहाकाराचे जगामध्ये नग्न-तांडव माजलेले आहे. अन्याय व अत्याचाराच्या उग्र ज्वालांत मानवता होरपळून निघत आहे. सर्वत्र हाहाकार आणि अन्यायपीडितांच्या अवार्त किंचाळ्यांनी वातावरण दुमदुमले आहे. समाजजीवनाची सर्वत्र राखरांगोळी झाली आहे. परिस्थिती अगदी बिकट आहे. अशा प्रसंगी न्याय आणि शांतीचा उदो-उदो करणाऱ्या तथाकथित विचारवंत आणि नेत्यांचे सर्व प्रयत्न पार अपयशी ठरले आहेत. मात्र... एकेश्वरवादी विचारसरणीने समाजात न्याय आणि शांती स्थापण्याचे जे अभूतपूर्व कार्य केले आणि जो ऐतिहासिक विक्रम केला, हे इतिहासातही मिळते आणि वर्तमान काळात बऱ्याच ठिकाणी होणाऱ्या यशस्वी प्रयोगामुळेही सिद्ध झालेले आपण आपल्या डोळ्यांनी पाहतो आहोत.

जोपर्यंत एकेश्वरवादाच्या आधारावर जगातील सर्व मानवांना एकतेच्या सूत्रात जोडण्यात येणार नाही, जोपर्यंत समस्त मानवांना ही गोष्ट पटवून देण्यात येणार नाही की सर्वच मानवांचा ईश्वर एकच आहे, ईश्वराचे नाते हे इतर सर्व नाते-संबंधांपेक्षाही जास्त घनिष्ट आहे तोपर्यंत समाजात ऐक्य निर्माण होणार नाही. ईश्वराशी मानवाचे नाते इतके दृढ असते की या न्यायोचित नात्यासमोर कोणतेही नाते खुजे पडते आणि याच नात्याची जोपासना करण्यासाठी माणूस कोणाशीही द्वेष, वैर आणि शत्रुत्व ठेवत नाही. कारण त्याची ही धारणा असते की ईश्वर हा आपसात रक्तपात करणे मुळीच पसंत करीत नाही. ईश्वरास हे मुळीच आवडत नाही की एका माणसाने आपल्याच मानवबंधुवर अन्याय व अत्याचार करावा. ईश्वराला मानवाने मानवाचा हितैषी आणि शुभेच्छुक असणेच आवडते. 'ब्रट्रेंड रसेल' याने खरेच सांगितले आहे,

"आपल्या काळात जी बाब सामाजिक संपर्कांना राष्ट्रीय सीमांच्या बाहेर वाढविण्यासाठी बाधक आहे, ती बाब म्हणजे राष्ट्रवाद होय. त्यामुळे राष्ट्रवाद हे मानवजातीच्या विनाशाचे सर्वांत शक्तिशाली माध्यम आहे, ही किती विचित्र आणि दुर्दैवी बाब आहे! प्रत्येकजन हे मान्य करतो की इतर देशांचा राष्ट्रवाद ही किती भयानक गोष्ट आहे. तरीसुद्धा त्याला स्वत:च्या देशाचा राष्ट्रवाद खूप चांगला वाटतो."

(संदर्भ : The hopes for a changing world 1953)

याचप्रमाणे प्रोफेसर अरनॉल्ड जे. टॉयनबी (Prof. Arnold J. Toynbee) याने तर स्पष्ट शब्दांत लिहिले आहे,

"मुस्लिमांची पारंपरिक धार्मिक बंधुभावाची ही निश्चितच पाश्चात्य देशातील राष्ट्रवाद या संकुचित भावणेपेक्षा खूप उत्तम आहे. मुस्लिमांच्या या बंधुत्वाच्या धारणेमुळे वर्तमान काळातील गरजा पूर्ण होऊ शकतात. आपण कमीतकमी मुस्लिमांतर्फे अशी आशा बाळगू या की त्यांनी त्यांच्या विश्वव्यापी प्रेम आणि बंधुत्वाची धारणा त्यागून युरोपची राष्ट्रवादाची संकुचित दृष्टिकोन असलेली धारणा स्वीकारू नये. तसे पाहता मुस्लिमांना इस्लामकडून मिळालेली विश्वव्यापी बंधुत्वाची धारणा हीच मानवकल्याणासाठी नेहमीच खूप गरजेची आणि अत्यावश्यक असलेली धारणा आहे, यापेक्षाही जास्त हे की या अणुयुगात या धारणेचे महत्त्व आणखीनच वाढले आहे." (संदर्भ : The world and the west page, No. 30, 31)

येथे आणखीनही एक गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटते की इस्लामी दृष्टिकोनानुसार एकेश्वरवाद म्हणजे केवळ हेच नव्हे की एका ईश्वराचे अस्तित्व असल्याची श्रद्धा ठेवून गप्प बसावे. कोणाच्या अध्यात वा मध्यात पडू नये. जगात जे काही काळे-पांढरे होताना दिसत आहे आणि जे काही उचित-अनुचित घडताना दिसत आहे, ते पाहून हाताची घडी तोंडावर बोट ठेवून चुपचाप राहावे. कोणाशी आणि कशाशी काहीच घेणे-देणे न ठेवता चुपचाप एका ईश्वराचे रात्रंदिवस ध्यान करीत बसावे. हा दृष्टिकोन इस्लामने दिलेल्या एकेश्वरवादाचा मुळीच नाही. नेमक्या याच

अप्पलपोट्या दृष्टिकोनाविरुद्ध इस्लामने बडगा उगारला आणि एक सर्वसमावेशक आणि विश्वव्यापी दृष्टिकोन देऊन मानवजातीस विनाशापासून दूर ठेवले. इस्लामी एकेश्वरवादाने अगदी स्पष्टपणे जीवनाच्या प्रत्येक पावलावर प्रत्येक क्षणी आपले मार्गदर्शन केले. व्यक्तिगत जीवन असो की कौटुंबिक जीवन असो, सामाजिक असो वा राजकीय जीवन असो, आर्थिक क्षेत्र असो की व्यावसायिक क्षेत्र असो, सांस्कृतिक जीवन असो, शैक्षणिक क्षेत्र असो, जगातील कोणतेही क्षेत्र असो, इस्लामी एकेश्वरवादाने जगातील सर्वच मानवांचे पूर्ण जीवन व्यापले आणि कोठेच त्याला मार्गदर्शनापासून वंचित ठेवले नाही. ईश्वर म्हणजे केवळ ध्यान, पूजा-अर्चा करण्याची वस्तु नाही. आपले संपूर्ण जीवनच ईश्वराने व्याप्त आहे. कोणत्याही ठिकाणी व कोणत्याही प्रसंगी त्याच्या आदेशांचे वा मार्गदर्शनाचे उल्लंघन मानवहिताविरुद्धच ठरते. त्याचे ध्यान, पूजा-अर्चा आणि जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात ईश्वराच्या आदेशांचे पालन केल्याशिवाय भक्ती पूर्ण होत नाही. त्याच्या आज्ञा वा मर्जीविरुद्ध जीवन जगल्याने आपण त्याचे प्रिय आणि लाडके होऊ शकत नाही. ईश्वराने दिलेला धर्म हा कधीही एकांगी होऊ शकत नाही. ज्याअर्थी ईश्वर पूर्ण आहे, तेव्हा त्याचा धर्ममार्गसुद्धा पूर्णच आहे. आपण ईश्वराची खऱ्या अर्थाने उपासना अगर भक्ती वगैरे करावी म्हणजेच जीवन मार्गातील प्रत्येक पाऊल त्याच्याच मार्गदर्शनानुसार टाकावे, तरच ईश्वरास आपण पूर्ण रूपाने स्वीकारले असे होईल.

आता प्रश्न असा आहे की ईश्वराचे आदेश, मार्गदर्शन कोठे आहे? त्याचे ज्ञान आपल्याला कोठून मिळेल? या प्रश्नाचे आपल्याला प्रेषितांच्या इतिहासात उत्तर मिळते. ईश्वराचे आदेश प्रेषितांवर अवतरित झाले. ईश्वराने जगामध्ये यासाठीच प्रेषित पाठविले की त्यांनी लोकांना ईश्वराचे आदेश दाखवावे. लोकांना ईश्वराचे ज्ञानही द्यावे आणि मानवांकडून ईश्वराच्या काय अपेक्षा आणि मागण्या आहेत, त्याचेही लोकांना मार्गदर्शन करावे. ईस्वराला कोणत्या पद्धतीचे मानवजीवन पाहिजे अथवा मानवाने कोणत्या पद्धतीने जीवन जगावे आणि मानवांचे कोणते कर्म त्याला पसंत आहेत आणि कोणते कर्म पसंत नाहीत, माणसाचे चरित्र कसे असावे, वगैरे सर्व बाबींचे मार्गदर्शन मानवांना करण्यासाठी ईश्वराने प्रेषित पाठविले. एक-दोन नव्हेत तर प्रेषितांची शृंखलाच सुरु ठेवली आणि याच प्रेषितशृंखलेची अंतिम कडी म्हणजे प्रेषित मुहम्मद (स.) होय. मागे येऊन गेलेल्या प्रेषितांनी जे कार्य केले, तेच कार्य अंतिम प्रेषित मुहम्मद (स.) यांनी आपल्या युगात केले. त्यांनी लोकांना एकाच ईश्वराच्या उपासनेकडे समस्त मानवजगास बोलावले. जीवनाचा परिपूर्ण कायदा कुरआनच्या स्वरुपात प्रदान केला. यासाठी आपण कुरआनचा अभ्यास अवश्य करावा. कारण आज ईश्वरी मार्गदर्शनाचे विश्वसनीय, प्रमाणबद्ध व परिपूर्ण साधन म्हणजे केवळ कुरआनच होय. यातून निश्चितच आपण सत्यापर्यंत पोहचू शकतो. ही गोष्ट कुरआनात अशा प्रकारे स्पष्ट करण्यात आली आहे,

"तुमच्याकडे ईश्वरातर्फे मार्गदीप आलेले आहे आणि एक असा सत्यग्रंथ, ज्यामार्फत त्याला प्रसन्न करणारे त्याची प्रसन्नता इच्छितात." (संदर्भ : ५ : १५,१६)

# ईशप्रतिबिंब

कुरआनाने म्हटले आहे,

१) "बियांचे दाणे आणि गाठोळी फाडणारा ईश्वर आहे. तोच जीवंत अस्तित्वास मृतातून काढतो." (संदर्भ : ६ : ९५/९६)

२) "रात्रीच्या काळोखास फाडून तोच सकाळ उगवतो. त्यानेच रात्री ह्या विश्रांतीसाठी बनविल्या आणि चंद्र व सूर्याच्या उगवण्याचा व मावळण्याची गणना निश्चित केली." (संदर्भ : ६ : ९६ / ९७)

३) "तोच आहे, ज्याने आकाशातून पावसाचा वर्षाव केला, मग त्याच्या माध्यमाने वनसृष्टी उगवली, हिरव्या शेती फुलविल्या, वृक्षे उभी केली, माग त्यातून पडदा चढलेले दाणे काढले आणि खजुरींच्या बियांतून खजुरी निर्माण केली." (संदर्भ : ६ : ९९/१००)

४) "तो ईश्वर आहे, जो पवन वाहवितो. मग ते आभाळ उचलून नेतो मग आम्ही एका उजाड रानात ते बरसवितो." (संदर्भ : ३५ : ९)

५) "ईश्वरच आहे जो आकाश आणि पृथ्वीचा स्वामी आहे." (संदर्भ : ३५ : ४१)

६) "यांना माहीत आहे काय? हे लोक जमिनीवर चालले फिरले नाहीत? त्यांना त्या लोकांच्या परिणति आठवते." (संदर्भ : ३५ : ४४)

७) "ईश्वर तर निस्पृह आहे. तुम्हीच त्याचे गरजवंत आहात. तुम्ही पाठ दाखवाल तर ईश्वर तुमच्याऐवजी इतरांना आणील." (संदर्भ : ४७ : ३८)